म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
स. नं. 702

# वीर वैरा

REFBK-0002474

ग. दा. सावरकर

# वीर वैरागी

लेखक

प्रो. भाई परमानंद, एम्. ए.

भाषांतरकार

श्री० गणेश दामोदर सावरकर

प्रकाशक

गणेश महादेव आणि कंपनी

गिरगांवरोड, मुंबई

जून, १९२४

किंमत एक रुपया

मुद्रक व प्रकाशकः–**गणेश महादेव वीरकर**

मुद्रणालयः–

**'साहित्यसेवक छापखाना'** ९५–९७ गिरगांव बॅकरोड, मुंबई

प्रकाशनालयः–

**गणेश महादेव आणि कंपनी**, ६२१ गिरगांवरोड, मुंबई

# अनुक्रमणिका.


| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| | प्रस्तावना | १ |
| | प्राक्कथन | ९ |
| | भूमिका | १२ |
| १ | जातीय वीर | ३५ |
| २ | जीवनपरिवर्तन | ४० |
| ३ | गुरुगोविंद सिंह, | ४४ |
| ४ | निवृत्तिमार्ग व प्रवृत्तिमार्ग | ४९ |
| ५ | युद्धारंभ | ५४ |
| ६ | प्रतिकार | ६१ |
| ७ | ' पहाडांतील हिंदू राजे ' | ६७ |
| ८ | ' राजसिंहासन हाललें ' | ७२ |
| ९ | ' उलटे दिवस वा पडता काळ ' | ७७ |
| १० | वैरागीची अत्यंत अहितकारी असावधानता | ८४ |
| ११ | धर्म आणि राजनीति | ८९ |
| १२ | शाही कूटनीतीची सफलता | ९३ |
| १३ | तत्कालसाठीं बादशहानें केलेल्या शर्ती | १०१ |
| १४ | वैरागीची आशा | १०८ |
| १५ | गुरुदासपुरचा वेढा | १११ |
| १६ | हौतात्म्याचें दिल्लींतील अपूर्व दृश्य | ११४ |
| १७ | वीर वैरागीचे मृत्यूनंतर | ११८ |
| १८ | अमरत्व ( कविता ) | १२१ |

**मायर्स पंप्स् व त्यांचे सुटे भाग**
फारच स्वस्त भावानें मिळण्याचें ठिकाण
**धि लिमये ब्रदर्स लिमिटेड,**
८ इमाम स्ट्रीट, मुंबई, व २९ पोलाक स्ट्रीट, कलकत्ता.

ग्रंथ संग्रहालय
नं.

# गणेश महादेव आणि कंपनीचीं पुस्तकें.

| | | |
|---|---|---|
| १ | स्वराज्याचा श्रीगणेशा. | २–४–० |
| २ | स्वराज्याची घटना. | २–४–० |
| ३ | स्वराज्याची स्थापना. | २–४–० |
| ४ | स्वराज्याचा कारभार. | २–४–० |
| ५ | स्वराज्यावरील संकट. | २–४–० |
| ६ | मराठी रियासत, मध्य वि. ३ | २–४–० |
| ७ | ब्रिटिश रियासत, पूर्वार्ध. | ३–८–० |
| ८ | श्रीएकनाथ चरित्र. | ०-१२-० |
| ९ | भक्तिमणिमाला. | १–८–० |
| १० | अजिंक्य तारा. | १–८–० |
| ११ | निकोलाय लेनिन. | ०-१२-० |
| १२ | ग्रेट ब्रिटनची शासनपद्धति. | ०-१०-० |
| १३ | नवजीवन ( नाटक ) | ०-१०-० |
| १४ | जोसेफ मॅझिनी. | २–०–० |
| १५ | महात्मा गांधी. | २–४–० |
| १६ | मानवी कर्तव्यें. | १–०–० |
| १७ | माधवानुज ( कविता ) | २–०–० |
| १८ | वीर वैरागी | १–०–० |
| १९ | गोमांतक | १–८–० |
| २० | चापेकरांचे नि. लेख | २–०–० |

Telephone No.
24636.

Telegrams:
"INVEST," Bombay.

FOR BUYING & SELLING GOVT. SECURITIES

PLEASE APPLY TO

# BHIDE SONS & Co.

BANKERS & BROKERS

57 APOLLO STREET, FORT,

## BOMBAY.

OUR ACTIVITIES:

I Deal in Govt. Securities, Port Trust & Municipal Bonds.

**Maintain regular stocks.**

II Buy & sell Shares on account of customers only.

III Arrange loans & Deposits for short & long periods at favourable rates.

IV Accept Savings bank a/cs @5% & deposits on better terms.

V Negotiate Hundies & arrange Foreign Exchanges

Trial orders solicited.

V. J. BHIDE, B. Com.
Proprietor

# प्रस्तावना

हिंदुस्थानच्या इतिहासांत स्वदेशावर व स्वधर्मावर झालेल्या परकीय लोकांच्या ज्या कित्येक स्वाऱ्यांचा उल्लेख सांपडतो त्या सर्वांत महम्मद घोरीच्या स्वारीनंतर एकसारख्या होणाऱ्या मुसलमानांच्या स्वाऱ्यासारखी भयंकर घटना एकहि नाहीं. मुसलमानांच्या ह्या स्वाऱ्या इतक्या सतत व समहेतुक होत आल्या कीं, त्या सर्वांस अनेक स्वाऱ्या म्हणण्याचे जागीं महम्मद घोरीपासून तों थेट अहमद अबदालीपर्यंत एकच स्वारी म्हटलें तरी चालेल. ह्या स्वाऱ्यांचा प्रतिकारहि इतका सतत व समहेतुक होत गेला कीं, त्या सहा शतकांच्या संग्रामांत चालू असलेल्या प्रचंड झगड्यास एकच युद्ध म्हटलें असतां चालण्यासारखें आहे. इतकेंच नव्हे तर त्या बहु-शतकव्यापी युद्धाचें मर्म शोधून काढून त्याचें एकात्मत्व स्पष्टपणें प्रदर्शित केल्यानेंच त्या सहा शतकांतील अनेक, भिन्न व गुंतागुंतीच्या उलाढालींचा इतिहास सुसंगतपणें व योग्य रीतीनें समजतो. हें एकात्मत्व ज्या एकाच शब्दानें व्यक्त होण्यासारखें आहे तो शब्द म्हणजे हिंदुपदपादशाही हा असून ह्या युद्धाचें यथार्थ नांव ‘ हिंदुस्वतंत्रता युद्ध ’ हें होय.

पृथ्वीराजाच्या वधानंतर प्रस्थापित व विवर्धित होत चाललेल्या मुसलमानी राजसत्तेस अनेक समयीं व अनेक वीरपुरुषांनीं व स्त्रियांनीं अनेक समरभूवर हटातटाचा प्रतिकार केला हें जरी खरें आहे तरी त्या प्रतिकारांत राजपूत, बुंदेले, मराठे व शिख ह्यांच्या राष्ट्रीय प्रतिकारांचें महत्व अत्यंत अधिक आहे हें उघड आहे. रजपुतांनीं मुसलमानांच्या आघाताची धार आपल्या उघड्या छातीवर झेलून पहिली तीन शतकें अत्यंत शौर्यानें टिकाव धरला. पण पुढें त्यांचें प्रतिकारसामर्थ्य कोसळूं लागून मुसलमानांशीं तोंड देण्याचें कार्य महाराष्ट्रानें आपले शिरावर घेतलें. मुख्य युद्धाचें समरांगण महाराष्ट्रांत पडलेलें असतांना त्या समरांगणांत शत्रूंचीं हाडेंन हाडें खिळखिळीं करीत महाराष्ट्र जेव्हां झुंजत होता तेव्हां त्या संधीचा लाभ घेऊन हिंदुस्थानांत अनेक भागीं—बुंदेलखंड, पंजाब, राजपुताना वगैरे ठिकाणीं जीं उपयुद्धें आरंभिलीं गेलीं त्या सर्वांत शिखांच्या जातीनें पंजाबमध्यें केलेल्या संघटित व अदम्य प्रतिकाराचा इतिहास महत्वाचा,

मनोरंजक व उपदेशप्रद आहे. तथापि पंजाबांतील शिखांचें हें युद्ध उपयुद्धच होय. कारण मुसलमानांची सत्ता आमूलात् उलथून पाडून तिचें जागीं हिंदुपदपादशाही सर्व हिंदुस्थानभर स्थापन करण्याच्या ध्येयाची स्पष्ट व विकट प्रतिज्ञा करून तिचे सिद्ध्यर्थ अखिल हिंदुस्थानभर हिंदुस्वातंत्र्य-युद्धाची लाट उसळवून देत अटकेपासून रामेश्वरापर्यंतचा देश मुसलमानांचे हातून सोडविण्यांत जितकी चिकाटी महाराष्ट्रानें धरली व जितकें यश त्यांनीं मिळविलें तितकी चिकाटी व यश रजपूत, शिख किंवा हिंदूंतील अन्य कोणाहि जातीनें धरली नाहीं, मिळविलें नाहीं. हिंदुधर्मावरील संकट दूर करून हिंदु जातीला मुसलमानांचे दास्यांतून मुक्त करावयाचें व तें केवळ महाराष्ट्रांतील हिंदुधर्मीय वा हिंदु जातीयापुरतेंच नव्हे तर अखिल भारतवर्षांतील हिंदुधर्मीयांस व हिंदु जातीयांस मुसलमानांच्या कचाट्यांतून सोडवावयाचें व मुसलमानांच्या परकीय व परधर्मीय राज्याचा उच्छेद करून तेथें हिंदूंचें स्वतंत्र राज्य हिंदुधर्माच्या भगव्या झेंड्याचे अधिष्ठानाखालीं स्थापन करावयाचें हाच तत्कालीन महाराष्ट्राचा अंतर्गत हेतु होय, हेंच त्यांचें ब्रीद होय व हेंच महाराष्ट्रधर्माचें विशेष उद्दिष्ट होय. हें उद्दिष्ट न समजतां व हें मर्म लक्षांत न घेतां मराठ्यांच्या इतिहासाचें अध्ययन करणें म्हणजे श्रीकृष्णाची भूमिका गाळून महाभारत वाचण्यासारखेंच आहे. यास्तव मुसलमानांच्या सत्तेला उलथून पाडून त्या सहा शतकांच्या हिंदुस्वातंत्र्याच्या प्रचंड युद्धांत विजय मिळविल्याचा मुख्य मान व अग्रपूजा महाराष्ट्रासच दिली पाहिजे. त्यांनीं हिंदुपदपादशाहीच्या ध्येयाची स्पष्ट गर्जना केली. त्यांनींच तें ध्येय बहुतांशीं यशस्वी करून हिंदुपदपादशाही वास्तवतः स्थापन केली. राजपुतांनीं शेवटीं शेवटीं तो नाद सोडून देऊन मोगलपादशाहीशीं शरीरसंबंधहि केले. शिखांनीं पंजाबमध्यें जरी यश संपादन केलें तरी दिल्लीपर्यंतहि त्यांची सत्ता वाढूं शकली नाहीं. तथापि ते दोघे हिंदूच होते. त्या दोघांचेही इतिहास शौर्य, स्वधर्मार्थ केलेलें प्राणदान व राष्ट्रीय हौतात्म्य या दिव्य गुणांच्या प्रकाशानें उज्वल झालेले आहेत व आम्हां अखिल हिंदूंस त्यांचाहि योग्य तो अभिमान व गर्व वाटत आहे. श्रीशिवछत्रपति व प्रताप, श्री रामदास व गुरुगोविंदसिंह, भाऊसाहेब व वीरबंदा हे थोर पुरुष कोणाहि एका प्रांताचे, उपजातीचे वा पंथाचे नसून ते अखिल हिंदुजातीचे आहेत.

इतकेंच नव्हे आम्हांस तर शिखांचा वा रजपुतांचा वा मराठ्यांचा इतिहास हे शब्दप्रयोग केवळ सापेक्षतःच तेवढे ग्राह्य वाटत असून यथार्थरीत्या पाहिलें असतां ते निरनिराळे इतिहास एका हिंदु जातीच्या इतिहासाचे केवळ विभाग वा उपच्छेदच वाटतात. हे इतिहास, त्यांतील शौर्यादि गुणांचे प्रकर्ष व कातर्यादि अवगुणांचें नीचत्व, ह्यावर कोणाहि एका प्रांताची वा उपजातीची मत्ता नसून सर्व हिंदु जातीची आहे. महाराष्ट्रांतील इतिहास जितका आम्हांस आमचा वाटतो तितकाच शिखांचाहि वा रजपुतांचाहि आम्हांस आमचा वाटतो. परंतु जेव्हां त्यांतील एका पंथाचें वा उपजातीचें विशिष्ट वर्णन वा तौलनिक महत्व ठरविण्याचा प्रयत्न केला जातो व त्यांत महाराष्ट्रीय वीरांची वे त्यांच्या कृत्यांची अन्याय्य अवहेलना होते तेव्हां मात्र व तितक्याच पुरतें महाराष्ट्राच्या इतिहासाचें विशिष्टत्व दाखवावें लागतें. या पलीकडे एक क्षणभरहि हा इतिहास शिखांचा वा हा मराठ्यांचा वा हा रजपुतांचा हा भेदभाव मनांत न धरतां सिंधुनदीपासून दक्षिण सिंधुपर्यंत जेथें जेथें कोणी महापुरुष उत्पन्न झाला वा महत्कार्य केलें गेलें तो तो पुरुष व तें तें कार्य अखिल हिंदूंच्या अखंडनीय इतिहासांतील केवळ एक प्रकरण असून त्याचा अभिमान व ममत्व सर्व हिंदूंस सरसहा वाटणें अवश्य आहे असेंच आम्हांस वाटतें.

म्हणूनच महाराष्ट्रभाषेंत परदेशीय व स्वदेशी इतिहासावर इतके ग्रंथ असूनहि आपल्या हिंदूंच्या इतिहासांतील शिखेतिहासाच्या अध्यायावर एकहि ग्रंथ नसावा याचें आम्हांस राहून राहून वाईट वाटत आलें आहे. मागें एकदां बॅरिस्टर विनायकराव सावरकर यांनीं शिखांचा एक आद्योपान्त सुंदर इतिहास अनेक ग्रंथांचे व स्वतः शिखांच्या गुरुमुखींतील ग्रंथांचें अध्ययन करून लिहिला होता. परंतु अभिनव भारताच्या राज्यक्रांतिकारक धामधुमींत जेव्हां " परंतु वारे क्रुद्ध वर्षले अग्निशिला धारा " तेव्हां " महाराष्ट्र वाग्सुंदरीसवें * श्री गोविंदातें । निवास जेथें सुवर्णमणिमय सुंदर मंदिर तें ॥—" तेंहि उन्मळून पडलें ! त्या इतिहासांत ऐतिहासिक साधार सत्याविना प्रचलित राजकारण मुळींच नव्हतें तेव्हां त्यास तरी केवळ विनायकरावांनीं तो लिहिला एवढ्याचसाठीं

* श्री गुरु गोविंदसिंहाचा—अर्थात् शिखांचा इतिहास.

सेन्साऱ्च्या कोपानलकुंडांत भस्म करून टाकण्यांत येणार नाहीं असें वाटलें होतें. पूर्वी कोणी कोणी रानटी लोक वाङ्मयासहि शत्रु समजून त्याचें भस्म करून टाकीत. परंतु या शतकांत तरी केवळ वाङ्मय, प्रचलित राजकारणाशीं संबंध नसतांहि नष्ट केलें जाईल असें वाटत नव्हतें. परंतु " जिथें न शकती शिवूं क्रांतिचे अग्निमेघ बारे । तिथेंहि शकले शिवूं क्रांतिचें अग्नि मेघ, वारे ! ॥ " सावरकरांच्या त्या शिखेतिहासानंतर त्या विषयावर दुसरें कोणतेंहि पुस्तक अजून प्रसिद्ध झालेलें आम्हांस तरी माहित नाहीं. असलेंच तर अत्यंत अप्रसिद्ध व एतदर्थ नसल्यासारखेंच आहे. ज्या महाराष्ट्र-भाषेंत राष्ट्रकथामालेसारख्या अनेक मालांतून जगाचा बहुतेक इतिहास थोड्या फार प्रमाणांत लिहिला गेला आहे; जींत बिस्मार्क व नेपोलियन सारख्यांची दोन दोन तीन तीन विस्तृत चरित्रें प्रसिद्ध झालेलीं आहेत. तींत श्री शिवाजी, प्रताप, बाजीराव इत्यादि हिंदुवीरांशीं समकक्ष असलेल्या हिंदुजातीच्या गौरवाचें स्थान व हिंदवी हौतात्म्याचा ( Martyrdom ) मूर्तमंत्र अशा गुरु गोविंदसिंहाचें एकहि सुंदर चरित्र असूं नये. ही खरोखरच लज्जेची गोष्ट आहे. महाराष्ट्र भाषेंत शिखांचा इतिहास नसल्यामें त्यांच्या वीर पुरुषांचा व पौरुषाचा परिचयहि महाराष्ट्र जनतेंत अतिशय अल्प आहे. श्री गुरुगोविंदांचें वा वीर वैरागी बंदा वीराचें नांवहि माहीत नसलेले शेंकडो सुशिक्षित लोक आम्हीं पाहिलेले आहेत. हें खरोखर पाप आहे. या पापाचें प्रायश्चित्त घेण्यास कोणीतरी महाराष्ट्र लेखक लवकरच निदान शिखांचा सर्वांगसुंदर इतिहास लिहून प्रसिद्ध करील तर आम्हीं ही प्रस्तावना लिहिल्याचा अंशतः तरी उपयोग झाला असें समजूं.

सांगोपांग शीख इतिहास जरी नसला तरी त्या इतिहासांतील अत्यंत तेजस्वी, हिंदुधर्माभिमानी व राष्ट्रस्वातंत्र्यप्रेमी वीरांमध्यें, अग्रणीमध्यें व हुतात्म्यांमध्यें एका श्री गुरुगोविंदसिंहाव्यतिरिक्त अग्रगण्य झालेल्या वीर वैरागी बंदा वीराचें हें चरित्र भाषांतर करून लोकांपुढें आणलें असतां त्या वीरात्म्याच्या व हुतात्म्याच्या पूजेस एक पान तरी महाराष्ट्राकडून वाहातां येईल असें समजून आम्हीं हें भाषांतर हातीं घेतलें. हा ग्रंथ मूळ हिंदी व उर्दू भाषेंत पंजाबचे प्रख्यात देशभक्त प्रो० परमानंद यांनीं लिहिलेला आहे. बंदावीराचें इतक्या मार्मिक रीतीनें लिहिलेलें हें एकच पुस्तक अखिल हिंदुस्थानांत उपलब्ध आहे. प्रो० परमानंद हे स्वतः विद्वान् असून इति-

हास हा त्यांचा इतका आवडता विषय आहे कीं, इंग्लंडमध्यें या विषयाचे अध्ययनांत त्यांनीं कांहीं वर्षें घालविलीं आहेत. सरकारी पत्रकें, दप्तरें व जुने दुर्लभ ग्रंथ हुडकीत, शोधीत, उतरीत, त्यांनीं दिवसचे दिवस जगांतील एका अप्रातिम ग्रंथसंग्रहालयांत–ब्रिटिश म्युझिअममध्यें–घालविले. पुढें त्या सर्व ज्ञानाचा लाभ अंशतः आपल्या देशबंधूंस देण्यासाठीं त्यांनीं एक हिंदुस्थानचा इतिहासहि लिहिला. परंतु इंग्लंडमध्यें असतांनाच तिकडे चाललेल्या अभिनव भारताच्या गदर इत्यादि क्रांतिकारक चळवळींत त्यांचेंहि अंग असावें अशा संशयावरून त्यांचेवर जेव्हां लाहोरला दोनदां खटले झाले तेव्हां तो इतिहास जप्त झाला. परमानंदांस प्रथम फांशीची व नंतर जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा झाली. त्या भयंकर प्रसंगांत त्या देशभक्ताचे काय काय हाल झाले, त्यांचेवर आलेल्या आरोपाविषयीं व झालेल्या या शिक्षेविषयीं त्यांचें स्वतःचें काय म्हणणें आहे तें सर्व वर्णन ते जेव्हां राजघोषणेमध्यें जन्मठेपीच्या शिक्षेची सूट मिळून, ५ वर्षें काळ्यापाण्याचा कठोर भोग भोगून परत घरीं आले तेव्हां त्यांनीं लिहिलेल्या आपल्या आत्मचरित्रांत ग्रथित केलेलें आहे. त्यांना हिंदुधर्माचा व जातीचा सात्त्विक अभिमान असून परदेशांत त्यांनीं धर्मप्रसाराचें महत्कार्य केलेलें आहे.

अफ्रिकेंत व दक्षिण अमेरिकेंत ठिकठिकाणीं आर्यसमाजाचे प्रचारकार्यासाठीं हिंडत असतांना जगभर विखुरलेल्या हिंदुधर्मीयांस एकत्र करून त्यांचें मृतप्राय होत चाललेलें धर्मजीवन पुनरपि उज्जीवित करून प्रो० परमानंदांनीं शेंकडों हिंदुधर्मीयांस खिस्त्यांच्या कळपांत कोंडलें जातां जातां परत स्वधर्मात आणलेलें आहे. आम्हीं निःशंकपणें असें म्हणतों कीं भारताबाहेर वसणाऱ्या व वाढत असणाऱ्या महत्तर भारतांत स्वसंस्कृतीचें चैतन्य उपजविण्यांत व त्यांची थोडी फार धार्मिक संघटना करण्यांत चित्त घालण्याचा व तो विषय हिंदु लोकांच्या दृष्टीसमोर प्रामुख्यानें मांडण्याचा प्रथम सन्मान प्रो० परमानंद यांनाच दिला पाहिजे. माडर्न रिव्ह्यूमध्यें दहाबारा वर्षांपूर्वीं त्याचा " महत्तर भारत " नावाचा लेख ज्यांनीं वाचला असेल त्यांना स्वजाति व स्वधर्म याविषयींच्या या ज्ञानवृद्ध देशभक्ताच्या सात्विक आकांक्षा काय आहेत हें स्पष्ट कळून चुकलेंच असेल, या अल्पस्वल्प उल्लेखापेक्षां त्यांचा अधिक परिचय महाराष्ट्रवाचकांस करून देण्याचें हें स्थळ नव्हे. इतकेंच सांगतों कीं, त्यांचें वर उल्लेखिलेलें आत्मवृत्त हिंदी-

तून वाचलें असतां वाचकांस त्यांच्या देशसेवेची व आयुःक्रमाची यथास्थित कल्पना करतां येईल. त्यांनीं अंदमानांत असतांना गीतेवरही एक तात्विक ग्रंथ हिंदीमध्यें लिहिलेला आहे. शीख इतिहासावर तर त्यांचें आबाल्य अध्ययन होत आलें आहे. अशा एका विद्वान्, प्रसिद्ध ऐतिहासिक, जाज्वल्य देशभक्त, धर्मप्रेमी, धर्मप्रचारक व स्वदेशार्थ कष्ट सहन करून पावन झालेल्या लेखकानें लिहिलेल्या व वीर वैरागीसारख्या महापुरुषाचा आयुःक्रम हें कथानक लेख्य असलेल्या या ग्रंथाचे महत्वाविषयीं अधिक कांहीं प्रस्तावना करणें अवश्यक नाहीं.

केवळ एक दोन ऐतिहासिक विधेयासंबंधीं मात्र उल्लेक करणें येथें इष्ट व अवश्यक आहे. थोर पुरुषांत कोणीहि सर्वांशीं सर्व दृष्टीनें व सर्वकालिक रुचिपरत्वें थोर ठरणें जितकें कठिण आहे तितकेंच कोणत्याहि दोन थोर पुरुषांत सर्व प्रकारचें साम्य असणेंहि अशक्य आहे. भिन्न परिस्थिति भिन्न गुणावगुण, भिन्न दृष्टिकेंद्रानें पाहिलें असतां एकच दृश्य निरनिराळें दाखविण्याचा दृष्टीचा स्वभाव यामुळें दोन थोर पुरुषांत अधिक थोर कोण हें दोन समभुजचौकोनांत अधिक विस्तृत कोण हें जसें निश्चयानें सांगतां येतें तसें सांगणें फार कठिण आहे. श्रीशिवाजी, गुरु गोविंदसिंह, श्रीप्रतापसिंह, वीर वैरागी बंदा वा बुंदेलवीर छत्रसाल यांत थोर कोण हा वाद, गुलाब–चमेली–जाई–सोनचांफा या फुलांत अधिक आनंदकारक सुवास कोणाचा या वादाइतकाच व्यर्थ होय. हे सर्वच आपआपल्या परीनें थोर होते इतकेंच म्हणणें युक्त आहे. त्यांतहि तुलना करतां येईल, पण कांहीं गुणांत एक श्रेष्ठ तर इतर गुणांत दुसरा अशी स्थिति असल्यानें सर्वांगिक श्रेष्ठता स्थापन करणें कठिण भासणार हें उघड आहे. केवल एकच कोणता गुण वा कसोटी घेऊन त्या गुणांत व त्या कसोटीस अमुक एक थोर पुरुष दुसऱ्यापेक्षां अधिक उतरतो इतकें कांहीं अंशीं म्हणतां येईल. उत्तम मार्ग म्हटला म्हणजे हे पुरुप सर्वच देशभक्त, स्वातंत्र्यवीर, व हिंदू जातीच्या अत्यंत प्रकर्षाच्या उदाहरणीय विभूति होत असें जाणून आम्हां हिंदूंनीं त्यांचा सर्वांचा अभिमान व कृतज्ञता निर्विशेषपणें हृदयांत धारण करावी.

बंदावीराचें तेज व प्रभाव हा स्वयमेवच इतका जाज्वल्य आहे कीं, तो अधिक वाढविण्याकरितां हिंदूंच्या इतर महापुरुषांच्या प्रभावळींतील कांहीं

तेजःपुज किरणें चोरून तीं त्या प्रभावळींत तिला अधिक तेजस्वी करण्याकरितां खचित बसण्याची मुळींच अवश्यकता नाहीं. बंदा वीर आम्हां हिंदूंत एक अत्यंत अद्वितीय हुतात्मा होऊन गेला. पण म्हणून श्री शिवरायासारख्या अनेक इतर विभूतीहि आपआपल्या परी अद्वितीयच आहेत हें असिद्ध होत नाहीं. तेव्हां बंदावीराचें विशिष्ट महत्व स्थापन करण्याच्या धांदलींत महाराष्ट्राच्या इतिहासांत केवळ हिंदुधर्माकरितां कोणीच लढले नाहींत वा तो इतिहास प्रांतिक होता इत्यादि अन्याय्य व असत्य विधानें करण्याची कांहीं एक अवश्यकता नाहीं. महाराष्ट्राचा इतिहास हिंदुधर्मगौरवार्थ होता कीं नव्हता हें सिद्ध करीत बसण्याचें हें स्थल नव्हे किंवा सूर्य दिवसा प्रकाशतो हें सांगत बसण्याप्रमाणें तशी अवश्यकताही नाहीं. इतकें सांगितलें असतां पुरें आहे कीं, हिंदुस्वातंत्र्ययुद्धाच्या समरगंगेचा उगम ज्याच्या जटेंतून झाला तो एक महाराष्ट्रीय वैरागीच होता. श्रीबंदावीर तीर्थाटन करीत करीत त्या गंगेच्या तटाकावर पोचण्यापूर्वींच तिचे कांठीं ' हिंदुपदपादशाही ' च्या सिध्यर्थ समरयज्ञ आरंभून त्या दीप्त हुताशनांत अनेक महाराष्ट्रीय हुतात्म्यांनीं आपले देह आधींच बळी दिलेले होते !

इतकेंच नव्हे तर शीखांच्या इतिहासाचें समालोचन करितांना व महाराष्ट्रीय इतिहासाशीं त्याचा तौलनिक सामना करीत असतांना आणखी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. वास्तविक आम्हांस हे दोन्हीहि इतिहास एकाच इतिहासाचे दोन अध्याय वाटत असून अशा तुलनेचे प्रयत्न प्रादेशिक व प्रांतिक दुरभिमान वाढविण्यास मात्र साधनीभूत होतात, असें वाटत असल्यानें हानिकारक व अनवश्यक दिसतात. हें आम्हीं प्रथमच सांगितलें आहे. पण एकदां एका पक्षाकडून असा प्रयत्न झाल्यास त्याचें योग्य समालोचन न केल्यानें दुसऱ्या पक्षावर अन्याय होतो तो टाळण्यापुरताच व ऐतिहासिक सत्याच्या कसोटीस उतरेल तितकाच प्रयत्न करणें हेंहि अपरिहार्यच होतें. व त्यापुरतेंच येथें इतकेंच सांगून ठेवतो कीं, स्वतः गोविंदसिंह किंवा बंदावीर ह्यांना पंजाबमध्यें मुसलमानी सत्तेशीं जें कधीं कधीं यशस्वी रीतीनें झुंजतां आलें तें त्यावेळेस मुसलमानी साम्राज्याची सर्व सेना, सर्वनिधि, सर्वयुक्ति व सर्वशक्ति महाराष्ट्रावर येऊन कोसळली असतां त्या शक्तीचीं हाडेंनहाडें महाराष्ट्रानें खिळखिळीं करून तिला पंजाब, राजपुताना इत्यादि इतर हिंदु प्रांतांत चाललेल्या हिंदू

उत्थानांना दडपून टाकणें अशक्य करून टाकलें असतांनाच होय. ह्या योगें तिकडे मिळालेल्या यशाचा पुष्कळसा भाग महाराष्ट्राचा आहे हें उघड आहे. परंतु त्यामुळें तिकडे लढणाऱ्या आमच्या वीरांच्या शौर्यास, धैर्यास वा हौतात्म्यास रतिभरही कमीपणा येत नाहीं, हेंहि आम्हीं प्राजळपणेंच नव्हे तर अभिमानानें सांगतों. महाराष्ट्रानें पंजाबमधल्या बांधवांस अप्रत्यक्ष साह्य केलें हें त्यानें त्याचें कर्तव्यच केलें. महाराष्ट्राशीं लढतांना मराठ्यांच्या तरवारीनें जिचे पंजे छाटून टाकले अशा निर्नखर झालेल्या मोंगल-शक्तीशीं लढून पंजाब स्वतंत्र करण्याचें कार्यहि श्रीगुरुगोविंदसिंहादि वीर झाले नसते तर पुष्कळच कठिण झालें असतें. पंजाबमध्यें युद्धें सुरू झाल्यानें इकडे मराठ्यांसहि माघून मोंगलाचा प्रतिकार करणें ढिलें गेलें. पण जेव्हां मराठ्यांची शक्ति मोंगलांच्या जबड्यांत हात घालून दिल्ली देखील हिसकण्यास सरसावली होती त्यावेळेस हें साह्य झालेलें असल्यानें त्या साह्याचें महत्व, मराठ्यांशीं लढतांना मोंगलांच्या झालेल्या शक्तिपातानें पंजाबची उभारणी करण्यांत शिखांना मिळालेल्या साह्याहून पुष्कळ कमी ठरते हें उघड आहे.

दुसरी गोष्ट ही कीं, घोरीपासून बद्धमूल झालेल्या परदास्याचा विषवृक्ष हलवून, हदरून, छाटून त्याच्या छायेंत मरणासन्न झालेल्या पंजाबास अंशतः व अल्पकाल स्वतंत्र करण्याचें महत्कार्य बंदावीर साधतो न साधतो तोंच शिखांत फाटाफूट होऊन त्या महान् वीरपुरुषाचा घात झाला व पंजाबांतील जो थोडा भाग स्वतंत्र झाला होता तोहि पुन्हां मोंगलाच्या पंजांत फसला. पण दिल्लीपासून अटके पावेतों मोंगलाच्या विषवृक्षास हालवून हादरून छाटून समूळ उपटून टाकण्याचें कार्य महाराष्ट्रीय तरवारीनेंच केलें. घोरीच्या विजयानंतर अटकेवर पुन्हां विजयोत्सवानें सन १७६० ( शके १६८१ ) सालीं जो हिंदूंचा ध्वज फडकला तो मराठ्यांचा भगवा झेंडा होय. शिखांचे आर्धी, रजपुतांचे आर्धी, मुसलमानी सत्ता पंजाबांत उलथून पाडून हिंदूराज्यश्रीस परक्यांच्या बंदींतून मराठ्यांनीं सोड-विली व इतकेंच नव्हे तर पानिपतास भयंकर संग्राम करून आपल्या दोन लाख लोकांच्या रणांत पडलेल्या प्रेतांचा अनुल्लंघ्य कोट रचून पंजाबास एका बाजूनें दिल्लीकडून व दुसऱ्या बाजूनें अटकेकडून महाराष्ट्रानें जवळ जवळ सुरक्षित करून ठेवलें. त्यापुढें दिल्ली पन्नास वर्षें मरा-

त्यांचे हातांत राहिली असल्यानें व अटकेवरून खालीं उतरण्याचें साहस पठाणी घोड्यास पानिपतच्या प्रसंगानंतर फारसें न झाल्यानें पंजाबांत शिख सत्तेला हां हां म्हणतां आपला जम बसवितां आला. पंजाबमध्यें मराठी नांगरानें मोंगलांच्या विषवृक्षाचीं पाळेंमुळें उपटून उकरून ती भूमि निष्कंटक व मराठी रक्ताचे पाट ओतून उर्वर करून तिला दिल्लीकडून स्वतःच्या तरवारीचें व अटकेकडून पानिपतच्या बलिदानाच्या कोटाचें कुंपण घालून परधर्मीय हिंस्र टोळधाडीस आंत सरसहा घुसणें कठिण केलें. मग तींत शिखांनीं राहिलें साहिलें कार्य करून तींत आपल्या धर्मनिष्ठेचें व स्वातंत्र्यप्रियतेचें बीज पेरून ती शेती वाढविली. नंतर रणजितसिंगाच्या विक्रमाच्या छायेखालीं हिंदुराज्याच्या फुलांहीं व फळांहीं ती डवडवून गेली. हें ऐतिहासिक सत्य सांगण्यांत शिखांच्या शौर्याचें, धैर्याचें त्यांनीं दाखविलेल्या स्वातंत्र्यप्रेमाचें व तदर्थ अर्पिलेल्या बलिदानाचें मूल्य एक रतिभरहि कमी होत नाहीं ! परंतु त्याचें तें मूल्य त्यांस देतांना महाराष्ट्रीय वीरांच्या भगीरथ प्रयत्नांचें व संपादित यशाचें मूल्यहि हरण करणें योग्य नाहीं. दोघेहि आमचेंच, आम्हांस दोघांचाहि अभिमान आहे. दोघेहि हिंदूच, हिंदुस्वातंत्र्यार्थच दोघांनींहि झुंज मारली व म्हणूनच आम्ही त्या दोघांत कोणाचाहि पक्षपात करूं इच्छित नाहीं.

हें सिद्ध करण्यासाठींच नसलें तरी हें अनायासेंच सिद्ध होईल म्हणून पण विशेषतः श्रीवीराग्रणी बंदाच्या महान् हौतात्म्याचें यथार्थ गुणवर्णन करून आमची कृतज्ञता व आदर लेशमात्र व्यक्त करण्यासाठीं आम्हीं श्री. ब्यारिस्टर विनायकराव सावरकर यांचे बंदावीरावरच रचली गेली नसली तरी जींत बंदावीराच्या हौतात्म्याचा [illegible] झालेला आहे—अशा एका कवितेंतील बंदावीराच्या संबंधाचा भाग या पुस्तकाचे शेवटीं दिलेला आहे. ब्या. विनायकरावांनीं श्रीगुरुगोविंदसिंगावरहि एक अत्यंत भावपरिप्लुत व स्फूर्तिदायक कविता लिहिलेली आहे पण ती फारच लांब असल्यानें येथं देत नाहीं. या दोन्हीहि कविता त्यांनीं १९१०–११ सालीं त्यांस झालेल्या कठोर शिक्षेचा पहिला धक्का सहन करण्यासाठीं कवचमंत्र म्हणून लिहिलेल्या आहेत. श्रीबंदावीरावरील जी कविता या पुस्तकांत पुढें दिली आहे ती " दोन मूर्ति " म्हणून रचिलेल्या एका कवितेंतील केवल एक भाग आहे.

भाषांतराचें काम करीत असतां कांहीं ठिकाणीं महाराष्ट्रवाचकांस शिखेतिहास अपरिचित असल्यानें दुर्बोध वाटलेल्या संबंधाच्या स्पष्टीकरणाच्या व कांहीं प्रश्नांची चर्चा अधिक स्पष्ट करणाऱ्या आमच्या टीपा आम्ही दिल्या आहेत. पण त्याची जबाबदारी आमच्चेवरच असल्यानें व मूळ ग्रंथांत ग्रंथकारांचेंच म्हणणें जसेंचें तसें देणें न्याय्य असल्यानें आम्ही त्या टिपणी कंसांत घातलेल्या आहेत. तेव्हां अशा कंसांत घातलेल्या सर्व टिपणी भाषांतरकारांच्या आहेत हें वाचक लक्षांत ठेवतील अशी आशा आहे.

भाषांतरकर्ता

---

मराठी ग्रंथ संग्रहालय

मराठी ग्रंथ संग्रहालय नं. २५९८ ता. ... श्री. ... ठाणे

# प्राक्कथन.

श्री एका महापुरुषाचें जीवनचरित्र लिहिण्याचा येत्न केला आहे. कारण त्याच्या चरित्राकडे लोकांचें फारसें लक्ष गेलें नाहीं. हिंदुस्थानच्या इतिहासाच्या परिशीलनानें माझी खात्री होऊन चुकली आहे कीं, जो 'बंदा वैरागी' या नांवानें साधारणतः इतिहासांत ओळखला जातो तो एक केवळ असाधारण पुरुष होता. मला या महापुरुषाच्या चरित्रांत जी एक उत्कटता दिसून येते, ती उत्कटता हिंदुस्थानांतीलच नव्हे, तर जगांतील कोणत्याही असाधारण समजल्या जाणाऱ्या व्यक्तींत दिसून येत नाहीं. दिव्य पुरुषांची परस्परांत तुलना करणें व्यर्थ आहे; तथापि, 'वैरागी'च्या आयुष्यक्रमांत त्याच्या अंगचे जे गुण दृष्टीस पडतात ते गुण महाराणा प्रतापसिंहामध्येंहि दिसून येत नाहींत किंबहुना शिवाजीमध्येंहि दिसून येत नाहींत ! मुसलमानी राज्याच्या कालांत या 'वीरां'चा आदर्श हा खरा जातीय आदर्श होता. हिंदु पादाक्रांत व परतंत्र स्थितीमध्यें होते. 'वैरागी' एक पक्का हिंदु होता. शीखांमध्यें केवळ आपल्या पंथासाठींच प्रेमभावाचें उदीत स्वरूप कार्य करीत होते. रजपुत आणि मराठे आपापल्या प्रांतालाच देश समजून स्वस्थ होते. (उदेपूरचा महावीर संगराणा, हिंदुधर्मरक्षक श्रीशिवाजी महाराज रणशूर बाजीराव, राजकार्यधुरंधर नानासाहेब, अखिल भरतखंडाला एकछत्री राष्ट्र बनविण्याच्या दिव्य कल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप देण्यासाठीं अविश्रांत व भगिरथ प्रयत्न करीत रणांगणावर ज्यांनीं आपला देह राष्ट्रसेवेंत अर्पण केला ते भाऊसाहेब, सर्व भरतखंड ज्या एका नक्राच्या दाढेंत चाललेला दिसत होता त्या नक्राचा नायनाट करण्यासाठीं व अखिल देशाला संकटमुक्त करून निर्भय करण्यासाठीं ज्यांनीं आमरण अव्याहत दांडगा प्रयत्न चालू ठेवला ते राजकारणपटु

नानासाहेब अर्वाचीन भारतेतिहासांत जोंपर्यंत चमकत आहेत तोंपर्यंत वरील आक्षेपांत ते येऊं शकत नाहींत. ) ' वैरागी ' केवळ एका विशिष्ट पंथाचा वा प्रांताचा झाला नाहीं. त्याच्या अंतःकरणांत हिंदुधर्म व हिंदुजाती याबद्दल अगाध प्रेम वसत होतें. मुसलमानांकडून हिंदूंवर होणारे अत्याचार पाहून त्याचें रक्त सळसळूं लागे. आणि हिंदूंना चिरडण्यास्तव मुसलमान जीं जीं साधनें उपयोगांत आणीत त्या त्याच साधनांचा, ' वैरागी'नें हिंदूंवरच्या अत्याचारांचा सूड घेण्यांत उपयोग केला.

जगामध्यें, आपल्या देशासाठीं व जातीसाठीं काम करीत असतां ज्यांनीं प्राणांची आहुति दिली आहे असे महात्मे होऊन गेले आहेत. कित्येक असेहि झाले आहेत कीं, ज्यांनीं श्रद्धास्वातंत्र्यासाठीं कष्ट सहन करून धर्मासाठीं आपले प्राणांचे बळी दिले आहेत. शेकडों युद्धांमध्यें यशस्वी होऊन दिगंत कीर्ति संपादन करणारे सेनानायक झाले आहेत, कांहीं असेहि झाले आहेत कीं, एखादद्दुसऱ्या अपयशाच्या व संकटाच्या तडाक्यानें जगापासून परावृत्त होऊन दूर झाले. आमच्या चारित्रनायकांत या सर्व गुणांचा समवाय दृष्टीस पडत आहे. राजपूत * लक्ष्मणाला शिकार करीत असतां एका हरिणीच्या दीन स्थितीची कींव येऊन दयाममता उत्पन्न झाली. तत्काल घर-दार, गणगोत वगैरे सर्वांचा त्याग करून त्यानें तपोव्रत धारण केलें. हा याच्या आयुष्याचा पहिला अंक झाला.

जेव्हां गुरुगोविंदसिंह पंजाब सोडून दक्षिणेंत गेले तेव्हां तेथें त्यांची व ' वैरागी'ची भेट झाली. तेव्हां त्यांनीं ' वैरागी'ला हिंदुधर्म व हिंदुजाती यांची दुःखमय अवस्था स्पष्ट करून दाखविली आणि ' वैरागी'चें ' सेनानायकांत ' परिवर्तन झालें. या सेनानायकाच्या प्रभावानें सर्व जग चकित होऊन गेलें. 'वैरागी' हा पहिला पुरुष झाला, ज्यानें लाहोर शिवाय करून बहुतेक पंजाब जिंकला व हिंदु राज्याचा पहिल्या प्रथम पाया घातला. जर या दुर्दैवी हिंदुस्थान देशाचा जुनाट रोग उपस्थित झाला नसता तर ' वैरागी'नें गुरुगोविंदसिंहाचें कार्य पूर्ण केलें असतें.

---

* लक्ष्मण—हें ' वैरागी'चें पूर्वाश्रमीचें नांव होतें.

'वैरागी 'च्या जीवनचरित्रांत * 'हुतात्मता ' ही सर्वांत प्रमुख घटना आहे. या जगांत पुष्कळ हुतात्मे होऊन गेले. परंतु 'वैरागी 'नें, ज्या वेदना व क्लेश सहन करीत प्राण दिले व ज्या शौर्यानें त्या कष्टांना तोंड दिलें त्या वेदनांचे व क्लेशांचे वेळीं तसल्याच शौर्यानें केलेल्या आत्मबलिदानानें त्याची हुतात्मता अद्वितीय व अभूतपूर्व असल्यामुळें, इतिहासांत ती अजरामर होऊन राहिली आहे.

या सर्व गोष्टीमुळें 'वैरागी'चें चारित्र खऱ्या खऱ्या जातीय आदर्शवीराचें जाज्वल्य उदाहरण वाचकांच्या दृष्टीपुढें मी ठेवीत आहें. त्यावेळीं हिंदुलोक त्याला कल्कीचा अवतार मानीत होते आणि मला वाटतें कीं आतांहि त्याला अवतारवत् मानणें अनुचित होणार नाहीं, या 'वैरागी 'चें जीवनचरित्र सतत आपल्या दृष्टीसमोर ठेवणें हें प्रत्येक हिंदुमात्राचें कर्तव्य आहे.

शीखांच्या या पुढील काळांत त्यांच्या इतिहासाचा बहुतेक भाग विशिष्ट सांप्रदायाच्या रंगानें रंगला गेला आणि 'वैरागी ' हा त्या शीखपंथाचा एक घटक झाला नाहीं म्हणून त्यांचें चरित्र लोकांच्या दृष्टीआड झालें. 'वैरागी ' हिंदुस्थानच्या घोर कलियुगाच्या एका कालखंडांतील अवतार होता. परंतु हिंदूनीं आपल्या या खऱ्या खऱ्या हितकर्त्यांच्या गुणांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचें कर्तव्य केलें नाहीं; किंवा त्यांना तसें करण्याला अवसरच मिळाला नाहीं. पण मला आशा आहे कीं हें लहानसें पुस्तक ही कर्तव्यविस्मृति घालविण्याला उपयोगी पडेल.

---

* हुतात्मता वा हौतात्म्य= Martyrdom, शहादत. ज्यांनीं देशासाठीं, धर्मासाठीं, जातीसाठीं वा एखाद्या महान् तत्वासाठीं भयंकर प्रतिरोधाशीं झगडण्यांत अनेक खडतर कष्ट सोसले व प्रसंगीं प्राणाच्याहि आहुति दिल्या ते सर्व 'हुतात्मे ' ( Martyrs वा शहीद ) या पदवीला पोंचतात. आणि हा 'हुतात्मा ' होण्याचा जो दिव्य गुण त्याला 'हुतात्मता ' किंवा 'हौतात्म्य' ( Martyrdom अथवा शहादत ) हें नांव आहे.

# भूमिका

**अतिसे रगड कर जो कोई।**
**अनल प्रगट चंदनसे होई ॥ १ ॥**

तुलसीदासजी.

ज्या काळीं शीखांच्या तुकड्या बादशाही फौजेशीं लढत होत्या त्याकाळीं कित्येक वेळां त्यांतील शिखांनीं, गुरु तेगबहादरचें शिर व धड शत्रूबरोबर लढत आहे, असें पाहिलें. आमच्यांतले पुष्कळसे तर्कवश लोक असें एकदम बोलून उठतील कीं 'हें सर्व खोटें आहे, मृत शरीर लढाईमध्यें भाग घेऊं शकेल असें होणें व शक्य नाहीं, हा केवळ भ्रम आहे, ही कांहीं तरी बनावटी गोष्ट आहे.' संभव आहे कीं असें असूं शकेल. हें आश्चर्यजनक खास आहे. अंधाऱ्या रात्रीं फिरणाऱ्या व्यक्तीच्या डोक्यांत भूत वा पिशाच्च यांची कल्पना थोड्या अवकाशांत मूर्त रूप धारण करते, आणि तदनुसार बाहेरहि तेंच दृश्य दिसूं लागतें. समोरचा एखादा मोठ्याशा झाडाचा बुंधा अथवा झाडी पिशाच्चाचें भयानक स्वरूप धारण करते. जे लोक मिथ्या कल्पनांना थारा देतात अथवा ज्यांचा कोणत्याहि गोष्टीवर जलदी विश्वास बसतो, ते त्या कल्पित वस्तूलाच मूर्त मानूं लागतात, अथवा ती कल्पनाच त्यांना मूर्त स्वरूपानें दिसूं लागते.

गुरूसाठीं आपल्या जिवावरचा खेळ खेळणाऱ्या शीखांच्या डोक्यांत त्यांच्या गुरूंचें आत्मबलिदान भरून राहिलें होतें. जेव्हां ते शस्त्र उपसून रणांगणावर उभे राहत असत, तेव्हां त्यांच्या समोर गुरूची अत्याचारहत मूर्ति मूर्तिमंत उभी राहत असे. यामुळें त्यांना उत्साह मिळे आणि त्यांच्या मनांतील भय पार नाहींसें होई. युद्धक्षेत्रांत जेव्हां जेव्हां चारी बाजूला निराशेचा अंधःकार पसरत असे तेव्हां तेव्हां त्या हुतात्म्याची जिवंत मूर्ति त्यांच्या नजरेसमोर पुनः पुनः उभी राही. तें दृश्य त्यांना इतकें सत्यमय

वाटे कीं गुरु आपले साह्यकारी आहेत हें पाहून ते मोठ्या आवेशानें लढत. विश्वासू व श्रद्धाळू शीखांना असें दृश्य दिसणें अगदीं स्वाभाविक झालें. गुरु तेगबहादूरचें धडापासून वेगळें झालेलें शिर पूर्णपणें ' सत्याग्रही ' होतें. हें युद्ध मुसलमान आणि शीख यांच्यांत नसून अन्याय आणि सत्याग्रह यांच्यांत होतें.

जगांत सामर्थ्यासाठीं, धर्मासाठीं, आणि व्यापारासाठीं युद्धें झालीं आहेत. यांत हजारों लोक मारायला व मरायला तयार होतात. एका पक्षाचे मनांत दुसऱ्या पक्षाबद्दल शत्रुभाव व क्रोधभाव अतिशय तीव्रतेचें स्वरूप धारण करतात. साधारणतः एका मनुष्यानें दुसऱ्याचा प्राण घेणें हें सर्वांत मोठें पाप समजलें जातें. परंतु रणभूमीमध्यें होणारी हत्या पापकृत्य समजलें जात नाहीं. असें कां ? यांच्यांत एकाचें दुसऱ्यापाशीं वैर नसतें; किंबहुना एक दुसऱ्याला नांवानें वा चेहेऱ्यानेंहि ओळखित नसतो. मग हे परस्पर परस्परांचे प्राणघात करावयाला उद्युक्त होतात याचें कारण काय ? हें एक असें आश्चर्य आहे कीं जें लक्षांत यावयास कठिण आहे.

लाखों लोक कोणत्या ना कोणत्या विशिष्ट भावनांचे गुलाम असतात. आणि त्या त्या भावना त्यांच्यावर स्वार होऊन त्यांना पाहिजे तसे नाचवितात. दुर्योधनाचे मनांत एका कल्पनेचा खेळ चालला होता. पांडवांना थोडें-बहुत बल देण्यानें ते त्यांच्या सामन्यांत त्यांच्याहून अधिक बलशाली होतील असें त्याला वाटे. आणि तो तर दुसऱ्याचें वाढतें सामर्थ्य देखूं शकत नसे. त्याच्या अंध पित्याला आपल्या मुलाचे कांहीं दोष दिसूं शकले नाहींत. पुत्रमोहामुळें त्या अंधाची बुद्धीहि अंधच बनली. धृतराष्ट्राचे मंत्री भीष्मपितामह व द्रोणाचार्य यांच्यासारखे महापुरुषहि स्वार्थवशतेनें अंध होऊं पहात होते. भीष्मपितामहांनीं स्वतःच ' मी अर्थासाठीं कौरवांचा पक्ष स्वीकारित आहें ' हें कबूल केलें. कौरवांची सेना कौरवांच्या पक्षाला होती आणि पांडवांची सेना आपलें स्वत्व परत घेण्याची इच्छा करित होती. महाभारतांत या दोन विचारांतील लढा दाखविलेला आहे. युरोपाच्या इतिहासांतील हुतात्म्यांचा वृत्तांत वाचा, एका बाजूला युरोपांतील ख्रिस्ती जाति आपलें तीर्थ जेरूशलेम हें मुसलमानांच्या ताब्यांतून परत घेण्याची शिकस्त करित आहेत; तर दुसरीकडे मुसलमान लोक आपली सत्ता अभंग

ठेवूं पहात आहेत. युरोपांतील मागचें महासमर काय होतें ? जर्मन जाति जगांत आपलें सामर्थ्य अक्षुण्ण ठेवूं इच्छित होती. नेपोलियनप्रमाणें केसरलाहि पृथ्वी आपल्या अंकित करून घेण्याची आकांक्षा होती. आणि इंग्लंड, फ्रान्स वगैरे देश आपली शक्ति अभंग ठेवण्याची धडपड करीत होते. दोन्हीं सैन्यांत देशभक्तीचीच भावना प्रज्वलित झाली होती आणि या भावनेच्या शक्तीमुळेंच हा युरोपचा भयंकर नरमेध घडला.

परस्परवैमनस्य हें राष्ट्रांच्या युद्धाचें कारण नसतें. परस्परांचे विचार परस्परांहून भिन्न व विपरीत असतात. हे विचार आपसांत संघर्षित होतात. विचारांच्या या टकरींत वैमनस्य उत्पन्न होतें. दोन दगड परस्परावर घांसले गेले तर आग उत्पन्न होते. दोन मेघ एकमेकांवर आदळले तर विद्युत् प्रकट होते. गोस्वामी तुलसीदासानें अतिसुंदर शब्दांत याच सिद्धांताचें उपपादन केलें आहे; जेव्हां अतिशय शीतल असा चंदन चंदनावरच परंतु अतिशय जोरानें व वेगानें घांसला जातो तेव्हां त्या चंदनातूनसुद्धां ठिणग्या उडतात. जेव्हां दोन धर्मांचें द्वंद्व जुंपतें तेव्हां ताप उत्पन्न होतो. अर्थात् दोन विचारांच्या संघर्षणामुळें विरोधाची उष्णता निर्माण होते.

हा ताप काय आहे ? ही एक अशी शक्ति आहे कीं कोणत्या तरी विशेष आंदोलनांत ती परिवर्तित होते. हें आंदोलन धार्मिक वा सामाजिक स्वरूपाचें असूं शकतें. एकाच शक्तीचीं हीं भिन्न रूपें मात्र आहेत. भौतिक विज्ञानावरून असें समजतें कीं, विशिष्ट मर्यादेच्या पुढें क्रिया चालू राहिली कीं तिजमुळें उष्णता निर्माण होते; हीच क्रिया चुंबकशक्तीचें अथवा विद्युतचें रूपहि धारण करूं शकते; आणि हीच प्रकाशाचे वेगवेगळे रंग होऊं शकते. क्रिया आणि आंदोलन एकच वस्तु आहे.

मुसलमान शक्ति अरबांची संस्कृति आणि मुसलमानी भाव घेऊन नदीच्या प्रबलवेगी प्रवाहाप्रमाणें फोफावत आली. हिंदु–जाति निश्चिंतता व सुख–भोग यांच्या निशेमध्यें स्वप्नवत् स्थितीमध्यें होती. एकाएकीं तिच्यावर आघात झाला. अकस्मात् आपत्ति आल्यामुळें ती खडबडून उठली. पहिलें आक्रमण तर तिच्या राजांवर झालें. उत्तरीय भारतचे राजे एकएकटे थोडाबहुत प्रतिविरोध करीत असतां आपलें सर्वस्व गमावून बसले.

हातची राजसत्ता समूळ नष्ट होइपर्यंत हिंदूंना आपली मोहनिद्रा सोडण्याचा विचारसुद्धां सुचला नाहीं. जेव्हां मुसलमानी सत्ता दिल्लीमध्यें प्रस्थापित झाली त्यांच्या प्रभावानें आणि हिंदू राजे आपापल्या राजभुवनांमध्यें कांपूं लागले तेव्हां हिंदू लोकांनीं आपले डोळे उघडले आणि याचा पहिला प्रभाव म्हटला म्हणजे हिंदूंच्या मधील धार्मिक जागृतीचा आरंभ हा हो[illegible].

या जागृतीचें आंतील रहस्य सुप्रसिद्ध सुधारक कबीर याच्या जीवनांत व उ[illegible]दशांत दिसून येतें. कबीर रामानंदाचा शिष्य होता आणि बहुतेक काशीमध्य रहात असे. जरी कबीरानें हिंदू व मुसलमानी सिद्धांतांची सारखीच आलोचना केलेली आहे तरी वास्तविक रीत्या त्याच्यामध्यें निष्ठावान् हिंदूचे भाव कार्य करीत होते. कबीराच्या कार्यानें मुसलमानी धर्माच्या प्रसाराला प्रतिरोध करणारी एक शक्ति निर्माण झाली. जरी मुसलमान हिंदूंच्या श्रद्धामय धर्मसमजुतीवर दोषारोप करतात तरी पण खुद्द मुसलमानांमध्येंहि अंधविश्वासाला कांहीं कमताई नाहीं हें कबीरानें हिंदूंना दाखवून दिलें. आणि येवढ्याकरितां हिंदूनें मुसलमानी धर्म ग्रहण करणें म्हणजे तव्यावरून निसटून चुलींत पडण्यासारखें आहे कबीराच्या अनेक गीतांतून हाच भाव प्रगट होत आहे. एकच दृष्टांत पुरे होईल.

**हिंदू कहत है रा[illegible], मुसलमान रहमाना**
**आपस[illegible] रत हैं, मुवदापें लिपटाना**
**[illegible]खा जग बाऊरा । ॥ १ ॥**

अर्थात् हिंदू त्यालाच ‘ राम ’ म्हणतात, ज्याला मुसलमान ‘ रहीम ’ म्हणतात दोन भिन्न नांव देऊन परस्पर लढत आहेत, दुनया कशी भ्रमांत पडली आहे ! !

याच संघर्षानें उत्पन्न झालेली आग गुरु नानकच्या अंतःकरणांत कार्योन्मुख झाली होती.

हिंदू महापुरुषाला अवतार म्हणतात या शब्दांत इतका मोठा अर्थ आहे कीं प्रत्यक्ष परमात्म्यानें जन्म घेतला आहे हीच कल्पना मनांत उभी राहते. परमात्मा स्वतः शरीरधारण करतात किंवा नाहीं हें सांगणें कठिण आहे; परंतु जेव्हां जेव्हां या जगांत धर्म—अधर्म, न्याय—अन्याय, प्रकाश—

अंधःकार यांच्यांत लढा उत्पन्न होतो तेव्हां तेव्हां त्यापासून उत्पन्न होणाऱ्या तेजानें कोणीना कोणी तरी पुरुषाचा अंतरात्मा उद्दीप्त केला जातो. हें दैवी तेज असतें, आणि तो पुरुष या दैवी तेजाच्या सत्तेचें अधिष्ठान होऊन चमत्कार घडवून आणतो. असल्या महात्मा व्यक्तीला आम्ही ' साधारण मनुष्य ' म्हणूं शकत नाहीं. हा महापुरुष या संज्ञेनेंच जाणला जातो. यालाच आम्हीं अवतारहि म्हणूं शकतों. हा चमत्कार त्या दैवी सत्तेचा असतो.

गुरु नानकचे शिख ( शिष्य ) त्यांना आणि त्याच्या उत्तराधिकारी पुरुषांना एकरूप व परमात्म्याचा अवतार मानतात. जी ज्योति गुरु नानकांत प्रकाशित झाली तीच ज्योति त्यांच्या उत्तराधिकारी सर्व पुरुषांत अव्याहत प्रकाशत राहिली आणि याचमुळें असें म्हणतां येईल कीं या दहाहि गुरूंमध्यें एकच आत्मशक्ति कार्य करीत होती आणि म्हणून हे सर्व एकरूप होते. गुरु नानकांचें जीवनकार्य सार्वभौमिक धर्माचा प्रचार करण्याचें होतें यांत संदेह नाहीं. ते परमात्म्याचे एकमेव भक्त होते. त्याचे भक्तीचा प्रसार ते करीत होते. त्यांच्या मतें सर्व मनुष्य परमपित्याच्या दृष्टीनें समान आहेत. हिंदूंना आणि मुसलमानांना ते एकसारखे समजत होते, आणि याकरितां ते खास हिंदु वा मुसलमान होते असें म्हणणें कठिण जातें. मुसलमानी राजसत्तेच्या काळांत एका हिंदु सुधारकाची याहून भिन्न स्थिति होऊंच शकत नाहीं हें आम्हीं विसरतों. जगामध्यें आज हिंदी लोक कौन्सिलांत वा वृत्तपत्रांत ' मनुष्याची समानता ' यावर जोर देत आहेत. कां ? याचें कारण हें आहे कीं शासकजाति आपल्या सजातीयांना उच्चश्रेणीचे मनुष्य मानीत आहे. जेव्हां गुरु नानकाचे आधीं मुसलमानांची सत्ता इतकी बद्धमूल झाली होती कीं हिंदूंना ' काफर ' म्हणण्याचें ते साहस करीत होते, ते आपल्याला हिंदूपेक्षां पुष्कळच उच्च समजत होते, त्यावेळीं मनुष्याचे समानतेचा प्रचार करणें म्हणजे मुसलमानी सत्तेवर आक्रमण करण्यासारखेंच होतें.

एका महान् व्यक्तीचें म्हणणें आहे कीं सर्व धार्मिक आंदोलनें हीं केवल धार्मिक नसून राजकीय असतात. शेंकडों वर्षांच्या पारतंत्र्यानंतर गुरु नानक हाच पहिला हिंदु झाला कीं ज्यानें अन्याय आणि असमानता यांच्या विरुद्ध आपली पहिली आरोळी ठोकली. या आंदोलनानें हिंदू-विचार मंडलांत एक

विशेष परिवर्तन घडवून आणलें. त्यायोगें पंजाबच्या लोकांत आचरणबल व आत्मिकबल यांचा संचार झाला.

गुरु नानकानें आपली गादी आपल्या एखाद्या पुत्राच्या स्वाधीन केली नाहीं. त्या गादीवर त्यांचा एक आज्ञाधारी ' लहणा ' नांवाचा शिष्य बसला. त्यानें आपलें नांव ' अंगद ' ठेवलें. गुरु अंगदनें पंजाबांत सर्व-साधारणांसाठीं गुरुमुखी अक्षरें काढलीं. आणि दुसरी लंगराची रीति, प्रचारांत आणली. गुरुद्वारांत या लंगरांतून प्रत्येक मनुष्य डाळरोटी घेऊं शकत असे. हा लंगर आजपर्यंत शिखांच्या गुरुद्वारांचा एक विशेष आहे. याशिवाय त्यानें गुरु नानकाच्या वाणीचा एकत्र संग्रह करण्यास आरंभ केला.

यांचा एक शिष्य अमरदास म्हणून होता. तो रोज प्रातःकालीं उठून विहिरीवरून गुरूच्या स्नानासाठीं पाण्याचा घडा भरून आणीत असे. एक दिवस तो परत येत असतां रस्त्यांत कोष्टी लोकांच्या खड्ड्यांत पडला. कोष्टी आरडाओरड करूं लागला. त्याची स्त्री म्हणाली ' कोणी नाहीं तोच अमरू असेल. ' या गोष्टीचा गुरूला पत्ता लागला. त्यांनीं आपली गादी अमर-दासाच्या स्वाधीन केली. गुरु अमरदासानें संवत् १६०३ मध्यें ( शके १४६९ ) व्यास नदीच्या किनाऱ्यावर ' गोंदवली ' गांवाचा पाया घातला.

लाहोरांत रामदास नांवाचा एक लहानसा मुलगा फुटाणे विकीत असे. तिसरे गुरू अमरदास हे गोंदवलीस रहात असत. वार्षिक मेळ्यासाठीं जाणारी मंडळी लोहारहून परत फिरून तिकडे जात होती. बालक रामदा-सानें ' तुम्हीं कोठें जातां आहांत ' असें विचारलें आणि नंतर तोहि त्यांचे बरोबर जाण्यास निघाला. इथेंच आणखी एक घटना झाली. गुरु अमरा-दासांची धर्मपत्नी आपल्या पतीला म्हणत होती कीं आपल्या कन्येला वर शोधला पाहिजे, जवळूनच रामदास चालला होता. त्याला पाहून असा कोणी मुलगा मिळाला पाहिजे असें गुरुपत्नीच्या तोंडांतून उद्गार निघाले. गुरु म्हणाले—' ठीक आहे हाच सही, ' आणि लागलीच त्या मुलाला हांक मारून आपल्या मुलीचा त्याच्याशीं संबंध जोडून दिला.

या घटनेनें शिख इतिहासावर असा प्रभाव पाडला कीं त्याचा भविष्यकाल बिलकुल पालटून गेला. या विवाहानें गुरु नानकच्या गादीवर लाहोरच्या

सोठी क्षत्रियांचा वंश प्रतिष्ठापित झाला; या वंशांत एकामागें एक असे पांच गुरु उत्पन्न झाले. हे पांचजण खरोखरीच अद्वितीय पदाचे अधिकारी होते. गुरु अमरदासानें कन्येच्या सेवेनें संतुष्ट होऊन आपली गादी रामदासाच्या कुलाला वंशभोज्य करून दिली. गुरु रामदासांचा पुत्र गुरु अर्जुन होता. त्याचा पुत्र हरगोविंद. गुरु हरगोविंदाला गुरु तेगबहादर पुत्र झाला. आणि त्याला गुरु गोविंदसिंह झाले. गुरु हरगोविंदाचा नातू गुरु हरराय व त्याचा पुत्र गुरु हरकिसन हे गुरु तेगबहादराचे आधीं गादीवर आले होते. गुरु रामदासानें संवत् १६३४ ( शके १५०० ) अमृतसर शहराचा पाया घातला. सम्राट् अकबर यांना मान देत होता. एक वेळ तो गुरु रामदासाच्या दर्शनाला स्वतः आला होता, आणि यामुळें गुरूची कीर्ति पुष्कळ वाढली.

गुरु अर्जुनाच्या वेळीं गुरुनानकाच्या धार्मिक आंदोलनाला राजकीय स्वरूप मिळालें. हें अशा प्रकारें घडलें कीं, जहांगीर बादशहाच्या राज्यकालांत त्याचा मुलगा खुसरो बंडखोर होऊन पंजाबमध्यें पळून गेला होता, त्यानें गुरु अर्जुनाचा आश्रय केला. यामुळें बादशहा गुरूवर रुष्ट झाला. गुरु अर्जुनानें अमृतसरमध्यें एक मंदिर बांधविलें, धन एकत्र करण्याकरितां गाद्या निर्माण केल्या आणि पूर्वींच्या गुरूंची व इतर कांहीं संतांची वाणी सर्व एकत्र करून 'ग्रंथसाहेब' नांवाच्या एका ग्रंथाला जन्म दिला. कुराणाला प्रतिस्पर्धी करण्याकरितां शिखांच्या गुरूंनीं एक पुस्तकनिर्मिति केली आहे अशी कागाळी बादशहाच्या कानावर गेली. बादशहा स्वतः गुरुजवळ गेला आणि नव्या पुस्तकांत इस्लाम ( मुसलमान धर्माच्या ) विरुद्ध कां लिहिलें म्हणून प्रश्न केला. गुरु अर्जुनानें हें सर्व खोटं आहे असं सांगितलें. त्यांनीं फक्त गुरूंची वाणी आणि भक्तांच्या भजनांचा संग्रह करून तें पुस्तक रचिलें होतें. त्यानें परीक्षार्थ कोणतेंहि एखादें ठिकाण काढून पहा असेंहि सांगितलें. आणि असेंच कोणतें तरी एक पान काढून पाहिलें तों त्यांत ईश्वरभक्तीचा विषय निघाला. बादशहानें विचारलें कीं 'जर आपल्या दृष्टीला सर्व धर्म समान आहेत तर पुस्तकांत इस्लामच्या महंमद पैगंबराचे ( प्रेषित ) स्तुतिपर कांहीं कविता सामील करा.' हा मोठा नाजुक समय होता. दिल्ली सम्राटची आज्ञा झाली. धार्मिक निःपक्षपातित्वाबद्दलच्या सिद्धांतावर त्यानें हा प्रश्न ठेवला होता.

याला न मानणें म्हणजे बादशाही आज्ञेच्या विरुद्ध जाण्यासारखें होतें. कोणी साधारण मनुष्य असता तर त्याला वाटतें कीं यांत काय हरकत आहे ? एक भजन लिहिल्यानें सम्राट तर प्रसन्न होईल ! बादशहानें जाहागीर देऊन पुरस्कार करण्याचाहि संभव होता व त्यामुळें शीख धर्माचा प्रचार फार सहज झाला असता; कारण त्यामुळें बादशहाचे मनांत शीख धर्माबद्दलची शंका रहाण्याला जागा न राहती. आम्हीं यांतील मर्म जाणण्याला कदाचित् असमर्थ असूं, परंतु गुरु अर्जुन एक खरा नेता होता. तो खूप समजून होता कीं, कोणत्याहि नवीन आंदोलनाचा स्वातंत्र्य हा प्राण आहे. जर तो आरामाच्या मोलानें ती स्वतंत्रता विकता तर त्याच्या धर्मपंथाचें महत्वहि जातें आणि त्यांत कांहीं ' राम ' राहला नसता. यावेळीं गुरु अर्जुनाचें बादशहाला मिळालेलें उत्तर असेंच ओजस्वी होतें कीं जसें दोन हजार वर्षांपूर्वी या देशांतल्या एका संन्याशानें शिकंदराला दिलें होतें. गुरूनें सांगितलें " गुरु ग्रंथसाहेबमध्यें जें लिहिलें आहे तें ' वा हे गुरु ' ( गुरूंचे नांवाचा सामान्य उच्चार करतेवेळीं नुसते गुरु न म्हणतां ' वा हे गुरु ' असें म्हणतात ) च्या प्रेरणेनें लिहिलें गेलें आहे. मी दुसऱ्या कोणत्याहि शक्तीला प्रसन्न करण्याकरितां माझ्याकडून मी कांहींहि फरक करूं शकत नाहीं. " या मनोद्दीपक उत्तरानें शीखांच्या आंदोलनाचें रूपांतर करून टाकलें. जहांगीरासारखा सुस्वभावी व बेपर्वा असा सम्राट्सुद्धां संतप्त झाला. त्याची खात्री झाली कीं या आंदोलनांत तेज आहे आणि कधीं ना कधीं तरी ही शक्ति शाही सत्तेशीं सामना खास करील. बादशहाजवळ ' चंदू ' नांवाचा एक दिवाण होता. त्यानें आपल्या मुलीचें लग्न गुरूच्या मुलाशीं लावण्याची आपसांत इच्छा दाखविली; पण त्याचवेळीं हेंहि म्हणाला कीं " महालाची वीट मोरीच्या आंत बसवावी लागेल " हें वर्तमान गुरूपर्यंत पोचलें आणि त्यांनीं हें नातें जोडण्याचा नकार केला. चंदू याचसाठीं गुरूंवर चरफडत होता. त्यानें सम्राटाला बहकविलें. गुरूवर २ लाख रुपयांचा दंड लागू केला. गुरु अर्जुनला लाहोरमध्यें अशा वेदना सहन कराव्या लागल्या कीं त्याच्या वर्णनानें अंगावर शहारे येतात. अखेरचा हुकूम हा होता कीं त्यांच्या अंगावर गाईचें कातडें पांघरविलें जावें. त्यांनीं सर्व कष्ट सहन केले परंतु यांत त्यांना धर्माचा फार मोठा अपमान झाला असें वाटलें. त्यावेळीं किल्ल्याजवळ रावी नदी वाहात होती. तींत स्नानाला जे एकदां

गेले ते पुन्हां बाहेर निघाले नाहींत. गुरु अर्जुननें धर्मसत्तेला राजसत्तेशीं सामना देण्याला उभें केलें आणि आपण धर्माकरितां बळी गेले. हें धर्मासाठीं झालेलें पहिलें बलिदान होतें.

कदाचित् यावेळीं शाहीशक्ति शीखपंथाला चिरडण्यांत यशस्वीहि झाली असती. परंतु शाहीशक्तीच्या छायेखालीं येण्यानें शीखपंथाच्या प्रसाराची बिलकुल आशा नव्हती. गुरु अर्जुननें या आंदोलनाला संकटांत लाटलें हें खरें आहे, पण हेंहि तितकेंच खरें आहे कीं हें आंदोलन जीवंत राहूं शकेल असा जर कोणता मार्ग असेल तर तो हाच होता.

गुरु हरगोविंदानें गादीवर बसतांक्षणींच दोन तरवारी धारण केल्या. एक पित्याबद्दल सूड घेण्यासाठीं आणि दुसरी प्रतिपक्षाला खोटें पाडण्यासाठीं. यान आपल्या आंदोलनाला अगदीं निराळें स्वरूप दिलें. बादशहाशीं स्पर्धादर्शक म्हणून तो आपल्याला 'सच्चा बादशहा' असें म्हणवून घेऊं लागला. याचा स्पष्ट अर्थ हाच आहे कीं दिल्लीचा बादशहा खोटा बादशहा होता. यानें आपल्या बसण्याच्या गादीला §'तक्त अकाल' हें नांव दिलें. आणि आपल्या सभेला 'दर्बार' हें नांव ठेवलें. यानें शीखांना आज्ञा दिली कीं सगळयांनीं आपले तंटेबखेडे या दर्बारांत रुजू करावे. यांत शाहीन्यायालयावरचा बहिष्कार स्पष्ट तेव्हनें अभिप्रेत होता. गुरूनें आपला सर्व थाटमाट राजाप्रमाणें बनविला. या सर्व राजयोगी व्यवहाराला धनाची आवश्यकता होती. शिख लोक जी भेट देत असत तिला त्यानें 'कार' हें नांव दिलें. कार हा शब्द संस्कृतमधील 'कर' या शब्दाचेंच रूपांतर आहे. माळव्याचे जितके चोर आणि डाकू होते ते सर्व गुरूंच्या प्रभावाखालीं आले आणि गुरूंचें भय धरूं लागले. जर कधीं एखादे वेळीं सवयीच्या योगानें त्यांच्या हातून लूटमार घडली तर त्यांतील सर्व माल आणून गुरूंच्या चरणांवर अर्पण करीत असत. त्या मंडळींतील प्रसिद्ध विधिचंदाप्रमाणें कित्येक जण आपली वाईट चाल सोडून देऊन गुरूची सेवा करूं लागले. देशाला स्वतंत्र करण्याची अगदीं मनःपूर्वक इच्छा गुरूला होती. यांनीं सर्वांना शस्त्रधारी होण्याची आज्ञा केली. याच्याजवळ आठशें घोडा, तीनशें स्वार व आठ तोपची

§ तख्त=सिंहासन, अकाल=कालातीत, अर्थात् कालातीताचें म्हणजे परमेश्वराचें सिंहासन.

( तोफ चालविणारे ) होते. एक वेळ जहांगिरच्या आज्ञेनुसार नालागढवर चढाई करून राजा ताराचंदाला जिंकलें.

गुरु हरगोविंद हे उत्कृष्ट अश्वारोही व तिरंदाज होते, आणि आपला अधिक वेळ कुस्ती तिरंदाजी व शिकार यांत खर्च करीत असत. इतर राज्य-संस्थापक पुरुषांप्रमाणें यांनाहि शिकारीचा फार नाद होता. कित्येक वेळां आपल्या स्वतःच्या हातांनीं वाघ व चित्ते यांची शिकार केली आहे. यांचा पराक्रम ऐकून बादशहाचें सिंहासन कांपूं लागलें. त्यानें लाहोरच्या नबाबाला अमृतसरवर सात हजार फौज रवाना करण्याची आज्ञा केली. गुरु हरगोविंदला कित्येक वेळां या शाहीसैन्याशीं सामना करावा लागला. या मूठ भेडीमध्यें शाही सैन्याच्या सामन्याला लढणारे गुरूंचे शिख ( शिष्य ) उभे असत. तीर चालविण्यांत गुरू स्वतः फार निष्णात होते. आणि याच कारणानें त्यांना सफलता प्राप्त होत होती. या सामन्यांत यांचे परमगुरु रामदासानें बसविलेलें अमृतसर शहर उजाड पडलें. गुरु हरगोविंदला कर्तारपूर वगैरे ठिकाणीं जावें लागलें.

हरगोविंद जसे शूरवीर होते तसेच आत्मिक सत्ता आणि कांति यांमध्येंहि ते अद्वितीय होते. यांच्या उपदेशांत व बोलाचालींत उच्चतम ब्रह्मज्ञानाचें मर्म भरलेलें होतें. यांचें प्रत्येक वचन गीतेचा श्लोकच्चसें वाटत असे. लाहोरचे मुसलमान वली* 'मियामीर' गुरूंची फार प्रशंसा करीत असत. आपल्या वडिलांप्रमाणें गुरु हरगोविंदसुद्धां लाहोरमध्यें येऊन दरबार भरवीत. त्याच्या आत्मिक बलाचा लोकांवर फार प्रभाव पडला होता. लाहोरच्या काजीची मुलगी घरीं बसल्या बसल्या त्याचें देवाप्रमाणें स्मरण करीत असे. त्या मुलीला जेव्हां तिच्या बापानें याकरितांच फार तंग केलें तेव्हां ती घरून पळाली व फकीर 'मियामीर' यांचेकडे गेली. मियामीरनें तिला गुपाचिप गुरूंच्यापाशीं पाठवून दिली. त्या मुलीचें नांव कायम राहण्याकरितां 'कवलसर' नांवाचा एक तलाव बांधवून तिचें त्यांनीं स्मारक करून ठेविलें. दिल्लीच्या सम्राटच्या † बेगमांना त्यांच्या दर्श-

---

* वली=साधूपुरुष.

† बेगम=बादशहांच्या मुलींना बादशहांच्या तोलाचे वर मिळत नसत म्हणून त्यामुली अविवाहित रहात व त्यांना 'बेगम' असें म्हटलें जाई.

नाची इच्छा झाली. त्यासाठीं गुरु हरगोविंद शाही महालांत गेले व दर्शन देऊन त्यांना कृतार्थ केलें.

जहांगीर बादशहा गुरूंचा द्वेषी असून सुद्धां यांना खुष ठेवूं इच्छित होता. यासाठीं एक साल त्यांना आपल्याबरोबर काश्मीरला घेऊन गेला. काश्मीरच्या रस्त्यांत यांचे व्यवहार पाहून बादशहा अप्रसन्न झाला आणि त्यानें ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत त्यांना बंद करून ठेवलें.गुरूवर शिख इतके लुब्ध होते कीं शेकडों हजारोंजण ग्वाल्हेरच्या किल्याच्या भिंतीवर–ज्या भिंतीच्या आंत गुरू बंद होते त्यावर जाऊन आपलें डोकें घासीत व कृतार्थ समजून परत येत असत. याचवेळीं बादशाहाची प्रकृति बिघडली. त्याला असें सांगण्यांत आलं कीं गुरु हरगोविंदासारख्या सिद्ध पुरुषाला कैद करून ठेवणें हेंच प्रकृति बिघडण्याचें कारण आहे. तो काल तसा होता आणि कालाप्रमाणेंच बादशहाहि होते. वरील कारणामुळें बादशहानें गुरूला सोडून देण्याची आज्ञा दिली. गुरूनें त्या किल्ल्यांत कैदेंत असलेले प्रतिष्ठित लोक व राजे यांना सोडल्याशिवाय किल्ल्याचे बाहेर जाण्याचें नाकारलें. बादशहानें सर्वांना सोडण्याचा हुकुम दिला. त्यांतले पुष्कळसे प्रतिष्ठित मोठे लोक गुरूचे शिष्य बनले व त्याचेबरोबर पंजाबमध्यें गेले.

आज्ञाधारी पतिव्रता पत्नीचें आपल्या पतीवर जें प्रेम असतें त्याहून अधिक मधुर असें प्रेम दुसरें असूं शकत नाहीं. भारतवर्षांत या प्रेमाला इतकें उच्च व पवित्र स्थान दिलें गेलें कीं पतीच्या मृत्यूच्या मागें पतिव्रता स्त्रीचें जिवंत रहाणें समाजाला असह्य होऊं लागलें. या प्रेमाच्या उच्चतेच्या व पवित्रतेच्या दिव्यतर मनोबलावर हजारों स्त्रिया आजपर्यंत पतीबरोबर सती गेल्या. या आचाराला जरी उच्च आत्मिक भावाचा पाया होता तरी पण पुढें पुढें याला गर्हणीय स्वरूप आलें ही गोष्ट निराळी. गुरु हरगोविंदच्या मृत्यूनंतर त्यांचा स्त्रिया तर पतीबरोबर सती गेल्याच पण यावेळीं याहूनही दुसरेंच एक अद्भुत दृश्य दिसून आलें. त्यांचे शिष्य त्यांचेवर इतके मोहित होते कीं गुरूंच्या मागें जिवंत राहणची त्यांना बिलकुल इच्छा नव्हती. कित्येकजणांनीं धांवत धांवत जाऊन चितेमध्यें उड्या घातल्या. लोकांनीं त्यांना बाहेर ओढून काढलें तरी पण दोघे रजपूत त्यांचेबरोबर जळून राख झाले. लोकांमध्यें इतकें प्रेम फक्त गुरु हरगोविंदासाठींच बघायला सांपडतें. या गुरूंमध्यें इतकी अद्वितीय आकर्षणशक्ति होती.

गुरु हरगोविंदच्या मागून त्यांचे नातू गुरु हरराय हे गादीवर आले. त्यांची प्रकृति फार मृदुस्वभाव होती. फूल तोडलें जातांनासुद्धां त्यांचें मन शोकव्याकुल होत असे. परंतु दाराशिकोहाचा जेव्हां औरंगजेबाबरोबर सामना झाला तेव्हां यांनीं दाराला मदत केली. जेव्हां औरंगजेब गादीवर बसला तेव्हां त्याला या गोष्टीचें स्मरण झालें. बादशहानें गुरूला दिल्लीला बोलाविलें. त्यानें आपला पुत्र रामराय याला तिकडे पाठविलें. रामरायानें दिल्लीमध्यें अवरंगजेबाची भेट घेतली. बादशहानें रामरायाला विचारलें कीं गुरूच्या वाणीमध्यें

**मिट्टी मुसलमानदी पेडे पई कुम्हार**
**घड भांडे इट्टा किया जल्यी करे पुकार**

हा श्लोक का आहे ? या श्लोकाचा अभिप्राय असा होता कीं हिंदू आपले प्रेताला अग्निसंस्कार देतात त्याबद्दल मुसलमान त्यांचेवर दोषारोप करतात. पण खुद्द त्यांनीं हें लक्षांत ठेवावयाला पाहिजे कीं त्यांच्या शरीराची झालेली माती कुंभार घेऊन जातील [ कुंभार लोक मातीचे घडे बनविण्याकरितां इतर मातीच्या ऐवजीं कबरस्थानची माती अधिक पसंत करतात कारण ती माती इतर मातीच्या पेक्षां अधिक चिकण असते. ] त्यांच्या शरीराची माती आगींत भाजली जातेवेळीं जरूर आक्रोश करील. हें त्यांनीं लक्षांत ठेवावें कीं ज्यापासून ते आपल्या शरीराला वाचविण्याची इच्छा करीत आहेत त्या आगीपासून सर्वकाल ते वाचूं शकत नाहींत.

रामराय बादशहाच्या या प्रश्नानें घाबरून गेला. आणि चटकन बोलून गेला कीं या श्लोकांत मिट्टी मुसलमानदी नाहीं परंतु मिट्टी बेइमान दी असें आहे. हा वृत्तांत गुरु हररायपर्यंत पोचला. त्यांनीं रामरायला लिहिलें कीं तूं बादशहाच्या भयानें गुरूंच्या वाणीला लटकी पाडलीस यासाठीं मला पुनः तोंड दाखवूं नकोस. रामराय पंजाबमध्यें गेला नाहीं. तो बादशहाच्या दरबारमध्येंच राहिला आणि तेथें गुरूंच्या विरुद्ध साथ देत राहिला. अवरंगजेबानें टिहरीच्या राजाला एक चिठ्ठी लिहून त्याला देहराडूनमध्यें एक जहागीर देवविली. ती अजून त्याच्याच वंशांत चालत येत आहे. गुरु हररायनें आपली गादी पांच वर्षांच्या लहान मुलाला दिली. याबद्दल रामरायानें तक्रार केली. गुरु-

हरकिसन दिल्लीला गेले परंतु ते तेथें देवीच्या आजारानें वारले. रामरायानें डेहराडूनमध्यें जाऊन आपलें ठाणें दिलें. तेथें अजून दरवर्षी एक मोठा मेळा भरत असतो. वाणीमध्यें परिवर्तन करणें हा कांहीं रामरायाचा अपराध नव्हता. शब्दाच्या अदलाबदलींत कांहीं पाप नाहीं. पाप वा दोष जो होता तो त्याच्या मनोवृत्तींत होता. तो बादशहाची शक्ति व प्रभाव यांनीं दबला गेला. आणि याकारणाकरितां गुरूनें निश्चय केला कीं अशा भीरु अंतःकरणाचा पुरुष शिखांचा नेता होतां उपयोगी नाहीं, कारण तो तर त्या पंथाला अगदीं नष्ट करून टाकील. अशाच तऱ्हेची एक घटना दहावे गुरु गोविंदसिंहजीच्या वेळीं घडून आली. एक वेळ मोहनलाल नांवाचा एक मनुष्य गोविंदसिंहाकडे आला. बोलतां बोलतां त्यानें बादशहाचा एक श्लोक तेथें म्हटला—

**नीले वस्त्र कपडे पहिरे**
**तुर्क पठाणी अमल भया ।**

अर्थात् आतां निळया वस्त्राचा रिवाज पडला आहे. आणि तुर्क व पठाण यांचा अंमल चालू आहे. गुरु गोविंदसिंह म्हणाले कीं हा श्लोक याप्रमाणें आहे—

**नीले वस्त्र कपडे फाटे**
**तुर्क पठाणी अमल गया**

' पहिरे ' या शब्दाच्या जागीं ' फाटे ' हा शब्द आणि ' भया ' च्या जागीं ' गया ' हा शब्द आहे. अर्थात् आतां निळे कपडे फाटून गेले आणि तुर्क पठाणी सत्ता अंताला जाण्याची वेळ आली आहे. या मनुष्यानें गुरु गोविंदसिंहाला म्हटलें कीं आपण सुद्धां गुरु रामरायच्या प्रमाणें परिवर्तन करित आहांत. त्यावर गुरु गोविंदसिंह चटकन् उत्तरले " ती गोष्ट अलग होती आणि ही गोष्ट वेगळी आहे " यांत हेतु हा कीं तें परिवर्तन शिखांचा उद्देश्य नष्ट करणारें होतें आणि हें परिवर्तन त्यांचे उद्दिष्टाची पूर्णता करीत आहे.

गुरु हरकिसन् बाल्यावस्थेंतच परलोकवासी झाले. गुरु तेगबहादर गादीवर बसल्यावर औरंगजेबाच्या प्रजेवरील अत्याचाराला आरंभ झाला. औरंगजेब एक मोठा संशयी पुरुष होता. संशयानेंच त्यानें आपल्या मुलाला

कारागृहांत टाकलें. एकाला दुसऱ्याच्या विरुद्ध उठवून हा आपला मतलब साधित होता. ही त्याची नीतिच होती. हिंदूवर 'जिजिया' कर लादणें हें जुलमाचें मूळ होतें. या जिजियामुळें देशांतील सर्व भागांत हिंदु लोक कांपू लागले. उदेपूरचे राणे राजसिंह यांनीं याविरुद्ध पुष्कळ तक्रार केली व औरंगजेबाला एक फार कडक असें पत्रहि लिहिलें. दक्षिणेमध्यें शिवाजीचे साथीदार बादशहाच्या विरुद्ध उभे राहिले. दिल्लीमध्यें सर्व सत्नामी साधू बादशहाला प्रार्थना करण्याकरितां एकत्र झाले. बादशाहा हत्तीवरून चालला होता. लोकांनीं त्याचा रस्ता रोखून धरला. बादशहानें घमेंडींत येऊन उन्मत्तपणानें 'हत्ती चालू दे' अशी महाताला आज्ञा केली. पुष्कळसे साधू हत्तीच्या पायाखालीं कुचलले गेले, पण मागें हटले नाहींत. या सत्याग्रहानें देशांत चोहोंकडे जुलमाची हाकाटी झाली. औरंगजेब हिंदुधर्माचा नाश करण्याला उद्युक्त झाला आहे. 'सवा मण' यज्ञोपवीत उतरविल्याशिवाय तो कांहीं खाणार नाहीं अशी त्यानें प्रतिज्ञा केली आहे अशा वार्ता लोकांत प्रसृत होऊं लागल्या.

संवत् १७२१ ( शके १५८७ ) मध्यें गुरु हरगोविंदाचे पुत्र गुरु तेगबहादर हे गादीवर बसविले गेले. रामराय त्यांचे विरुद्ध विष ओकूं लागला. बादशहानें त्यांना बोलावलें, व त्याप्रमाणें ते गेले. परंतु जयपुराधीश त्यांना आपल्याबरोबर घेऊन बंगालच्या मोहिमेवर गेले. कांहीं दिवसांनीं ते परत आले. संवत् १७२५ ( शके १५९१ ) मध्यें काश्मीराहून निघून पुष्कळसे ब्राह्मण गुरुंच्या जवळ गेले आणि धर्माचें रक्षण करण्याची त्यांचेजवळ त्यांनीं प्रार्थना केली. गुरु तेगबहादरनें उत्तर दिलें "यावेळीं कोणातरी महात्म्याच्या आत्मबलिदानाची आवश्यकता आहे."

या उत्तराचा काय अर्थ आहे हें आमच्या ध्यानांत येत नाहीं. उत्तरेकडील आणि पश्चिमेकडील हल्ल्यांमध्यें हजारोंनीं—लाखोंनीं डोकीं उडविलीं गेलीं होतीं. हत्त्या आणि रक्तपात यामध्यें कांहीं कमी झालें नाहीं. तरी पण कांहीं झालें नाहीं. आणखी एका 'महात्म्या' च्या हत्त्येनें अशी काय जादू केली असती ? परंतु नाहीं; हेंच उत्तर ठीक होतें. यांत एक विशेष तत्व समाविष्ट झालेलें होतें. हजारों मनुष्यांच्या प्राणहत्त्येनें जी शक्ति उत्पन्न केली जात नव्हती ती एका नेत्याच्या हुतात्मतेच्या मृत्यूनें उत्पन्न झाली. साधा-

रण मृत्यु आणि हौतात्म्य यांच्यांत केवळ भावनेनेंच अंतर असतें. मृत्यु तर दोन्ही अवस्थामध्यें आहेच. पहिल्या अवस्थेंत मनुष्य प्राणांच्या मोहांत फसलेला राहून मृत्यूच्या भयानें व्याकुल असतांना मरतो; आणि आपल्या या वर्तनानें तो मनुष्य आपल्याभोंवतालीं देहबुद्धीचें वातावरण उत्पन्न करून ठेवतो. दुसऱ्या अवस्थेंत हुतात्मा आपल्या जीवनाबद्दल बेपर्वा होऊन सिंहाप्रमाणें निर्भयतेनें मृत्युमुखांत उडी घेतो; आणि आपल्या हुतात्मतेच्या दिव्यतेनें देशामध्यें साहस व निर्भयता उत्पन्न करतो. गुरु तेगबहादरचें एक वचन आहे—' तोच मुक्त आहे कीं जो कोणाला भय उत्पन्न करीत नाहीं अथवा कोणापासून भय बाळगीत नाहीं. ' ( यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।। भगवद्गीता)

हें मोठें बलिदान होतें. गुरु गोविंदसिंहानें याबद्दल एका दोह्यांत यथार्थ वर्णन केलें आहे.—

**किनो बडो कलू में साका**
**तिलक जनेऊ राखा प्रभ ताका**

याचा अर्थ, कलियुगामध्यें, हें फार मोठें आत्मबलिदान केलें कीं प्रभूनें ( तेगबहादरानें ) तिलक–यज्ञोपवीता ( जानवें ) च्या रक्षणासाठीं आपणां स्वतांला बली दिलें. गुरु तेगबहादर स्वतः पकडवून घेऊन दिल्लीमध्ये गेले, आणि त्यांनीं आपलें शिर औरंगजेबाच्या तरवारीला खाद्य दिलें. गुरूनें आपलें शिर दिलें, परंतु स्वीकारलेल्या कार्याचा त्याग केला नाहीं. शिखांना लढाईचे वेळीं जें शिर त्यांच्या बाजूनें लढतांना दिसत असे तें हेंच शिर होतें. या मस्तकानेंच हरएक शिखाच्या हृदयमंदिरांत कायमचें ठाणें दिलें.

गुरु अर्जुनच्या मागें गुरु हरगोविंद गादीवर आले. त्यांनीं शिख पंथाला राजनैतिक स्वरूप दिलें. जीवन ही एक शक्ति आहे. तीच धार्मिक रूपानें प्रकट होते. राजनैतिक स्वरूपही तीच धारण करते. गुरु तेगबहादरच्या हुतात्मतेनंतर गुरु गोविंदसिंहानें या आंदोलनाला एक जंगी स्वरूप देण्याचा बेत केला. त्यांनीं असें म्हटलें आहे,

**चिडियोंसे मैं बाज लढाऊं**
**तब नाम गोविंद पाऊं.**

अर्थात् जेव्हां मी चिमण्यांकडून श्येनाशीं ( ससाणा किंवा बाज या नांवानें

या पक्ष्याला ओळखतात. हा पक्षी फार वळकट, आवेशी, व पराक्रमी असून इतर पक्ष्याची शिकार करण्यांत फार निष्णात असतो) टक्कर देववीन तेव्हांच गोविंदसिंह म्हणवीन.

गुरु गोविंदसिंहाचा पुराणांशीं चांगलाच परिचय होता. त्यांचा ग्रंथ-साहेब पुराणांचा अनुवाद आहे. यावेळीं हिंदू लोकांत भित्रेपणा फैलावत जात होता. गुरु गोविंदसिंह त्यांच्यांतील भित्रेपणा काढून टाकून त्यांच्यांत क्षात्र–वृत्ति जागृत करूं इच्छित होते. याच विचारानें दत्तचित्त होऊन त्यांनीं पुराणांचें अध्ययन केलें. आणि शेवटीं भविष्य पुराणांतील एका घट-नेनें त्यांची आशा स्थिर झाली.

यावेळीं सर्व भारतवर्ष नास्तिकांचा बाजार बनत चालला होता; १० कोटि नास्तिक देशांत पसरले होते; कोणांमध्येंहि वेदांबद्दल आदर राहिला नाहीं; ब्राह्मणांकडे–वेद व ईश्वर यांना मानणाऱ्यांकडे–घृणापूर्वक बघितलें जाई; हा हिंदूंचा आपत्काल होता, त्यांच्यासमोर फार मोठें भय 'आ' पस-रून उभें होतें. आणि जर कदाचित् अशा स्थितींत ते सोडले गेले असते तर त्यांचा नाश अवश्यंभावी होता; परंतु त्यावेळीं स्वधर्मप्रेमी ब्राह्मणांनीं आबूच्या पहाडावर एक यज्ञ आरंभिला होता. आबूपर्वत राजपुतान्यांतील जंगली प्रदेशांत होता. या प्रदेशांतील राहणारे लोक साधे, मेहनती व शूर होते. जे जंगलांत व पर्वतांत राहणारे लोक असतात त्यांच्यांतच ताजें रक्त खेळत असतें आणि केवल असल्याच लोकांत राजनैतिक जंगी तेज प्रकट होऊं शकतें.

पुष्कळ कालपर्यंत हा यज्ञ होत होता. अखेर या यज्ञानें कित्येक क्षत्रि-यांच्या हृदयांत देश, जाति आणि धर्म यांचेबद्दल प्रेमाग्नि प्रज्वलित केला. त्यांनीं त्या पवित्र यज्ञाग्नीसमोर देशासाठीं व धर्मासाठीं आपले प्राण अर्पण करण्याच्या दृढ प्रतिज्ञा केल्या. ब्राह्मणांच्या अविरत उपदेशानें त्यांच्या अंतः-करणांत देशधर्मभक्तिनें आपलें घर केलें. आपलीं शिरें हातावर घेऊन त्यांनीं धर्मक्षेत्रांत उड्या घेतल्या. या वीरतेनें लोकांचे मनावर जादूसारखा फार विलक्षण परिणाम केला. देशामध्यें पुन्हां एकवार धर्माचें राज्य स्थापन झालें. हें काम अग्नीपासून उत्पन्न झालेल्या अग्निकुल क्षत्रियांचें होतें.

गुरु गोविंदसिंहानेंहि हाच उपाय करावयाचा निश्चय केला. कोट नयनादेवीच्या पर्वतावर एका यज्ञाची रचना केली. एक वर्षपर्यंत या यज्ञांत आहुति पडत होत्या. या निरुपद्रवी आहुतींनीं कांहीं बनूं शकत नव्हतें. या वेळीं मनुष्याहुतींची आवश्यकता होती. संवत् १७५२ ( शके १६१८ )चे दिवस होते. कदाचित् या वर्षाची ती वर्षप्रतिपदा होती व म्हणून या दिवशीं साधारण आहुति दिल्या जाणारा यज्ञ समाप्त झाला. यानंतर गुरु गोविंद-सिंहानें आपण शक्तिदेवीला प्रसन्न करण्यासाठीं आपल्या शिखांजवळ पांच शिरांचे बलि मागितले. यावेळीं कित्येक कातर व दुर्बल अंतःकरणी मंडळी हळूहळू निसटूं लागली. सर्वांच्या आधीं लाहोरचा एक दयासिंह नांवाचा क्षत्रिय उभा राहून शक्तिदेवीला आपलें शिर अर्पण करण्याला तयार झाला. मग एक न्हावी आणि एक धीवर तयार झाला. याप्रमाणें एकामागून एक असे ' पांच प्यारे ' ( पांच प्रियजन ) गुरु गोविंदसिंहाला मिळाले. यांचें नांव गुरूनें ' खालसा ' असें ठेवलें. या खालसानें—यांच्यांत चार शूद्र होते—केवल नवे रजपूत क्षात्रियवृत्तीचे लोक उत्पन्न केले इतकेंच नव्हे तर साऱ्या जातींत समतेचा नवा सिद्धांत उभा केला.

गुरु गोविंदसिंहांना नवीन जातीयता उत्पन्न करण्यासाठीं जात-पात तोडणें आवश्यक वाटलें. इस्लामी हल्ल्याखालीं इतर किल्ले जेव्हां तुटले गेले तेव्हां हिंदू लोकांनीं आपल्याभोंवतीं आपल्या बचावासाठीं जाति-पातीचा एक नवा किल्ला उभा केला. या किल्ल्याच्या आंत सुरक्षित राहण्यासाठीं त्यांनीं असे नियम बनविले कीं, लोक त्यांच्या भिंतीच्याबाहेर एक पाऊल-मुद्धां ठेवूं न शकावेत. थोडासा दोष होतांच दोषी जनाला एकदम जातीच्या बाहेर केलें जात असे. ही धमकी त्यावेळीं तरी आपला उपयोग देऊन चुकली. परंतु त्यानंतर याच गोष्टीनें जातीय समतेचे तुकडे उडविले आणि जातीय जीवन नष्टप्राय करीत आणलें. गुरु गोविंदसिंहाचा खालसा एक असा पंथ होता कीं तो जाति-पातीपासून दूर होता. यांनीं त्यांना शिखांचे ' सिंह ' बनविलें.

गुरु गोविंदसिंहानें इतकेंच केलें नाहीं तर, त्यांनीं शिखांमध्यें आत्मिक बल उत्पन्न करण्याचाहि प्रयत्न केला. सर्वांच्या आधीं त्यांनीं त्यांचेकडून तरवारीची पूजा करविली आणि त्यांचेसाठीं वीररसप्रधान गीतें तयार

केलीं. त्यांचेसाठीं आशा-जनक नियम बनविले. कारण जीवन आणि उत्साह यांचें आशा हेंच मूल वा बीज आहे.

गुरु गोविंदसिंहांनीं गुरु तेगबहादूरांच्या हुतात्मतेनंतर वीस वर्षे पर्वतांत काढलीं. याच कालांत त्यांनीं आपली व साथीदारांची तयारी केली. स्वातंत्र्ययुद्धास आरंभ करण्याचे आधीं आपलें संरक्षण जेथें होऊं शकेल असें स्थान शोधणें आवश्यक होतें. आणि यासाठीं त्यांनीं आनंदपूर, पौटा आणि चमकोर येथें तीन किल्ले बांधले. संवत् १७५२ ( शके १६१८ ) मध्यें पद्धतशीर सामन्याला आरंभ झाला, आणि शाहीसत्तेविरुद्ध युद्धघोषणा केली गेली. पहिल्या प्रथम गुरु गोविंदसिंहांनीं आपलें लक्ष पहाडी राजांकडे वळविलें. स्वातंत्र्ययुद्धांत सामील होण्यासाठीं त्यांनीं त्यांना आमंत्रित केलें. त्यांनीं गुरूंना असें स्पष्ट उत्तर दिलें कीं:-" तुम्ही एक साधू आहांत. तुमच्याच्यानें बादशाही शक्तीशीं झगडणें कसें शक्य होणार ?" गुरूच्या शिखांनीं पहाडी इलाख्यावर लूटमार सुरू केली. सर्व हिंदू राजे ( पहाडी राजे ) गुरूला युद्धाची मजा चाखविण्यासाठीं एकत्र झाले. परंतु भंगाई नांवाच्या गांवाजवळ गुरूनें या सर्वांचा पराजय केला. यानंतर सर्व राजे गुरूला येऊन मिळाले. या राजांनीं बादशाही ' खिराज ' ( खंडणी ) बंद केली आणि गुरूंच्याबरोबर मिळून नादोनवर शाही सैन्याशीं टक्कर दिली. यावर औरंगजेबनें शहाजादा ( राजपुत्र ) मुआज्जिमला लाहोरवर रवाना केलें आणि त्यानें मिर्झा बेगबरोबर सेना देऊन त्याला पहाडी राजावर पाठविलें. मिर्झा बेगनें राजांना अशी हार दिली कीं पुन्हां त्यांनीं डोकें वर काढण्याचें साहस केलें नाहीं. गुरूनें त्यांना पुन्हां दुसऱ्यानदां आपल्याला मिळण्याविषयीं पत्र लिहिलें. परंतु राजे लोकांनीं न मिळतां गुरूंच्या विरुद्ध औरंगजेबाकडे पत्र पाठविलें. राजांचा हिंदुधर्मावर अथवा गुरूवर किंवा स्वतःवर विश्वासच नव्हता. आणि ही गोष्ट कांहीं अकारण नव्हती. साधारण लोक, जेव्हां सफलतेची आशा दिसूं लागते तेव्हां कष्ट सहन करण्याला तयार होतात. केवळ सफलतेची आशाच साधारण मनुष्याला साहस करण्याला व आत्मबलिदान करण्याला तयार करूं शकते. याच कारणामुळें गुरूंचे पुष्कळसे शिख आणि हिंदू राजे गुरूला साथ द्यावयाला तयार झाले नाहींत. स्वतः युद्धाची घोषणा करणें म्हणजे पर्वताला टक्कर देण्यासारखें आहे असें गुरु गोविंदसिंहांना वाटलें असेंहि असूं शकेल. परंतु या घोषणे-

मध्यें एक गंभीर राजनैतिक रहस्य छपलेलें होतें. बादशाहीशीं सामना करण्याच्या सामर्थ्याचा जनसाधारण्यांत संचार होऊं शकतो ही गोष्ट अजूनपर्यंत कोणाच्या स्वप्नांतहि आली नव्हती. या घोषणेनेंच शाहीसत्तेच्या सामन्यांत स्वातंत्र्याचें बीज पेरण्याचें काम सुरू केलें. स्वातंत्र्याचा आरंभ कोठून ना कोठून तरी अवश्य होतोच. आणि कोणी विरळाच विशालहृदयी पुरुष या प्रश्नाला तोंड फोडण्याचा भार आपल्या शिरावर घेऊं शकतो. गुरु गोविंदसिंहाचें महत्कृत्य म्हणजे स्वातंत्र्ययुद्ध पुकारणें हें होय. त्यांचा असा सिद्धांत होता कीं:—

**सूरा सो पहिचानिए लढे दीनके हेत ।**
**पुर्जा पुर्जा कर मरे कभु न छाड्यो खेत ॥**

" शूर तोच कीं जो धर्मासाठीं प्राण देतो आणि शरीराचे तुकडे तुकडे होत मरण येत असलें तरी आपलें क्षेत्र ( रणक्षेत्र वा कर्तव्यक्षेत्र ) सोडित नाहीं. " या घोषणेमुळें गुरूंना फार मोठमोठे कष्ट सहन करावे लागले. थोडेसे साथी घेऊन शाही फौजेबरोबर युद्ध करणें ही कांहीं थट्टा नव्हे. जीवनांतील सर्व सुखसाधनें सोडून गुरूंना जंगलामध्यें भटकावें लागलें. त्यांची पत्नी व बालबच्चे कधीं कुठें कधीं कुठें छपत फिरत असत. त्यांचे स्वतःचे शिखहि कित्येक वेळां अगदीं त्रस्त होऊन त्यांना सोडून जात असत. मोठ्यांत मोठा जरी सिंहहृदयी मनुष्य असता तरी अशा अवस्थेंत निराश झाला असता आणि निराशेनें स्वस्थ बसला असता; परंतु गुरु गोविंदसिंहच असे अभेद्यहृदयी होते कीं, त्यांनीं प्रसन्नतापूर्वक आपल्या शिखांना विचारलें " जेव्हां मी कार्याला आरंभ केला तेव्हां काय तुम्हीं माझेबरोबर होतात ? " त्यांनीं उत्तर दिलें 'नाहीं'; तेव्हां गुरूनें म्हटलें ' ज्याचे विश्वासावर मी कार्यारंभ केला होता तो अद्याप मजबरोबरच आहे.' असें सांगून गुरूंनीं शिखांना आपल्या घरीं जावयाला आज्ञा दिली.

येथें आम्हीं एक विसरतां कामा नये कीं गुरु गोविंदसिंह जसे एक महान् योद्धे होते तसेच ते पूर्ण वेदान्तीहि होते. एकच श्लोक त्यांच्या आत्मिक बलाची बरोबर कल्पना देऊं शकेल:—

**मै हूं परमपुरुषको दासा**
**देखन आयो जगत तमासा ॥**

एका बाजूला ते परमेश्वराची प्रार्थना करीतः—असें चित्र—

> **दुष्ट जित उठवत उत्पाता।**
> **सकल म्लेंच्छ करो रणघाता॥**
> **वैरिन सबको आज संहारिये।**
> **चुन चुन शत्रु हमारे मारिये.**
> **देग तेग जगमें दोऊ चलै।**
> **आप राख मोहे अवर न दलै॥**

आणि दुसऱ्या बाजूला असें चित्रः—कीं एका लढाईमध्यें एक शिख, शिख आणि मुसलमान अशा दोघांनाहि पाणी पोंचवीत होता. गुरुमहाराजांजवळ याबद्दल कोणीं एकानें जाऊन तक्रार केली. गुरूंनीं त्याला कारण विचारतां तो म्हणाला, " मला सर्व जागीं एकच रूप दिसून येत आहे. " तेव्हां गुरूनें इतरांना सांगितलें " हा योग्य तेंच करीत आहे; याला असेंच करूं द्या. " ( या त्यांच्या मनाच्या दोन निरनिराळ्या प्रसंगाच्या दोन निरनिराळ्या अवस्थांवरून ते किती मोठ्या मनाचे होते हें लक्षांत येईल. )

सरहिंदच्या नबाबानें गुरूवर चाल केली. संवत् १७५८ (शके १६२४) मध्यें करतारपुरमध्यें खालसांना ( शिखांना ) हार मिळाली. नबाबानें यानंतर आनंदपुरला येऊन वेढा दिला. खाण्याची व इतर सामग्रीची फार तूट पडूं लागल्यामुळें शिख घाबरून गेले व नबाबांशीं संधि करण्याबद्दलची उत्सुकता प्रगट करूं लागले. गुरूनें त्यांना फार मुष्किलीनें समजाविलें कीं या प्रकारानेंसुद्धां ते शत्रूपासून वांचणार नाहींत. गुरु गोविंदसिंह तेथून निसटून चमकोरला आले. चमकोरच्या किल्ल्यांत फार थोडे शिख घेऱ्यांत होते म्हणून ही लढाई विशेष प्रसिद्ध आहे. मोठ्या वीरतेनें शिख लोक लढले परंतु अखेर त्यांचा नाइलाज झाला. जेव्हां शिख निरुत्साह झाले तेव्हां गुरूंनीं आपला केवळ सोळा वर्षांचे वयाचा पुत्र ' अजितसिंह ' याला आज्ञा दिली, " तरवार घे आणि युद्धक्षेत्रांत उतर. " आज्ञा ऐकतांच तो मुलगा एकदम उठून उभा राहिला आणि तरवार धारण करून शत्रूवर तुटून पडला. आणि कित्येकांची कत्तल करीत करीत युद्धक्षेत्रांत धारातीर्थी त्यानें आपला देह ठेवला. तेव्हां त्याचा धाकटा भाऊ, जोझूरसिंग जो सुमार बारा तेरा वर्षांचा होता, याला गुरूनें आज्ञा दिली.

त्यानें युद्धाला निघण्यापूर्वी इतकेंच म्हटलें कीं " तहान लागली आहे, पाणी पितों. " तेव्हां पिताजीची आज्ञा झाली कीं, " तुझ्या भावाजवळ रक्ताची नदी वहात आहे, तेथें तूं आपली तहान भागवून घे. " जोझूरसिंह या आज्ञेप्रमाणें रणक्षेत्रांत सिंहासारखी उडी घेऊन शत्रूंचा संहार करीत करीत मारला गेला. हें पाहून शिखांना आवेश चढला. ते उठले, शत्रूवर एक एक चढाई करून गेले व रणयज्ञांत त्यांनीं स्वात्माहुति दिली. शेवटीं जेव्हां कोणी राहिलें नाहीं तेव्हां गुरु आपला वेष पालटून तेथून निघून गेले. मछिवाड्यांतून फिरत फिरत दमदम्यांत त्यांनीं कांहीं दिवस मुक्काम केला व तेथून दक्षिणेकडे प्रयाण केलें.

गुरूंचे आणखी दोन लहान मुलगे आपल्या मातेबरोबर फिरत होते. सरहिंदच्या जवळ गंगाराम नांवाच्या एका ब्राह्मणानें गुप्त रीतीनें बातमी देऊन त्यांना पकडविलें. नवाबानें विचारलें, " जर तुम्हांला सोडून दिलें तर तुम्हीं काय कराल ?" त्यांनीं उत्तर दिलें कीं आम्हीं आपले शिख लोक एकत्र करून तुमच्याबरोबर युद्ध सुरू करूं. यावर नवाब विचारतो " जर तुमचा पराजय झाला तर काय कराल व कसे लढाल ? मुलें म्हणालीं, " हां पुन्हां लढूं !! एक तर तुम्हांला मारूं अथवा स्वतः मरून जाऊं "!!! यापुढें जें व्हावयाचें तेंच झालें. त्यांना दगडाच्या भिंतींत उभे करून त्यांचेवर भिंत बांधण्याचा आरंभ केला. वारंवार दोघांना व एकट्या एकट्याला धमकी आणि लालूच दाखविली गेली. परंतु दोघांचीहि धर्मबुद्धि दृढ राहिली. त्यांच्या पायांपासून बांधीत बांधीत दगड छातीवरून बांधलें जाऊन तोंडापर्यंत आले, आणि शेवटीं त्याच भिंतीखालीं त्यांचे डोळेहि अखंड भविष्यकाळासाठीं झांकले गेले. हीं चार अखेरचीं पुष्पें लाहोरच्या चणे खाणाऱ्या क्षत्रिय वंशांतील वीर बालकें होतीं—गुरु रामदासच्या रक्तापासून यांची उत्पत्ति होती. ज्या शहरानें व ज्या वंशानें गुरु रामदाससारख्या अमोघवीर्य वीर पुरुषाला जन्म दिला तीं त्रिवार धन्य आहेत. जेथें जेथें ते रहात वा फिरत असत तीं ठिकाणेंहि धन्य आहेत त्यांची संतति अलौकिक सामर्थ्य, धैर्य, वीरता, धर्म आणि जातीय—प्रेम दाखवून या जगांत अनुपम व अतुलनीय महत्वाची अधिकारिणी झाली.

गुरु गोविंदसिंहांनीं ही वार्ता ऐकून एक सवैया म्हटली ती अशीः—

**हाल मुरीदादा कहना प्रीतम प्यारेनूं**

याचा अर्थ असा कीं तुम्ही सर्वजण प्रियतम प्रियकराजवळ जाऊन पोंचलांत; तेथें जाऊन त्याला भक्तांची करुणकहाणी ऐकवा. एका शिख–संगतींत ( शिखांचा जमाव ) एकदां ते म्हणाले:—

> **इन सुतनके कारणे वार दिये सुत चार**
> **चार दिये तो क्या हुवा जब जीवित चार हजार !!**

अर्थात् " जे मला पुत्रतुल्य आहांत अशा तुम्हांकरितां, मी आपल्या चार पुत्रांचे धर्मरक्षणार्थ बलि दिले आहेत. परंतु चौघांच्या मृत्यूची कांहीं खंती नाहीं; कारण माझे हे कित्येक हजार पुत्र जिवंत आहेत. " धर्म व जाती याबद्दल असलें अलौकिक ज्वलत्प्रेम गुरु गोविंदासिंहाच्या अंतःकरणांत वास करीत होतें. परंतु इतकें होऊन सुद्धां गुरु गोविंदासिंहांना आपलें काम अपुरें सोडून जाणें भाग पडलें. दक्षिणेमध्यें नादेर ( नांदेड—दक्षिण हैदराबादच्या राज्यांत आहे. ) या नांवाच्या गांवीं गुरु रहात असतां एका पठाणाच्या दोघां मुलांनीं त्यांच्यावर तरवारीचा घाव घातला; आणि त्यांतच त्यांचा अंत झाला. त्यांचें उरलेलें काम पूर्ण करणारा ' वीर वैरागी ' झाला. त्याचेंच जीवनवृत्त येथें लिहिलें जात आहे. या जीवनांतील मुख्य रहस्य पूर्ण तऱ्हेनें ध्यानांत यावें एवढ्यासाठीं—या जातीय चळवळीचें इतकें विस्तृत व जरा लांब पूर्ववृत्त देण्याची आवश्यकता होती. ' वीर वैरागी ' हा अकरावा गुरु होता कीं नाहीं या धार्मिक प्रश्नाशीं आपणांला तूर्त कांहीं कर्तव्य नाहीं. गुरु गोविंदसिंहांनीं जातेवेळीं आपला संदेश देऊन ठेवला होता कीं, सर्व शिखांनीं यापुढें ' ग्रंथसाहेबाला ' गुरु मानावें आणि एवढ्यासाठीं धार्मिक ग्रंथांमध्यें हे गुरु मानले गेले नाहींत. आणि एवढ्याकरितां आम्ही धार्मिक समजुतीच्या प्रदेशांत पाय ठेवूं इच्छित नाहीं. पंजाबच्या इतिहासांत ' वीर-वैरागी'चा एक महत्वपूर्ण भाग आहे. दहाहि गुरूंच्या मागून त्यांचें कार्य यांनीं पूर्ण केलें. या अर्थानें पाहिलें तर ' वीर वैरागी ' हिंदू जातीचा

सर्वांहून मोठा प्रवर्तक आणि सुधारक होऊन गेला. शिखपंथाच्या दृष्टीनें तो गुरु म्हणवावयाला योग्य नसेल, परंतु हिंदु लोक याला यथार्थतेनें गुरु म्हणूं शकतील. हिंदूंचा असा स्वभावच होऊन गेला आहे कीं त्यांनीं आपल्या अद्वितीय अशा नेत्याला गुरु अथवा अवतार मानून आनंद प्राप्त करून घ्यावा. यामुळें त्यांच्यांत प्रबल श्रद्धेचा अविर्भाव होतो; आणि तद्द्वारा धार्मिक जीवनाचें रसास्वादन ते अनुभवतात. गुरु गोविंदसिंहानंतर गुरुत्वाच्या पदवीला रजा देण्याचा परिणाम असा झाला कीं नामधारी-पंथ शिख असूनसुद्धां शिख-पंथापासून वेगळे पडले गेले. 'वीर वैरागी' च्या संबंधांत गुरुपणाबद्दल शिखांचा जो आक्षेप होता तोच आक्षेप बाबा रामसिंहाच्या विरुद्धहि होता.



वीर वैरागी बंदा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रं. क्र. २६५
२६१५१

# वीर वैरागी.

## १. जातीय वीर.

कोणतीहि जाति जिवंत असण्याचें एक चिन्ह आहे. आणि तें हें कीं तिच्यांत वेळोवेळीं महापुरुषांचा जन्म होतो. हेच महापुरुष अधोगतीच्य उतरणीवर लागलेल्या जातींत नवीन चैतन्य उत्पन्न करून आपल्या जातीला उन्नतीच्या मार्गावर चढवितात. ज्या जातीमध्यें पुष्कळ कालपर्यंत महात्मा पुरुष उत्पन्न होत नाहीं ती जाती एकतर मृत झाली आहे अथवा होणारी आहे असें खात्रीनें समजावें. जर आपण पूर्वकालीन मृत जातीचें स्मरण केलें तर तें स्मरण दुसरे कोणाचें नसून त्या जातींतील जन्म घेतलेल्या महापुरुषांच्या नांवाचें व जीवनवृत्तांताचेंच स्मरण आपणांला होतें आणि त्यांच्या त्या स्मरणामुळें त्या जातीच्या जीवनचरित्राचें चित्र आपल्या डोळ्यापुढें उभें रहातें. रुस्तम आणि इस्फंदयार या प्राचीन इराणी जातीचीं नांवें शिल्लक राहिलीं आहेत, त्यांचेमुळें त्या जातीचें प्राचीन गौरव आपणापुढें मूर्तिमंत उभें रहातें, आणि हीं नांवें त्या त्या जातींतील महापुरुषांमुळेंच जिवंत राहिलीं आहेत.

साधारणतः प्रत्येक मनुष्य आपापल्यापरीनें जातीय जीवनाच्या इमारतीची उभारणी आणि संरक्षण करण्यामध्यें थोडाबहुत भाग घेतच असतो. या संसारवाटिकेमध्यें कांटेरी झुडपें आणि कोमजलेलीं रोपेंहि आपलें आपलें काम करतात. परंतु वाटिकेचें सौंदर्य त्यांतील कांहीं फुलांमध्येंच असतें. वाटिका आणि अरण्य यामध्यें फरक इतकाच असतो कीं पहिल्यांत कोणतें ना कोणतें तरी फूल अवश्य असतेंच. आणि हेंच फुल त्या वाटिकेला सुगंधित करतें. मानवसृष्टीमध्यें क्रमभंगदोष कधींच नसतो. एका पिढीपासून

दुसरी पिढी येते परंतु तिचे रक्तांत एकच तेजलहरी अखंड कार्य करीत असते. आणि हिलाच जातीयता म्हणावयाचें. भाषा व साहित्य हीं या जातीयतेचीं चिन्हें आहेत. या सर्वांना जीवनदात्री शक्ति म्हटली म्हणजे महापुरुषांचें चरित्र हेंच होय. जर राम आणि कृष्ण झाले नसते तर रामायण व महाभारत हें साहित्य निर्माण झालें नसतें. राम आणि कृष्ण यांचें जीवन हिंदु–जातीचा आत्मा आहे. हिंदूंच्या घरांतून, त्यांच्या हृदयांतून, त्यांच्या इतिहासांतून आणि त्यांच्या भाषेतून राम–कृष्णांचा जिवनवृतांत जर काढून टाकला तर हिंदु–जाती प्रेतवत्–चैतन्यहीन होऊन जाईल. तिचे प्राणपक्षी उडून जातील.

राम व कृष्ण यांचें चरित्र इतकें उच्च आणि दिव्य होतें कीं, या जातींत पुष्कळ कालपर्यंत, ज्याच्यामध्यें त्या महापुरुषांचें तेज चमकलें जावें असा, कोणीहि पुरुष निर्माण झाला नाहीं. लोकांनीं त्यांना ईश्वरीय पद अर्पण केलें.

भारतीय इतिहासांत फार मोठमोठीं परिवर्तनें झालीं. देशाला कित्येक क्रांतींमधून आपला मार्ग काढावा लागला. या सर्व क्रांतींनीं अनुकूल अशा हिंदू जातिमध्यें एक वीर निर्माण झाला. तो क्रांतीचे भाव व सिद्धांत यांची साक्षात् मूर्ति होता. याप्रमाणें हा वीर एकदां शिकार खेळणारा रजपूत होता, दुसऱ्यावेळीं तपस्या करणारा संन्यासी झाला, तिसऱ्या अवस्थेंत विजेता सेनापति आणि शासक बनला आणि शेवटीं अत्यंत भीषण आपत्तीशीं टक्कर देणारा हुतात्मा झाला. पूर्वगुरूंनीं एक नवा पंथ उत्पन्न करून हिंदू–जातींत धार्मिक जीवन ओतलें; परंतु वीर वैरागी—ज्यानें, दाही गुरूंनाहि ज्या कार्याची सांगता करतां आली नाहीं त्या कार्याला पूर्णता आणली, मुसलमानांकडून धर्मावर व जातीवर झालेल्या अत्याचारांचा व छलाचा यथोचित सूड उगविला, हिंदुराजपदाचा अधिकारी झाला आणि अखेर धर्मासाठीं व जातीसाठीं हुतात्मतेच्या प्रखर कर्तव्याचा भार आपल्या शिरावर घेऊन तें आनंदानें व अतुल धैर्यानें पूर्ण केलें—तो जन्मतः हिंदू होता आणि मरणांतींहि हिंदूच राहिला.

कार्तिक शुद्धपक्ष संवत् १७२७ ( शके १५९२ ) च्या एका शुभ दिवशीं हिंदू जातीला अत्यंत पवित्र व कल्याणदायी सुमुहुर्तावर पहाडी

संस्थानांतील राजोर नांवाच्या गांवीं एका रजपूत मातेनें या जातीय धर्मवीराला जन्म दिला. त्याचें नांव लक्ष्मणदेव ठेवलें गेलें. त्याच्या पित्याचें नांव रामदेव असें होतें.

आमच्या चरित्रनायकाच्या जन्मस्थानच्या बाबतींत कित्येक दंतकथा प्रचलित आहेत. त्यामध्येंच त्यांचें जन्मस्थान दक्षिणेमध्यें होतें हेंहि एक आहे. दुसरी किंवदंती अशी आहे कीं, त्यांचा जन्म पंजाबामध्यें जालंधर जिल्ह्यांत झाला. परंतु ही कांहीं वादविवादाचें मोठें कारण बनावें अशी गोष्ट नाहीं. एखादा वीर पुरुष आपल्या जीवनांत जे गुण प्रकट करतो त्यांच्या योगानें तो तो काल व देश शुभ होतात. ज्या प्रदेशांत या वीरबालकांचा जन्म होतो त्या प्रदेशावर त्यांच्या वीरत्वामुळें प्रभाव पडतो. समय बदलत जातो. परिस्थितीहि पण बदलते. या परिस्थितीचा मनुष्याच्या भविष्यकालावर परिणाम घडतो. आपल्या चरित्रनायकाच्या वेळीं दिल्लीचें सिंहासनावर अवरंगजेब अधिष्ठित होता. त्यानें हिंदूंवर आपला अत्याचार सुरूं केला होता. सर्व देशभर याची चर्चा चालली होती. या वीराच्या जन्मस्थानांत सुद्धां एक विशेष होता; हा प्रदेश पहाडी होता. पहाडावर रहाणाऱ्यांना नेहेमीं वाघ, अस्वल वगैरे जंगली पशूंशीं झगडावें लागतें. त्यांच्यापासून आपल्या घरांचें व शेतांचें संरक्षण करणें त्यांना भाग पडतें. याचकरितां तरुणांना जंगली शिकार ही एक आवश्यक गोष्ट होऊन बसते. रजपूत घराण्यांत जन्म घेतल्यामुळें लक्ष्मणदेवाला शिकारीची फार आवड होती.

शिकारीसाठीं घोड्यावर बसतां येणें अत्यंत आवश्यक आहे. शिकारीच्या वेळीं जें कौशल्य मनुष्य शिकतो तेंच युद्धाच्या वेळींहि उपयोगीं पडतें. शिकार करतेवेळीं दुसरी एक कला जी साध्य होऊं शकते ती लक्ष्यवेध ही होय. नेम मारणें ही कला धनुष्यबाणानें असो किंवा बंदुकीनें असो अभ्यासाशिवाय साध्य होत नसते. धनुष्यबाणामध्यें लक्ष्यवेधाची कला जो साध्य करतो त्याला बंदुकीनें नेम मारणें फारच सोपें जातें. घोड्यावर बसणें आणि तिरंदाजी अथवा नेम मारणें हीं लहानपणींच सुलभ रीतीनें शिकलीं जाऊं शकतात. आणि सेनापतित्वाला रणचातुर्याबरोबर या वरील दोन गोष्टीहि अगदीं अवश्य आहेत. या तिन्हींमध्यें लक्ष्मणदेवानें पूर्ण प्रावीण्य

मिळविलें होतें. तो कुशल अश्वारोही बनलाच पण तिरंदाजहि असा होता कीं त्याचा तीर कधींहि व्यर्थ जात नसे. जगांमध्यें जितके राज्यसंस्थापक झाले, तितक्या सर्वांनीं लहानपणींच शिकारीमध्यें मिळणाऱ्या शिक्षणांत पूर्ण चतुराई संपादन केलेली आढळून येते. मध्यएशियामध्यें जंगली तार्तरी लोकांत, एशिया व युरोपमध्यें खळबळ उत्पन्न करणारा चेंगीसखान, कित्येक देशांना पददलित करणारा तैमुर, मोंगल राज्यसंस्थापक बाबर, दिल्लीच्या बादशाहीला जबरदस्त धक्का देऊन मोगलबादशाहीचें अस्तित्व संशयांत पाडणारा नादर, हिंदुस्थानांत हिंदुपदपादशाहीला जबरदस्त धक्का देण्याचा योग ज्याच्या वांट्याला आला असा अबदल्ली या सर्वांच्या पराक्रमाचें व सामर्थ्याचें रहस्य त्यांच्या लहानपणच्या शिकारीच्या प्रवीणतेंत दिसून येतें. असें म्हणतात कीं, युरोपीय जाती दुसऱ्या देशांत पहिल्यानें आपले पादरी ( धर्मोपदेशक ) पाठवितात, त्यांमागून त्यांचे व्यापारी जातात आणि सर्वांमागून तरवारी घेऊन तयार असलेल्या सैन्याला नेतात. परंतु याबरोबर आणखी एक गोष्ट यांत भरतीला घातली पाहिजे. आणि ती ही कीं पादरीच्या आधीं त्यांचे शिकारी जातात. आणि शिकारीनिमित्त इतर देशांत फिरत असतां नवे नवे धनधान्यसंपन्न देश ते टेहेळतात. आपल्या देशांत आपले मर्यादा-पुरुषोत्तम श्रीरामचंद्रसुद्धां वनवासांत इतर दुष्ट जातींवर आपला दाब शिकार करतां करतांच बसवूं शकले. श्रीशिवरायानीं लहानपणीं शिकार करतांनाच राज्यसंस्थापनाचे बीजभूत गुणांना आत्मवश केलें. हैदरअल्ली आणि रणजितसिंहानींसुद्धां याच कलेनें साफल्य प्राप्त करून घेतलें. सारांश, राज्य-संस्थापनेचें रहस्य लहानपणीं शिकारीमध्येंच प्राप्त होतें. ज्यावेळीं जगांमध्यें राज्यसंस्थापनेचा काल होता त्यावेळीं शिकार करतां येणें ही एक विशेष कला समजली जात होती. साधारण जनसमुदाय असेंच समजतो कीं, राज्य-संस्थापकांत कांहीं विशेष शक्ति कार्य करित असते. सर्व तऱ्हेच्या कामांत आणि पेशांत कांहीं विशेष रहस्य असतें ( इंग्रजीमध्यें याला Tradesecret ट्रेडसीक्रेट म्हणजे व्यापार–रहस्य वा पेशाभेद म्हणतात.) कोणत्याहि धंद्यांतला मनुष्य त्या धंद्यांतला भेद वा रहस्य दुसऱ्याला सांगावयाला सहसा तयार नसतो. परंतु तें रहस्य माहित झाल्यावर ती गोष्ट अगदीं साधारण असल्याचें दिसून येतें. मी कित्येक वर्षे इंग्लंड व अमेरिकेमध्यें घातलीं.

रोज हजामत स्वतः करण्यांत कित्येक वस्तरे खराब केले. वस्तऱ्याला धार लावून घेण्यांत किती पैसा खर्च केला. न्हावी लोकांना कित्येकवेळां विचारलें, पण वस्तऱ्याला धार लावतां येईना. कोणीहि न्हावी त्यांतील खुबी दाखविण्याला तयार होईना. जेव्हां जेव्हां वस्तरा तेज करण्याचा यत्न केला तेव्हां तेव्हां तो अधिकच खराब होत गेला. मी तुरुंगांत जाऊन पाहिलें तों कैदीहि साधारण लोखंडाच्या पत्र्याला घांसून वस्तरा बनवून घेतात. धार देतेवेळीं वस्तऱ्याच्या धारेला सहाणेवर वा दगडावर कधीं दाबूं नये. धार कसोटीवर दाबली म्हणजे वस्तऱ्याची धार जलदी तेज होईल असें साधारणतः वाटत असतें. परंतु याच दाबण्यानें ती तेज होण्याऐवजीं तुटतें व वस्तरा अधिक खराब होऊन जातो. याचप्रमाणें तुरुंगांत जाण्याच्या आधीं जिलबी करणें हें मोठ्या कौशल्याचें काम आहे असें मला वाटत होतें. परंतु तेथें गेल्यावर माहित झालें कीं, त्यांत कांहीं विशेष कला नाहीं, फक्त सामान पुरें पाहिजे. तेथें पुष्कळसे असे कैदी भेटले कीं जे साधू आणि फकीर बनून इतरांना ठकवित असतात. त्यांनीं आपल्या या धंद्यांतलें रहस्य असें सांगितलें कीं सोनें बनविणारे, दुसऱ्याच्या मनांतली गोष्ट सांगणारे, अथवा दुसरी एखादी करामत दाखविणारे वगैरे लोक गारुडी लोकांप्रमाणें एक दोन भेदी गृहस्थांना आपले साथी करतात आणि त्यांना प्रतिपक्ष्यासारखें भासवून त्यांच्या मदतीनें लोकांना फसवितात. नव्या मतमतांतरांच्या ढोंगी प्रवर्तकांचें असल्याच तऱ्हेचें रहस्य असतें. पहिल्यानें एकदोन भोळ्या भाबड्यांचा विश्वास बसवून घेऊन त्यांचेकडून आपल्या श्रेष्ठपणाची टिमकी पिटविवतात. याचप्रमाणें राज्याचें रहस्य शिकारीमध्यें आहे. त्यामध्यें मनुष्याचे मनाची मृदुलता जाऊन तें कठिण होतें; त्याला शत्रूचा पिच्छा करण्याच्या युक्त्या माहित होतात; शत्रूला आपल्या ताब्यांत आणणें, पेचांत धरणें व विनष्ट करणें वगैरेंचे उपाय जाणण्यांत तो निपुण बनतो. त्याच्या मनांतून शत्रूबद्दलचा दयाभाव नाहींसा होतो; युद्धनीतीचेहि हेच मुख्य नियम आहेत.

# २. जीवनपरिवर्तन.

दरोडेखोराचा धंदा करून नागरिकाला लुटावयाचें व आपला चरितार्थ चालवावयाचा हाच वाल्मीकीचा पहिल्यानें व्यवसाय होता हें सर्वांना माहित आहे. याचप्रमाणें कित्येक दिवस होऊन गेले कांहीं शिकार मिळाली नाहीं. अंधेऱ्या रात्रीं कोणी तरी भेटेल व त्याला लुटावयाला मिळेल म्हणून तो पाळतीवर होता. अखेर जंगलांतील खालीं पडलेल्या वाळलेल्या पानांची खडखड ऐकली, लागलीच डाकूनीं आपले कान उभारले. पहातो तों एक नग्न व दिगंबर पुरुष समोरून येतांना दिसला. हें पाहून वाल्मीकि मार्ग अडवून उभा राहिला. हा पुरुष साधू होता. साधूनें त्याला ज्ञानाच्या गोष्टी सांगावयाला आरंभ केला आणि त्याला विचारलें कीं तूं हें पाप कोणासाठीं करित आहेस ? डाकूनें म्हटलें,—हा उपदेश तूं आपल्यापाशींच ठेव. फार दिवसापासून मला कांहीं मिळालें नाहीं; तुझ्यापाशीं काय असेल तें पहिल्यानें खालीं ठेव. साधूनें पुन्हां तोच प्रश्न केला तेव्हां डाकू थोडासा शुद्धीवर आला व उत्तरला, " मी आपली माता, पत्नी आणि मुलें यांचेसाठीं लुट करीत असतों. " साधूनें त्याला सांगितलें कीं, " तूं त्यांचेकडे जा आणि मी तुमच्यासाठीं करीत असलेल्या लुटमारीच्या पापांच्या दंड—भोगांत तुम्हीं हिस्सा घ्याल काय ? " असें त्यांना विचार. डाकू थोडासा गोंधळला तर खराच; परंतु म्हणूं लागला कीं, " तूं कसा तरी मला टाळून निसटून जाऊं पहात आहेस. " साधूनें मी येथून हालणार नाहीं अशी प्रतिज्ञा केली आणि त्याला विचारून यावयाला सांगितलें. साधूला वृक्षाशीं बांधून तो डाकू घरीं गेला. तुमच्यासाठीं माझ्या हातून घडणाऱ्या पापामध्यें तुम्ही वाटेकरी व्हाल काय असा प्रश्न त्यानें मातेला व स्त्रीला केला. आणि या प्रश्नाचें उत्तर जें मिळावयाचें तेंच मिळालें " हें कसें होऊं शकणार ? हरएक मनुष्य आपआपल्या कर्मांचा आपण स्वतःच धनी

असतो. आम्हीं काय म्हणून भागीदार व्हावें ? " हें उत्तर त्याला मिळालें. डाकूचा भ्रम दूर झाला. त्याचा जीवनस्रोत या बांधानें एकदम उलटला. पहिल्या क्षणाला तो डाकू होता परंतु या घटनेनें दुसऱ्याच क्षणीं ऋषिमार्गगामी झाला. लहानशी घटना घडते. अंतःकरणावर आघात होतो आणि तेवढ्यानेंच सर्व जीवन बदलून जातें. लक्ष्मणाच्या जीवनक्रमांत अशीच एक घटना घडून आली त्यामुळें त्याचे आयुष्यक्रमांत एक महान् परिवर्तन घडून आलें. बुद्ध भगवानाच्या आयुष्यांत असाच फरक घडून आला, त्यांच्या विचारानें पालट खाल्ली आणि राजवाट सोडून त्यानें अरण्य-सेवन केलें. समोर हरिणी चौकडीवर उडत बागडत जात होती. लक्ष्मणाचा तीर धनुष्यापासून सुटला. त्याचा तीर कधींहि व्यर्थ होणारा नव्हता. हरिणी एकदम जमिनीवर लोळवली गेली. लक्ष्मणानें हरिणीचें पोट कापलें. ती गर्भिणी होती; पोटांतून कांहीं बच्चे निघाले आणि त्या बच्च्यांच्या आईनें तडफडून प्राण सोडले.

लक्ष्मण जवळच उभ्याउभ्या हें सर्व पहात होता. त्याच्या मनावर एक विलक्षण परिणाम झाला. हे गरीब व निरपराधी बच्चे मातेच्या पोटांत होते आणि याच्या तीरानें तिला घायाळ केलें, व यामुळें त्या पाडसांचे होणारे हाल तो वीर रजपूत सहन करूं शकला नाहीं. त्यानें आपल्या धनुष्यबाणाच्या साह्यानें मोठमोठे पशु मारले आणि प्राण्यांची हत्या केली; परंतु या लहानलहान पाडसांचा क्लेशपूर्ण मृत्यु पाहून त्यांचें हृदय विद्ध झालें. हा त्याच्या अंतःकरणावरचा आघात इतका खोल बसला कीं, त्यानें संसारापासून दूर होण्याचा निश्चय केला. मृत्यूचें दृश्य पाहून मोठमोठ्या कठिण मनुष्यांचीं मनेंहि संसारापासून परावृत्त होतात. स्वामी दयानंदाचे चुलत्याचा मृत्यु झाला, आणि स्वामीजी मुक्तीच्या शोधासाठीं घराबाहेर पडले. आमच्या मनांत संसाराबद्दल विरक्ति उत्पन्न होते परंतु ती स्मशान-भूमीपर्यंतच टिकते. (स्मशानाकडून तोंड फिरतांच विरक्तीकडे पाठ होते.) आणि येवढ्याचसाठीं त्याला स्मशानवैराग्य म्हटलें जातें. पित्याच्या मृत्यू-नंतर स्मशानाच्या सीमेपासूनच भावाभावांत ज्या मालमत्तेला सोडून त्यांचा पिता सोडून गेला त्याच मालमत्तेसाठीं वाटणीबद्दल तंटे सुरू होतात. विशालहृदयी पुरुषांत हा विशेष असतो कीं त्यांच्या अंतःकरणावर एकदा पडलेला प्रभाव चिरस्थायी होतो. जग पालटेल, त्यांच्या निश्चयांत पालट

होत नाहीं. लक्ष्मणदेव घर सोडूं इच्छित होता. तो एक जानकीदास नांवाच्या साधूला जाऊन भेटला. हा साधू याला घेऊन कसूर (लाहोर) ला आला. येथें यानें साधूवेश धारण केला. आपलें नांव माधवदास ठेवलें, व वैरागीपदाचा स्वीकार केला.

मनुष्य संसारापासून सुटावयाला पहातो; परंतु संसार मनुष्यापासून सुटूं इच्छित नाहीं. बाहेर दिसणारा सर्व संसार आमच्या आंत पूर्णपणानें वास्तव्य करीत आहे. बाहेरच्या संसारापासून आपण पळून जाऊं पहातो, परंतु आंतल्या संसारापासून आम्हीं कसे पळून जाणार? तार्किक असें म्हणतात कीं, आमचा संसार हा आमच्या फक्त मनाच्या संकल्पस्वरूपाचा असतो. आमच्या कामना आणि विचार हाच आमच्या मनांतला तो संसार होय. प्रत्येक मनुष्याच्या मनांत असणाऱ्या कामनाच मनुष्याला बाह्य संसाराशीं निगडित करतात. आमच्या मनांत एक इच्छा उत्पन्न होते. इच्छापूर्तीसाठीं आम्हीं साधनें धुंडतों आणि बाह्य संसार आमच्यांत प्रवेश करतो. ह्या इच्छा आमच्यांत उत्पन्न होऊं नयेत असें आपणाला वाटतें परंतु आमच्यामागें इंद्रियें लागलेलीं आहेत. तीं आपलें भक्ष्य शोधित असतात आणि आम्हाला इच्छांची शिकार बनवितात.

या अंतर्गत संसाराला मारण्याचें साधन तप आहे. मन एक सांडाप्रमाणें आहे, तें आपल्या स्वाधीन होत नाहीं. बैलाला दोरीनें बांधून गाडीला जुंपलें जातें, तसें मनाला ध्येयाकडे नेणाऱ्या कर्तव्याला जुंपणें हेंच तप होय. इंद्रियांना त्यांचें त्यांचें खाद्य न देणेंच त्यांना निर्बल करणें आहे. आणि अशा रीतीनें तीं निर्बल झाल्यावर त्यांच्यापासून होणाऱ्या इच्छा मारल्या जाऊं शकतात. हिंदूंचीं तीर्थस्थानें फार सुंदर अशीं निसर्गरमणीय स्थानें आहेत. या स्थानीं जाऊन मनुष्य निसर्गाच्या रमणीयतेला पुनःपुन्हां बघत राहतो, त्या प्राकृतिक सौंदर्यावर तो मोहित होऊन जातो. त्याचें अंतःकरण संसारापासून विन्मुख होऊन परमात्म्याच्या मोहनशक्तीकडे वेधलें जातें. त्या स्थानीं ज्यांचीं मनें संसाराला विटून निसर्गसुंदरतेकडे धांव घेतात अशांशीं मनुष्याचा सहवास घडतो. आपला वैरागी संसाराच्या सुखभोगांना लाथ मारून सत्संगतीच्या शोधांत तीर्थपर्यटण करीत करीत अखेर घोर तपाच्या इच्छेनें पंचवटीच्या वनांत गेला आणि तेथें त्यानें आपला डेरा दिला. श्रीरामचंद्र, श्रीसीतादेवी व लक्ष्मण यांचेसह, ज्या वनांत वनवास कराव-

यास गेले होते तेंच हें पवित्र वन होतें. या वनांत वैरागीनें तपाला आरंभ केला. जेव्हां त्याला साधूसहवासाचा लाभ घडे तेव्हां त्यांच्यांशीं तो ज्ञान-ध्यानविषयक चर्चा करीत असे. याप्रमाणें कांहीं काल तप केल्यावर त्याला एका महात्म्याचा लाभ झाला आणि त्याच्या त्या साधु पुरुषाच्या सेवा-शुश्रूषेनें त्याला गुरुकृपारूप फल मिळून तो सिद्ध बनला. यावेळीं याचें वय बावीस वर्षांचें होतें. यानंतर पंचवटींतून निघून त्यानें गोदावरीच्या काठीं असलेल्या नावेर ( नांदेड—दक्षिण हैद्राबादच्या मुलखांत आहे ) या गांवीं जाऊन तेथें आपलें निवासस्थान केलें. हळू हळू याच्या योग्यतेची चर्चा लोकांत होऊं लागली. लोकांच्या झुंडीच्या झुंडी याच्याकडे जात व याचे शिष्य बनत. वैरागी दक्षिणेंत महंतपदाला पोंचला. त्याच्या अंगांत कांहीं असाधारण ईश्वरी शक्ति आहे, आणि तिचे जोरावर त्यानें भूत-पिशाच्चें स्ववश केलीं आहेत असें लोक समजत असत.

वैरागाची ही कीर्ति त्याला फार उपयोगी पडली. हा कालच असा होता कीं, मुसलमान शासकसुद्धां भूत वगैरे मानीत असत. आणि त्या भुता पिशाच्चांना वश करणारा मनुष्य असाधारण शक्तिसंपन्न असतो अशी त्यांची समजूत असे. जेव्हां वैरागी मुसलमानी सेनेशीं भिडत असे तेव्हां त्याच्या त्या अमानवी शक्तीचें त्यांना फार भय वाटत असे.

# ३. गुरु गोविंदसिंह.

वैरागी माधवदास गोदावरीच्या तटीं आपल्या स्थितींत मग्न होता. तो महन्त होऊन राजसी थाटांत रहात असे. लोक त्याची पूजा करीत असत. त्याचें राहण्याचें स्थान मोठें होतें. स्त्री-पुरुष त्याचें नित्य पादवंदन करीत असत. आपले पूर्वसंबंधाचें याला विस्मरण पडलें होतें. पंजाबांत शीख गुरूनें धर्म रक्षणाचें आंदोलन जोरांत चालविलें होतें व त्यांत त्यांना फार कष्ट सहन करावे लागले हें कदाचित् त्याला कर्णोपकर्णीं कळलेंहि असेल. परंतु वैरागीला त्याचें काय ? यानें तर संसार सोडून दिला होता. हे झगडे तर सांसारिक गुंतागुंतीचे आहेत. यांच्याशीं त्या संसारत्यागीचा काय संबंध ? जेथें जेथें धर्माचे नांवावर महन्ताच्या गाद्या व मठ स्थापन होतात, ते नुसते नांवाचे सत्यमार्गी म्हटले जातात, परंतु वास्तविक ते जगाला भारभूत होऊन बसतात.

असो. गुरु गोविंदसिंहांना पंजाब सोडणें भाग पडून ते दक्षिणेंत येऊन पोचले. आपल्या काळजाचे चारी तुकडे तरवारीला देशासाठीं बळी देऊन सुद्धां चारी बाजूला निराशेची छाया पसरल्यामुळें देश आणि धर्म यांच्या रक्षणाचा विचार त्यांच्या अंतःकरणांत मंद होत चालला होता कीं काय ? असे कोण म्हणूं शकेल ? त्यांचें आपल्या प्रांताच्या व शिखांच्या साह्यावर समाधान होईना. कदाचित् आशेची सोनेरी लकेर दुसरीकडे कोठें दिसेल म्हणून ते पाहूं लागले. वैरागीची कीर्ति त्यांच्या कानावर आलेली होती. कोणी राजा अथवा महापुरुष यावेळीं साह्य करूं शकत होता. इतर साह्य अपुरें होतें.

दक्षिणेंत मराठे वीस वर्षेंपर्यंत औरंगजेबाशीं टक्कर देत होते. औरंगजेब आपली सारी फौज घेऊन त्यांना चिरडून टाकण्याचा प्रयत्न

करीत होता. मराठे लोकांनीं वृकयुद्ध—गनीमी काव्याचें युद्ध—करून, अवरंजेबाचें सैन्य जरी बादशाही थाटाचें व सर्वसाधनसंपन्न होतें तरी, त्याला थकवून मारलें. " फौजेची तयारी होतां होतां दोन प्रहर होत होते. अकबराचे कायदे आणि जहांगिरची चैनबाजी यांनीं शहाजहानच्या आबादीच्या व शांततेच्या काळांत नवीनच स्वरूप धारण केलें होतें. राज्याच्या महत्वामुळें व भरभराटीमुळें सैन्याचा रागरंग अगदीं बदलून गेला होता. लोक जेव्हां तैमूर किंवा बाबरच्या सेनेबरोबर शहाजहानाच्या सेनेची तुलना करीत तेव्हां आश्चर्यचकित होत असत. फौजेमध्यें लहानांतल्या लहान तुकडीवाल्याची अशी स्थिती होती कीं, जेव्हां त्यांची स्वारी निघे तेव्हां ती फौजेची तुकडी म्हणजे एक नवरदेवाची वरातच वाटत असे. फौजेंत सर्वांच्या पुढें हत्तीवर शाही झेंडा फडकत असे. त्याच्या मागें कित्येक हत्तीवर नगारे वगैरे वाद्यें असत. नंतर ज्यांच्या अंगावर भरजरी झुला पायापर्यंत झुलावयाच्या असे सोनेरी साखळ्यांनीं सजविलेले हजारों हत्ती चालत. त्यांच्या मागें लोखंडी चिलखतांनीं नखशिखांत झांकलेले हजारो स्वारांचे पहारे दिसत. हे हातांत सातगजी बर्च्छे घेतलेले व घोड्यावर स्वार झालेले असावयाचे. त्यांच्या मागें अंगांत पिवळे अंगरखे, डोक्याला लाल पगड्या आणि बनातीचे पायजमे घातलेले हजारों राजपूत सांडणीस्वार; त्यांच्यामागें अंगांत किनखाफ आणि भरजरी पोषाख घालून काश्मिरी शाली बांधलेले हजारो खासे स्वार; त्याच्यामागें रस्त्यावर सडा शिंपणाऱ्यांची झुंड रस्त्यावर शिडकाव करीत जावयाची, नंतर दर्बार, (राजवंशीय व नजीकचे मानमरातबवाले लोक) दरबारच्या मध्यभागीं स्वतः बादशहाची स्वारी असे. स्वारीच्या घोड्याच्या मागें जरूर पडल्यास अंबारीनें सज्ज असा एक हत्ती चाले. स्वारीच्या एक कोस मागें अंतरावर जणूं कांहीं काळा मेघच अशा शेंकडो मस्त हत्तींची झुंड येत असलेली आणि त्यांच्या मागें चित्यांचे छकडे व सिंहांशीं सामना करण्यासाठीं नामांकित शिकारी कुत्रे असत. कित्येक कोस पर्यंत राजकुमारांची व इतर महाराजांचीं सैन्यें आपापल्या पताका फडकावीत मागाहून येत असत. "

" सबंद दिवसांत हें लष्कर दोन अडीच कोसाची मजल मारी. तों सायंकाल होऊन जाई. इकडे सामानसुमानाच्या लटांबराशिवाय पहाडी तट्टावर स्वार झालेले मराठे एकाएकीं या अगडबंब लष्कराच्या कोणत्या तरी भागावर छापा घालीत, व लूटमार सुरू करीत. शाही फौजेची दृष्टि त्यांच्याकडे वळते तोंच ' वे गये ' ' वे गये ' ( ते गेले, ते गेले ) अशी रडत बसण्याची पाळी त्यांच्यावर येई. थोडा वेळ जातो तों आणखी कोणत्या तरी बाजूनें पुन्हां आपत्ति तयार आणि लूटमार सुरूं. सैन्य त्यांचा पिच्छा करावयाला जों तयार होते तों त्यांचा मागमूससुद्धां रहात नसे. अशा प्रकारें दक्षिणेमध्यें युद्धें सुरू होत. आणि याची वार्ताहि कर्णोपकर्णीं वैराग्याला कळत असली पाहिजे. कधीं कधीं त्याच्याहि मनांत विचार येत असतील व त्याला पहिल्या गोष्टींचें स्मरण होत असेल. परंतु एकवार त्यानें संसाराला सोडचिठ्ठी देऊन टाकली होती; आतां त्यानें काय म्हणून मैदानांत यावें !!" ( हें एका ठिकाणचें वर्णन उद्धृत केलेलें आहे. )

उज्जयिनीमध्यें गुरु गोविंदसिंहाची दाउद–पंथी गुरु नारायणदासशीं भेट झाली. तो रामेश्वरच्या यात्रेहून परत जात होता. गुरुगोविंदनें त्याला विचारलें—त्या बाजूला काय पाहिलें ? नारायणदासनें सांगितलें—" बाकी तर सगळे दगड माती होते परंतु नावेरमध्यें एक वैरागी महंत आहे व तो अद्वितीय आहे. भूत व पिशाच्च त्याला वश आहेत, त्याचे नोकर आहेत. बस्स, तोच पुरुष दर्शनयोग्य आहे. " गुरुगोविंदसिंहानें त्याला भेटण्याचा निश्चय ठरविला असावा असें वाटतें. हे फिरत फिरत त्या मठांत जाऊन पोंचले. दोन वीरांची भेट झाली. असे दोन वीर आणि तेहि अशा परिस्थितींत क्वचित्च कधीं भेटले असतील. हे एकमेकांना ओळखीत नव्हते; परंतु त्या दोघांच्या अंतःकरणांत असलेल्या वीरतेच्या समानभावानें त्यांचीं दोन अंतःकरणें समरस केलीं. गुरु गोविंदसिंहानें महान् स्वार्थत्याग केला होता, तसा वैरागीला अजून करावयाचा होता. एकाचा दिव्य भूत काल होऊन चुकला होता, दुसऱ्याचा

भविष्य काल यावयाचा होता. वैरागीनें आपल्या मातृभूमीची अवस्था गुरूंच्या डोळ्यांनीं पाहिली. मातृभूमीचा नाश झालेला पाहून त्याचें हृदय विकल व विदीर्ण झालें. वैरागीच्या जीवनांत पुन्हां महान् परिवर्तन झालें. अशी ही दुसरी वेळ आली. गार्भिणी हरिणीच्या शिकारीनें तिचे व तिच्या पाडसांचे तडफडत प्राण जातांना पाहून, शूर शिकारी राजपूत लक्ष्मणला वैरागी माधवदास बनवून सोडलें. संसाराला विन्मुख होऊन, संबंधीयांचा संबंध तोडून जंगलोजंगलीं भटकत फिरण्यास त्याला भाग पाडलें. आतां एका खऱ्या क्षत्रियाची भेट झाली. या क्षत्रियानें वैरागीच्या हृदयांत–संसारापासून दूर व अलग रहाणाऱ्या आणि जगाबद्दल निष्काळजी आणि उदासीन राहणाऱ्या योग्याच्या अंतःकरणांत-क्षात्रधर्माचें पुन्हां बीजारोपण केलें. धनुष्यबाण टाकून आपल्या संबंधीयांच्या मोहानें कर्तव्यमूढ झालेल्या अर्जुनाला, श्रीकृष्णभगवानानें क्षात्रधर्माचा ज्याप्रमाणें उपदेश केला, त्याचप्रमाणें वैरागीच्या अंतःकरणफलकावर आपल्या मातृभूमीच्या दुःखार्त स्थितीचें चित्र खोदून तिला असह्य कष्टांपासून व भयंकर दुःखांपासून मुक्त करण्याकरितां गुरु गोविंदसिंहानें वैरागीला वीररसाचें पान करावयाला तयार केलें, व या साधु वैरागीला पुन्हां दुसऱ्यांदां शस्त्रधारी क्षत्रिय बनवून सोडलें.

पहिल्यावेळीं एका हरिणीच्या संतानांचे मृत्यूनें क्षत्रियाच्या अंतःकरणांत परिवर्तन करून त्याला वैरागी बनविलें, दुसरे वेळीं मातृभूमीच्या संतानांचे मरणप्राय दुःस्थितीनें वैरागीचे अंतःकरणाला मातृभूमीच्या दुःखमोचनासाठीं उद्यतायुध अशा वीरवर क्षत्रियत्वाचा रंग चढविला.

गुरु गोविंदसिंहाचे उद्देश्याचा भार वैरागीनें आपल्या शिरावर घेतला. वैराग्याचा त्याग ( जगाबद्दलच्या उदासीनतेचा त्याग ) केला आणि कर्मयोगाच्या आयुःक्रमाचा अवलंब केला. या भेटींत गुरूनें वैरागीच्या कीर्तीची आणि योग्यतेची फार प्रशंसा केली. वैरागीनें नम्रपणानें उत्तर दिलें–" मी आपला बंदा ( दास ) आहे. " गुरु म्हणाले–" तूं जर दास ( बंदा )

आहेस तर आपल्या मातेची सेवा ( बंदगी ) कर." वैरागीनें आज्ञा मान्य केली. यामुळें शिखामध्यें याचें नांवच "बावा बंदा" असें पडलें. शिखांच्या इतिहासांत याला 'बंदा बहादर' या नांवानें उल्लेखितात. यावेळीं याचें वय छत्तीस वर्षांचें होतें.

मातृभूमीच्या प्रेमानें वैरागीला कर्तव्यपालनासाठीं पंजाबकडे जावयास लावलें. याचेबरोबर कांहीं शिखही गेले होते. हे गुरूचे शिष्य होते; परंतु त्यांच्या मनांतून लोभ नाहींसा झाला नव्हता. रस्त्यांत रुपये खर्च होऊन गेले; तेव्हां वैरागीजवळ त्यांनीं रुपये मागितले व त्याला त्रासवून सोडलें. कारण संतोषवृत्ति त्यांना ठाऊकच नव्हती. भरतपुरला पोहोचल्यावर कांहीं पंजाबी व्यापारी याला भेटावयास आले. त्यांनीं एक मोठी रक्कम वैरागीपुढें भेट म्हणून ठेवली. वैरागीनें हे रुपये त्या धनलोभी शिखांना वाटून दिले. त्यामुळें स्वार्थाच्या लोभासाठीं हे शिख वैरागीचे शिष्य बनले. श्रावण सं. १७६४ ( शके १६३० )मध्यें हे सर्वजण 'खंडा'स पोचले. तेथून करसला, नगरोटा, या ठिकाणावरून टोहान्याला पोंचले. हिसारला गेल्यावर वैरागीनें माळव्याच्या शिखांना पत्रें लिहून पाठविलीं. वैरागीचें नांव व यश हीं वायूंत मिसळलेल्या प्रबल सुगंधाप्रमाणें चोहोंकडे फैलावलीं होतीं. यामुळें पुष्कळसे शिख याच्याजवळ जमा होऊं लागले. भिवानीला असतांना वैरागीनें बादशाही खजिना मारून आपल्या शिखांत ते रुपये वाटून दिले आणि तें धन आपल्या घरीं पोहोचविण्यासाठीं त्यांना सुट्टी दिली. या बातमीमुळें पुष्कळसे लोक धनाचे लोभानें वैरागीजवळ जमा होऊं लागले.

## ४. निवृत्तिमार्ग व प्रवृत्तिमार्ग.

वैरागी वैराग्यधर्म सोडून राजधर्मांत प्रवृत्त झाला. असें करणें अनुचित झालें, हें योग्य नव्हतें हा एक धर्मतत्वाचा विचार करण्यासाठीं मोठा योग्य प्रश्न आहे. यावेळीं या प्रश्नावर विशेष विचार करण्याची कांहीं विशिष्ट आवश्यकता नव्हती, परंतु पुढें गेल्यावर आमच्या नजरेस पडेल कीं जेव्हां सगळे शिख बाहशहाच्या भेदनीतीला बळी पडून वैरागीशीं विमुख झाले त्यावेळीं त्यांनीं वैरागीचेवर "गुरु गोविंदसिंहानें 'तूं विवाह करूं नकोस' असें सांगितलें असतां सुद्धां यानें लग्न केलें–" असा आरोप प्रसिद्ध केला. आणि यामुळें याचें तप भ्रष्ट झालें आहे व म्हणून आम्हीं सर्वजण याची साथ करूं शकत नाहीं असा बहाणा त्यांनीं केला.

सेनानायकाच्या स्वरूपांत वैरागीला कित्येक युद्धें लढावीं लागलीं. त्यांत त्याला सफलता प्राप्त झाली, आणि कित्येकवेळां शत्रूच्या हातावर तुरी देऊन पहाडी संस्थानांतहि जाऊन आश्रय घ्यावा लागला. युद्धकालांत इंद्रियदमनाचा समय नसतो. वैरागीनें मंडीच्या संस्थानांत विवाह केला व तेथें त्याला एक मुलगा झाला. जे लोक याचे विरुद्ध केले गेले होते त्यांनीं वैरागीच्या कीर्तीला कलंकित करण्यासाठीं विवाहाच्या घटनेचें एक निमित्त उपयोगांत आणलें. जेव्हां वैरागीनें एकांतवास सोडून क्षात्रधर्मासाठीं युद्धक्षेत्रांत अवतीर्ण होण्याकरितां पंजाबकडे धांव घेतली, त्यावेळीं त्यानें क्षत्रियत्वाचा स्वीकार केलेला होता. आणि क्षत्रियासाठीं गुरु गोविंदसिंहाची अशी संमति होती कीं, "तरवार हा क्षत्रियाचा प्राण आणि स्त्री त्याचें इमान (पत्नीव्रताचें शील) आहे." क्षात्रधर्माचें पालन करीत असतां विवाह करणें ही निर्बलता नाहीं. (वैरागी केवळ क्षात्रधर्माचा स्वीकार करून युद्धक्षेत्रांत उतरला होता. त्यानें पारमार्थिक गुरुत्वाचे पदाचा वैरा-

ग्यदीक्षायुक्त स्वीकार करण्यांचा मार्ग त्याबरोबर धारण केला नव्हता. गुरु गोविंदसिंह गुरु होते, साधू होते, उपदेष्टे होते, परमार्थमार्गदर्शक होते, असें असूनसुद्धां विवाह करणें हें त्यांना विसंगत वाटत नव्हतें; मग वैरागीचेवरच अविवाहितत्वाचा एवढा बोजा कां ? तो विवाहित झाला नसता तरी शत्रूला फितूर झालेल्या शिखांना कोणतें ना कोणतें तरी निमित्त काढून वैरागीला सोडणें केव्हांच अशक्य झालें नसतें. विरुद्ध जावयाचें ठरल्यावर मग निमित्तांना काय तोटा ! ( कृतघ्न, दुष्ट, नीच आणि स्वार्थी मनाच्या लोकांना कांहींच अशक्य नाहीं. ) किंबहुना संस्थानांशीं संबंध जोडण्यांत आपल्या कार्याला बळकटी येत असल्यामुळें असें करणें हें वैरागीला कर्तव्यच होऊन बसलें असेल. जर आम्हांला विचारच करावयाचा असेल तर निवृत्तिमार्ग व प्रवृत्तिमार्ग यांत कोणता अधिक चांगला अशा दृष्टीनें प्रश्न पुढें ठेवतां येईल.

निवृत्तिमार्ग म्हणजे आपल्या मुक्तीसाठीं वा शांतीसाठीं प्रपंच सोडून परमार्थमार्गाचें अवलंबन करणें होय. जगांत पुष्कळ लोक असे आहेत कीं प्रवृत्तीमार्गापेक्षां याच मार्गाला ते अधिक चांगला समजतात. जेव्हां समाज आपल्या स्वाभाविक सुस्थितीमध्यें असतो तेव्हां या सिद्धांतावर कांहीं आक्षेपहि येऊं शकत नाहीं किंवा त्याला विघ्नहि येत नाहीं. प्रत्येक मनुष्यानें आपणाला सुधारणें व पूर्णत्व प्राप्त करून घेणें हें त्याचें या आयुष्यांतील एक मोठें उद्देश्य आहे यांत कांहीं शंका नाहीं. जेव्हां प्रत्येक मनुष्य आपणाला उच्चस्थान प्राप्त करून घेतो तेव्हां समाजाच्या उच्चतेची सिद्धि आपोआप होते. हा व्यक्तिगत उन्नतीचा मार्ग आहे. परंतु ज्यावेळीं समाजाला एखादा रोग जडला असेल आणि तो समाजाला आंतून पोखरीत जात असेल किंवा एखादी बाह्य शक्ति जेव्हां एखाद्या समाजाला बाहेरून नष्ट करीत राहील त्यावेळीं व्यक्तिगत उन्नत्यर्थ उपरिनिर्दिष्ट निवृत्तिमार्ग हा दोषपूर्ण आहे. अशावेळीं दोषविरहित आणि खरा श्रेयस्कर असा दुसरा एक मार्ग आहे. या मार्गाला लागलेल्या मनुष्याची दृष्टि केवळ स्वतःवर नसते. उलट ‘ समस्त समाज ’ हाच त्याचा ध्यानबिंदु असतो.

२४७४ ५१

ज्यावेळीं जातीतील लाखो-क्रोडो लोकांना आपत्तिसमुद्राच्या वादळांत सांपडून चक्काचूर होण्याची व बुडण्याची भीति असते त्यावेळीं जो मनुष्य व्यक्तिगत उन्नतीचा प्रचार करतो तो त्या जातीचा मोठा वैरी व अहित-कर्ता होत असतो. त्याच्या उपदेशांत कितीहि शांति भरलेली असो वा कितीहि तत्वज्ञान भरलेलें असो. त्याचें आयुष्य कितीहि नैतिक गुणांनीं मंडित असो, केवळ व्यक्तिगत उन्नतीच्या अप्रासंगिक अवलंबनानें हीं सर्व त्याच्या जातीला वा देशाला विषासारखीं मारक होतात.

समर्थ रामदास, स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद यांना अशाच वेळा आल्या होत्या. ते योगी होते—ज्ञानी होते—भक्त होते. त्यांना योगाच्या, ज्ञानाच्या व भक्तीच्या बलावर स्वतः मुक्ति प्राप्त करून त्यांतच मग्न राहतां आलें असतें. परंतु दुसरीकडे त्यांची सर्व जाति संकटाच्या व आपत्तीच्या भयंकर गाढ अंधःकारांत गोते खात होती. धर्माचा नाश होत होता. सर्व प्रकारचे ठक, लोकांना धोक्यांत घालून, आपला सन्मान कीर्ति व स्वार्थ साध-ण्याच्या कृत्यांत गुंग होते. या महात्म्यांनीं असाच विचार केला कीं, मी आपल्या एकट्याच्या मुक्तीला घेऊन काय करूं, माझी मुक्ति मला प्रयत्नानें मिळेल, परंतु माझी जाति—माझे सर्व सहधर्मी लोक—आपत्तींच्या रौरवांत पचत राह-तील, हें इष्ट नाहीं. त्यांनीं प्रपंचत्यागाचा रस्ता ( निवृत्तिमार्ग ) सोडून दिला. तत्काल योग्य धार्मिक वा राजकीय आंदोलनाच्या क्षेत्रांत उडी घेऊन आपापल्या सामर्थ्यानुसार सिंहगर्जना सुरू केल्या.

भगवद्गीतेंत संन्यास व कर्मयोग यांचेविषयीं प्रश्न करतेवेळीं अर्जुनानें श्रीकृष्णाला म्हटलें—" कधीं तूं एक मार्ग दाखवितेस तर कधीं दुसराच उपदेशितोस. या दोहोंमध्यें कोणचा अधिक श्रेयस्कर आहे हें मला सांग " श्रीकृष्णानें उत्तर दिलें—" कर्मयोग व संन्यासयोग हीं दोन्हीं एकच आहेत. भेद केवळ आपल्या आपल्या बुद्धींत आहे. युद्धाचेवेळीं धर्मासाठीं लढत असतां जयापजयाविषयीं समबुद्धि ठेवून दुसऱ्याचे प्राण घेणें वा आपले प्राण देणें हाच संन्यास व हाच कर्मयोग आहे." बुडता देश व नष्ट-

होत असणारी जाति यासाठीं स्वात्मार्पण करणें हा सर्वांहून उच्चतम त्याग आहे. या उद्देश्याचा स्वीकार करून जो पुरुष प्रवृत्तिमार्गाचा स्वीकार करतो तो निवृत्तिमार्गानें प्राप्त होणाऱ्या श्रेयापेक्षां कितीतरी श्रेष्ठतर श्रेयःप्राप्तीचा अधिकारी होतो. जातीय रोगावर उपाय अचूक मार्गदर्शकत्व हा आहे. स्वतः कार्यक्षेत्रांतून अंग काढून घेणें ही कातरता—भीरुता व म्हणून नीचता आहे. यामुळें जाति तर वांचत नाहींच, परंतु आपलाहि घात ती व्यक्ति करून घेते. मुसलमानांनीं हिंदुस्थानाला छलानें वा बलानें जिंकलें होतें. त्यांचा आचार, व्यवहार, आणि धर्मपंथ कोणत्याहि तऱ्हेनें हिंदुजातीच्या धर्माशीं आचाराशीं वा व्यवहारांशीं तुलना करण्यायोग्य नव्हता. त्यांचे धर्मप्रसाराचे मार्गहि नीतीला सोडून—अनीतिपूर्ण—होते. तरीहि हिंदूंच्या सामन्यांत मुसलमानांत अधिक बल होतें, अधिक जीवन होतें. आणि याचें कारण, हिंदूपेक्षां जरी मुसलमानांमध्यें व्यक्तिगत गुण पुष्कळ कमी होते तरी समाजोपयोगी गुण हिंदूंपेक्षां पुष्कळ अधिक होते. यांच्या परस्परांच्या सामन्यांत हिंदूंना खालीं पहावें लागत असे. समाजाच्या नेतृपदाधिष्ठित पुरुषावर विश्वास व त्याच्या आज्ञेचें पूर्णपणें पालन हा जात्युपयोगी एक मोठा गुण त्यांच्यामध्यें मुख्यत्वें वास करीत होता. हिंदूंना धार्मिक वा राजकीय असा कोणीच नेता नव्हता. मुसलमानांमध्यें दुसरा एक गुण होता आणि तो सामाजिक समता हा होय. हिंदूसमाज अनंत—विभागी आणि म्हणून खंडित असा झालेला होता. एक विभाग दुसऱ्याशीं अगदीं तिऱ्हाइताप्रमाणें वर्तन करीत होता. परंतु इकडे मुसलमानी धर्मात जर कोणी प्रविष्ट झाला तर त्याला एकदम इतराशीं समानतेचें पद मिळत असे. या समतेनें इस्लामकडे असमानतेचें तत्व ओळखणाऱ्या हिंदू समाजांतील कांहींचें मन ओढलें जात होतें. हिंदूमध्यें बाह्य स्वरूपांत अशी कोणतीहि गोष्ट नव्हती कीं ज्यायोगें हिंदूसमाजाचे घटक होण्याकडे इतरांचें मन वळावें. सत्य बोलणें, सदाचारी रहाणें इत्यादि व्यक्तिगत गुण हिंदूमध्यें अधिक असल्यानें हिंदू व्यक्ति हिंदू व मुसलमान यांच्याशीं आपपरभावानें सामान्यतः न वागतां एकसारखेंच वर्तन ठेवीत होती. ( परंतु मुस-

लमानांची याचे विरुद्ध स्थिति होती. सर्वसामान्यरीत्या मुसलमान व्यक्ति सत्यासत्य वा सदाचार वगैरेची पर्वा न करणारी आणि आपल्या मुसलमान जातीविषयीं अभिमानी, पक्षपाती व इतर धर्मीय लोकांना निर्दयपणें तुच्छ लेखणारी अशी असावयाची, व तशीच स्थिति त्यावेळींहि होती. )

इंग्लिश जातीमध्यें देशभक्तीचा भाव आहे. इंग्लिश युवक देशासाठीं कसें मरावें हें जाणतात. जगाचा असा नियम आहे कीं, ज्या जातीमध्यें असला एखादा समाजधारक भाव असतो ती जाति त्या भावबलाबर वैभवशाली व प्रबल होत असते. थोडक्यांत म्हणजे जी जाति समाजैक्यबलानें अधिक असते ती जाति, व्यक्तिगत गुण अतिशय श्रेष्ठत्वाला गेलेले असूनहि समाजैक्यबलांत निर्बल असणाऱ्या जातीवर, विजय मिळविते. याकरितां जो मनुष्य जात्यभिमान आणि देशभक्ति यांना धक्का लावतो, जाति, धर्म, व देश यांना हितकारी होणाऱ्या गोष्टीपासून दूर राहून त्यांना अनुकूल वर्तन करित नाहीं, तो स्वतः व्यक्तिदृष्टीनें जरी कितीहि सदाचारी, त्यागी, सरळस्वभावी व सुशील असला तरी, तो न कळून कां होईना जातिद्रोही, धर्मद्रोही व देशद्रोही बनतो. त्याचे सर्व सद्गुण त्याला या महादोषापासून वांचवूं शकत नाहींत इतकेंच नव्हे तर जातीयता, धर्मीयता व एकदेशता यांच्यांशीं निगडित झालेल्या प्रसंगांत हेच सद्गुण पापरूप धारण करतात.

# ५. युद्धारंभ.

गुरु गोविंदसिंह दक्षिणेंत गेल्यावर कित्येक शिख सरहिंद-नबाबाच्या पदरीं नोकर होऊन राहिले. नबाबानें वैरागीची बातमी व हकीकत ऐकली व मोठ्या स्तोमानें आपल्या शिख शिपायांना म्हणाला,-" तुमच्या एका गुरूची तर अशी दुर्गति होऊन राहिली आहे कीं, तो पळून जाऊन तोंड लपवित फिरत आहे. आतां हा दुसरा नवा आला आहे. त्याचीहि पण अशी खबर घेतली जाईल कीं त्याचा कुठें पत्ताहि लागणार नाहीं."

निंदेचा आणि अपमानाचा हा टोला शिख सहन करूं शकले नाहींत आणि ते नोकरी सोडून वैरागीला येऊन मिळाले. नबाबाची वैरागीबद्दलची कल्पना अगदीं चुकीची झाली होती. वैरागीचे अंगांत विद्युत्-शक्ति होती. थोडीशी फौज जवळ तयार होतांच त्यानें सलानानगरावर हल्ला चढविला. व अशी द्वाही दिली कीं, लुटींत जो माल ज्याला मिळेल तो माल त्या लुटणाऱ्याच्या मालकीचा होईल. नगरांत खूप लूटमार झाली. नगरांत तीन दिवस प्रहाराशीं प्रहार भिडत होते. लोक जंगलांत पळून गेले. जे लोक पक्वान्नें खात असत त्यांना बोरावर दिवस कंठावे लागले. जे मखमलीच्या बिच्छान्यावर निजत होते त्यांना आतां निजावयाला दगड उपयोगांत आणावे लागले. या नगरावरच अवकृपा करण्याचें एक विशेष कारण होतें. गुरु गोविंदसिंहाला ज्यानें धोका देऊन आनंदपुर सोडावयाला लावलें तो दुष्ट येथीलच रहाणारा होता. गुरूंच्या पुत्रांच्या बाबतींत 'सापाचीं पिलें सापच असतात' असें सरहिंदच्या नबाबाला यानेंच सांगितलें होतें. गुरु तेगबहादरचा घात करणारा जलालउद्दीन याच नगरचा होता. येथें जो सरकारी खजिना [illegible] तो सारा

वैरागीनें आपल्या शिपायांत वाटून दिला. हा समाचार मिळतांच हजारो डाकू आणि लुटारु वैरागीच्या फौजेंत भरती झाले. 'फुलवंशा'चे मुख्य रामसिंह व त्रिलोकसिंह यानीं गुप्त सहाय्य दिलें. या मोठ्या सेनेनें अंबाला, सिंफाबाद, संवारा, पामला, कैथल, इत्यादि दुसऱ्या मुसलमानी शहरांना लुटीत मारीत कुंजपूर स्थानाला येऊन आपला अधिकार स्थापित केला. कारण या कसब्यांत सुबा सरहिंदाचे संबंधी रहात होते, याकरितां नबाब सरहिंदची फौज येऊन पोंचण्याचे आधींच हें ठिकाण नष्टप्राय करून टाकलें. या ठिकाणच्या काजी लोकांनीं गुरूंच्या वच्यांच्या बाबतींत निकाल दिला होता. आणखी एक पठाणी गांव लुटल्यानंतर वैरागीच्या सैन्याची नबाबाच्या सैन्याशीं गांठ पडली. या पहिल्या लढाईंत वैरागीच्या तीराच्या माऱ्यापुढें टिकाव न लागून नबाबाची फौज उधळली गेली. या चकमकी-तील विजयानें पुष्कळशी युद्धसामग्री वैरागीच्या हातीं लागली. वैरागीची सेना चाल करीत जात होती. रस्त्यांत हाका हरिया गांवांत मुसलमान एका गाईची हत्या करीत होते. हें वीराच्या शिपायांनीं पाहिलें, त्यांना तें सहन झालें नाहीं व तिच्या रक्षणकार्यांत त्यांनीं आपले प्राण अर्पण केलें. झटपट सारी फौज गांवावर तुटून पडली. केवळ जो शिखा आणि जानवें दाखवूं शकला असा मनुष्यच त्या गांवांत वांचला.

इकडे दक्षिणेंत अवरंगजेबाचा दम उखडत जात होता. तिकडे पंजाबांत वैरागीनें मराठ्याप्रमाणें धूम माजवून सोडली होती. साढोरा नांवाच्या एका कसब्यांत मुसलमान उस्मानखां नांवाच्या एका मुख्याच्या जुलमानें हिंदू-लोक फार त्रस्त होऊन राहिले होते. त्याला कोणाच्याही मुनामुलींची कांहीं खंती वाटत नसे. त्यानें मंदिरें तोडून त्याठिकाणीं मशिदी उभारल्या. जेव्हां या कसब्याची पाळी आली तेव्हां उस्माननें आसपासच्या मुसलमान लोकांना सहायार्थ एकत्र केले. ११ माघ संवत् १७६४ ( शके १६३० )च्या दिवशीं दिवसभर लढाई होत होती. विनोदसिंहानें वैरागीकडे जाऊन म्हटलें "लोक तर तिकडे मरून राहिले आहेत आणि तुम्ही येथें माला जपत बसला आहांत." तो क्रोधानें उठला व बाणवर्षाव सुरू केला. ते त्याचे बाण नव्हत

तर विषधर भुजंग होते. मुसलमान घाबरून जाऊन पळून गेले. पति पत्नीला सोडून गेला. आईनें मुलीला टाकलें, कोणी कोणाकडे पाहिलें नाहीं. सर्व—वध झाला. दोन दिवस सारखी लूट होत होती. शहर बिलकुल ओसाड करून टाकलें. ज्यानें वैरागीला ठार मारण्याची प्रतिज्ञा केली होती त्या उस्मानखांला एका झाडाशीं बांधून मृत्यूची शिक्षा दिली गेली. यानंतर वैरागीनें मुखलिसगड नांवाचा किल्ला आपल्या हस्तगत करून घेतला. याचें नांव लोहगड ठेवलें आणि तेथें दारूगोळा पुष्कळसा जमा केला.

सर्व इलाखाभर वैरागीचा धाक बसून गेला. वैरागीच्या रूपांत प्रत्यक्ष ईश्वरच अवतीर्ण होऊन त्यानें आमच्या संरक्षणाचा भार घेतला आहे, अधर्माचा नाश व धर्माची स्थापना करण्याकरितां तो आला आहे असें हिंदू समजूं लागले. हिंदू तरुण दूरदूरहून येऊन वैरागीच्या सैन्यांत भरती होऊं लागले. पहाडांत लपत फिरणारे शिख बाहेर पडले व वाटेंत मुसलमानी ठिकाणांची लूटमार करीत वैरागीच्या सैन्यांत येऊन मिळाले. दुसऱ्या बाजूला जे आजपर्यंत हिंदूंना भेवडावीत व दटावीत होते तेच मुसलमान आतां स्वतः भयानें थरथर कांपूं लागले. पुष्कळसे मुसलमान भेटी घेऊन वैरागीला येऊन मिळूं लागले व शिष्य बनूं लागले; आणि आश्रय मागूं लागले. परंतु त्यांचें हृदय शुद्ध नव्हतें. मनामध्यें त्यांनीं त्याचा विश्वासघातानें नाश करण्याचा निश्चय केला होता. त्यांनीं सुभ्याला लिहून कळविलें कीं " आम्हीं याला हातीं चढविला आहे. हा केवळ कपटानेंच मारला जाईल. " यांचे दूत एका पोकळ टोपराच्या काठींत हें पत्र घालून घेऊन सरहिंदला चालले असतां जंगलांत एक उंट चारणाऱ्याची सांडणी शेतावर जाऊन पडली. दैववशात् चारणाऱ्या मनुष्यानें त्या दूताच्या हातांतील ती काठी घेतली व त्या उंटिणीला मारीत हाकूं लागला. उंट चारणाऱ्याला काठींतील कपट माहित नव्हतें. ती काठी फुटली आणि ती चिठ्ठी खालीं पडली. वैरागीच्या हातांत तें पत्र आल्यावर त्यानें वाचलें आणि त्या आश्रयाला म्हणून त्याच्या जवळ येऊन राहिलेल्या कपटी मुसलमानांना बोलावून आणून त्यांना विचारलें कीं तुमच्या ग्रंथांत कपटाचरणी मनुष्यांना काय दंड देणें योग्य

असल्याचें सांगितलें आहे ? सर्वांनीं सांगितलें कीं, कपट्याला मारून टाकलें पाहिजे. तेव्हां 'बंदा'नें तें पत्र वाचून दाखविलें. सर्वजण स्तिमित झाले. रडायला सुरवात करून सर्वांनीं क्षमा मागण्याला आरंभ केला. वैरागीनें म्हटलें—" ठीक आहे ! जितके लोक या डेऱ्यामध्यें जाऊन बसतील तितक्यांना मुक्त केलें जाईल " अगणित मुसलमान डेऱ्याचे आंत घुसले, आणि एकावर एक असे चढून बसले ! सर्वांनीं आपणां स्वतःला याप्रमाणें वैरागीच्या जाळ्यांत अडकवून घेतलं. त्यांच्या मनांत जी व जशा प्रकारची क्रूरता व निर्दयता वास करीत होती त्यांना सर्वतोपरी योग्य अशाच क्रूरतेनें व निर्दयतेनें वैरागीनें त्यांना यमाचे घरीं पोचतें केलें. सर्वांचा वध झाला. ( ' ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ' ही भगवंताची उक्ति वीरांनीं शिरसामान्य करून यथातथ्य वर्तन केलें. वीरानें ' डेऱ्यांत जाणाऱ्या सर्वांना मुक्त केलें जाईल ' असें वचन दिलें होतें व तें त्यानें अक्षरशः पण योग्य रीतीनें पालन केलें. कपट, छल, क्रूरता यांचें माहेरघर अशी जी तत्कालीन मुसलमानीयता त्यापासून त्या जीवात्म्यांना त्यानें मुक्त केलें आणि आपलें वचन पुरें केलें. ) या स्थानाचें नांव ' कत्तलगढी ' ठेवलें गेलें. मुसलमानांचा कधींहि विश्वास धरावयाचा नाहीं असा या प्रसंगापासून वीरानें आपल्या मनांत दृढ निश्चय केला होता. हा समाचार ऐकून हिंदूंच्या घरोघर दीपोत्सव झाला; सर्व वसतिस्थानें प्रकाशमय दिसूं लागलीं. कलियुगांत निष्कलंक अवतार झाला आहे, प्रजापीडकांचा नाश करण्यासाठीं व धर्माची पताका निर्भयतापूर्वक फडकविण्यासाठीं वैरागी उत्पन्न झाला आहे असें सर्व जण म्हणूं लागले.

येथें एक प्रश्न उपस्थित होण्यासारखा आहे कीं, ज्या रीतीनें वैरागीनें आपलें कार्य चालूं ठेवलें ती पद्धत किती उचित आहे ? या घटनेची हकीकत वाचून मुसलमानांच्या हृदयांत क्रोधाग्नि प्रदीप्त होऊं लागणें अगदीं स्वाभाविक आहे. आम्हांला तर असें वाटलें कीं, साधारण हिंदुसुद्धां वैरागीच्या या कृत्याचा वृत्तांत वाचून असें म्हणावयाला तयार होतील कीं, खरोखरीच वैरागीनें यांत मुसलमानांवर अन्याय व अत्याचार केला आहे. गांवांत व नगरांत रहाणाऱ्या मुसलमानांना विना अपराध तरवारीच्या धारेखालीं उभे करणें हा घोर अन्याय आहे. ज्यावेळीं असे विचार आमचे मनांत उत्पन्न होतात त्यावेळीं शांति व सुस्थितीचे वेळचे नैतिक नियम दूर सारून थोडा

वेळ युद्धाच्या कालांत, ज्या कालांत दोन जातींत परस्परहितविरोधी संघर्षण सुरू होतें व त्यांपैकीं एका जातीवर दुसरी जात अन्यायानें व अधर्मानें चढाई करून तिला पदाक्रांत व नष्ट करण्याचा अट्टहास करीत असते, अशा वेळीं अन्यायपीडित व पादाक्रांत झालेल्या जातीनें अन्याय करणाऱ्या क्रूर व कपटी जातीशीं, कसें वागावें याचाच तात्विक दृष्ट्या विचार केला पाहिजे.

वर्तमान शांतीच्या आणि सभ्यतेच्या कालांत सुद्धां साधारण नैतिक नियमांहून समर नैतिक नियम सर्वस्वी भिन्न आहेत. साधारणतः एका मनुष्यानें दुसऱ्याचा वध केला तर तो घातक व मोठा अपराधी समजला जातो, परंतु जेव्हां कांहीं हजार वा लाख लोकांचें दल तसल्याच दुसऱ्या दलाशीं युद्धाला सज्ज होतें त्यावेळीं मनुष्यांचा वध करणें हें मोठें वीरतेचें काम समजलें जातें. आणि जो अधिक मनुष्यांचा वध करील त्याला वीरतेचें सन्मानदर्शक पदक वा जाहागीर दिली जाते. हेतु हा कीं, लोकांनीं त्याचा सन्मान करावा आणि आपण त्याच्याप्रमाणें बनण्याचा प्रयत्न करावा. साधारणवेळीं घराला आग लावणें निंद्य व महापाप गणलें जातें पण युद्धकालांत गांवेंच्या गांवें वा मोठालीं शहरें जाळून फस्त करणें अयोग्य मानलें जात नाहीं. गेल्या युरोपीय महासमरांतल्या घटनांवरून हें ध्यानीं येईल कीं, परस्पर युद्धोत्सुक जाति शत्रूच्या रक्तानेंच तृप्त न होतां त्यांच्या स्त्रिया आणि बालक यांचा वध करावयालाहि चुकत नाहींत किंवा मोठालीं शहरें जाळून पोळून नष्ट करण्याला सुद्धां मागें पुढें पहात नाहींत. (हल्लींच्या ‘ सुधारणे’च्या प्रौढीच्या कालांतील ही स्थिती आहे. पूर्वींच्या कालाला तर हल्लींचें सुधारलेलें जग “ जगाचा रानटी काल ” मानतें; तेव्हां हल्लींच्या कालांत राजरोसपणें होणारे प्रकार त्यावेळीं होत असतील तर त्यांत कोणी कोणाला नांवें ठेवावीं ? याला आणखीहि एक दुसरी बाजू आहे. भारतवर्षांत केवळ हिंदुलोकांचें युद्धनीतिशास्त्र व तदनुसार त्यांचें होणारें वर्तन पाहिलें तर हल्लींच्या बढाईखोर व सुधारणेचा डंका पिटणाऱ्या जगालासुद्धां मान खालीं घालावी लागेल. उदाहरणार्थ–शरण आलेल्याला मरण न देणें, दिलेलें वचन शत्रूच्या संबंधांतसुद्धां पाळणें, इत्यादि गोष्टी, हिंदूजातीच्या हाडीं मासीं इतक्या खिळलेल्या आहेत कीं, त्यायोगें इतर देशांतून होणाऱ्या पूर्वींपासूनच्या शत्रूंच्या टोळधाडीच्या कालापासून तो अगदीं हल्लींच्या काला-

पर्यंत हिंदूजातीला ते फार श्रेष्ठ दर्जाचे युद्धनीतिनियम पाळण्यांत अपरिमित हानि सोसावी लागून पारतंत्र्याचीं कडू फळ भोगावीं लागत आहेत. तेव्हां कपटी, क्रूर व छली परकीय शत्रूंशीं जर एखादेवेळीं जशास तसें या न्यायानें ते वागले असले तर त्यांत त्यांचा काय दोष ? उलट ते सर्व प्रसंगीं ठकास ठक बनले नाहींत आणि त्यांनीं आपल्या सात्विक वृत्तीचा अनाठायीं अवलंब केला हाच महादोष झाला असें म्हटलें पाहिजे. कारण क्रूराशीं सदयतेनें—कपट्याशीं सरलतेनें—घातक्याशीं विश्वासानें—छलीशीं सुजनतेनें वागण्यानेंच त्यांच्या गळयाला पारतंत्र्याचा महाविषारी आणि प्राणघातक भुजंग विळखा घालून आपला हलाहल ओतणारा दांत त्यांत रोवून बसलेला आहे. )

असो. ज्या कालाचें हें वर्णन आहे त्या कालांत लूटमार करून साम्राज्य स्थापन करणें हा रूढ मार्ग समजला जात असे. ( सर्व जगांत सर्वकालीं प्रत्यक्ष उघडा अथवा झाकलेला पण हाच मार्ग अवलंब केला जाई व हल्लीं अवलंबिला जात आहे. आणि भूत व वर्तमानकालावरून जर भविष्य काल जाणतां येत असला तर पुढेंहि हाच मार्ग राहील असेंच म्हटलें पाहिजे. ) ह्या कालांत भारतवर्षांत वा इतर देशांत जितकीं राज्यें स्थापन झालीं तितकीं सर्व याच पायावर रचलीं गेलीं. आरंभा आरंभाला लूटमार हा एक प्रकारचा कर समजला जातो आणि हा कर विजेता आपल्या शारीरिक बलाच्या भरंवशावर जित लोकांपासून वसूल करून घेतो. या जमेच्या योगानें तो आपल्या साथीदारांना व सैनिकांना प्रसन्न करून आपलें राज्य स्थापित करतो. मुसलमान शासकांचें शासन केवल याच शारीरिक बलावर स्थित होतें. लोखंडाला लोखंडच काटूं शकतें. याकरितां तें परकीयधर्मी राज्य नष्ट करून आपलें स्वराज्य स्थापन करण्यासाठीं याच साधनाचा उपयोग केला गेला. ( यांत वावगें तें काय झालें ? )

लुटारू आणि डाकू यांस याच्या सैन्यांत भरती होण्याला लूटमार हीच एक लालूच होती. यावेळीं साधारणतः चोहोकडे हाच प्रकार होता कीं, लुटारू लोकांचे मुख्यानें साधारण जनतेला लुटावें, आपल्या साथीदारांची संख्या वाढवावी, त्यांच्या बलावर एखादा किल्ला हस्तगत करून घ्यावा व याप्रमाणें करीत करीत योग्य संधि पाहून राजा होऊन बसावें. जफरखां वा हैदरअली यांचें राज्य याच नमुन्यावर रचलें गेलें. कित्येक रजपूत आणि

जाट लोकांनींहि याच रीतीनें आपलीं संस्थानें कायम केलीं. जर शोधक दृष्टीनें विचारपूर्वक पाहिलें तर सर्व जगांत आज जितकीं राज्यें दिसत आहेत तितकीं सर्व याच उपायानें अस्तित्वांत आलेलीं आहेत. दूर जाण्याची काय अवश्यकता आहे ? ज्यांनीं ब्रिटानियाच्या मूल निवासियांना नष्ट केलें व तो देश आपल्या नांवानें मुद्रांकित केला ते अँग्लोसाक्सन लोक केवळ समुद्रावरील लुटारू—चांचे—लोकच होत.

वैरागीच्या बरोबर केवळ लुटेरेच लोक होते असें नाहीं किंवा स्वतः वैरागीला लूटमारीची इच्छाहि नव्हती. त्याची हिंदू जातीचें संरक्षण करण्याचीच केवळ एक मनीषा होती. याकरितां वैरागीच्या सैन्यांत भरती झालेल्या बहुतेक हिंदूंची लूटमारीची इच्छा नव्हती. वैरागी त्यांना गोब्राह्मणांचा परिपालन करणारा व रक्षण करणारा असाच दिसत होता. आणि एवढ्याचसाठीं त्याला साथ देणें हें आपलें धार्मिक कर्तव्य आहे असें ते समजत असत. गाय आणि ब्राह्मण हेच हिंदूंचे प्राण होते आणि यांच्याच साठीं वैरागी हा हिंदूंचा रक्षक होता.

# ६. प्रतीकार.

इतवन वा बनोड या गांवचे ब्राह्मण जमून वैरागीजवळ आले आणि त्यांनीं प्रार्थना केली कीं—"महाराजांचा जय असो! मुसलमान आम्हांला राहूं देत नाहींत, आमच्या लेकीसुना घेऊन जातात, गाई मारून त्यांचें रक्त आमच्या विहीरींत टाकतात, आम्हीं तुम्हांला शरण आलों आहोंत." वैरागी यावेळीं खरोखरीच महाराजपदाला पोंचला होता. त्याचे शिपाई गेले आणि त्या ब्राह्मणांवरील मुसलमानी जुलमाचा त्यांनीं असा सूड घेतला कीं केवळ हद्द झाली! सर्व 'खां'ना मारून अगदीं खाक करून टाकलें. या स्फूर्तिदायक स्थानावर वैरागीनें आपल्या सरदारांत पहिल्यानें निरनिराळया कामांची वांटणी केली. फत्तेसिंहास सेनापति केला, बाजसिंहाकडे कोषाध्यक्षाचें काम दिलें आणि विनोदसिंह व करणसिंह यांस दैशिक अधिकारी बनविलें.

'माझे'च्या शिखांना वैरागीला सहाय करण्यापासून परावृत्त करण्यासाठीं सरहिंदच्या सुभ्यानें आपल्या दोन सेनानायकांबरोबर पांच हजार फौज कांहीं तोफांसह त्यांच्यावर रवाना केली. रोपडवर या सुभ्याच्या फौजेचा पराजय झाला आणि ते आपला पुष्कळसा दारूगोळा मागें सोडून पळून गेले आणि तें सामान आयतेंच शिखांना मिळालें. इतक्यांत काश्मीरी रिसाल्याचें सहाय येऊन पोचलें. लढाईंत खिजरखां फौजदार व तसेच कित्येक अन्य सरदार मारले गेले. मुसलमानांना हटणें भाग पडलें. परंतु आणखी एक भारी सेना मागून आली. वैरागीहि थोडासा मागें सरला व त्यानें सामन्याच्या तयारीला आरंभ केला. त्याला आतां एका मोठ्या सुभ्याच्या भारी सेनेशीं सामना द्यावयाचा होता. यावेळीं वैरागीजवळ आठ हजार पदाति (पायदळ) आणि चार हजार स्वार तयार होते. जेथें गुरु गोविंदसिंहाचे लहान लहान छावे किल्ल्याच्या भिंतींत चिणून मारले गेले होते तेंच हें सरहिंद! या दुष्ट व नीच कृत्याचा सूड घेण्यासाठीं वैरागीचें हृदय एकसारखें

जळत होतें. यानें सर्व शिखांना एकत्र जमवून गुरूंच्या मुलांच्या नांवानें सूडाची ज्योति त्यांचे अंतःकरणांत पेटविली आणि 'सूडाची संधि आली आहे, वीर होऊन लढा' अशी त्यांना आज्ञा केली.

सुभेदारानेंहि आपल्या बाजूनें तयारी करण्यांत कांहीं उणीव ठेवली नाहीं. अखेर ज्येष्ठ संवत् १७६५ (शके १६३१) चा ज्याची शीख वाट पाहत राहिले होते तो दिवस येऊन पोचला. दोन्हीं बाजूच्या सेना वीरांप्रमाणें लढल्या. तोफांच्या गडगडाटानें आकाश दुमदुमून गेलें. रक्ताचे प्रवाह वाहूं लागले! घोडे व मनुष्य यांच्या प्रेतांचे ढीग पडले. नबाबाच्या सैन्यापाशीं युद्धाचें सामान पुष्कळ होतें. धनुष्याचे लढाईंत वैरागीचे शिख केवल सिंहासारखे होते; परंतु त्यांच्याजवळ तोफा नव्हत्या. तोफांचा मारा सहन होईना आणि त्यांनीं पळावयास आरंभ केला. सरदारांनीं विनंति करून पाहिली, उत्साह देण्याचा प्रयत्न केला, धमक्या दाखविल्या, उणें बोलून लाजविलें "भीरूप्रमाणें मैदान सोडून काय म्हणून पळतां आहांत? तुम्ही काय केवल हलवा (शिरा) उडवायला एकत्र झाला होतात?" शिख सेनेनें एकवार पुन्हां धीर धरून लढाईला तोंड दिलें. पण तोफांना तोंड कोण देऊं शकणार? वैरागी सेनेमागें तीन कोस उभा राहून युद्ध पहात होता. इतक्यांत समाचार मिळाला कीं शिखांची सेना मागें हटूं लागली. शिखांनीं धीर सोडून पळण्याला आरंभ केला. या युद्धाच्या परिणामावर वैरागीच्या पुढील कार्यक्रमाची भवितव्यता अवलंबून होती. तात्रडतोत्र घोड्यावर स्वार होऊन त्यानें विजेप्रमाणें त्वरेनें बाणवर्षाव सुरू केला. त्याच्या तीरांत अशी विलक्षण शक्ति होती कीं, त्याचे तीर गोळ्यांच्या सामन्याला बरोबरीनें काम देत! तोफावरचे गोलंदाज हेच याच्या तीराचे लक्ष्य झाले.

बाणवर्षाव करीत व शत्रूंचीं प्रेतें पाडीत वैरागी पुढें चाल करीत जाऊं लागला. अगदीं जवळ पोंचून म्यानांतून तरवार खेंचून काढली व शत्रूंची गाजरमुळीप्रमाणें कापाकापी करीत तो त्यांचा संहार करीत चालला. इतक्यांत वजीरखां सुभेदार नजरेस पडला. वैरागीनें ललकारी दिली आणि म्हणाला—"लोकांना विनापराध कां मारवितो आहेस? तरवार घेऊन युद्धक्षेत्रांत उतर! माझ्याबरोबर दोन हात कर. मागें तोंड कां लपवितो-आहेस? मी तुझा सूड घेण्याकरितां फार दूरून चालून आलेला आहें."

त्याच्यासमोर येण्याचें साहस वजीरखानाच्यानें झालें नाहीं. तो आपल्या सैनिकांचा उत्साह वाढवीत होता. परंतु वैरागीच्या नुसत्या नांवानें सर्व मुसलमान भयभीत होत होते. खानाच्या फौजेचा धीर सुटला. वजीरखांचा हत्ती पळत होता, इतक्यांत त्याचा पाय एका कबरेंत फसला. सुभा स्वतः खालीं आला. त्याचा गिरफदार होण्याचा रंग दिसतांच फौजेनें पळ काढला. नगरांत सर्व वधाची आज्ञा दिली गेली. गल्ल्यांतून देखील रक्तप्रवाह वाहूं लागले. स्त्रिया घरांचा त्याग करून आपल्या प्राणरक्षणाकरितां बाहेर आल्या. वैरागीनें विजयी या रूपानें किल्ल्यांत प्रवेश केला. कैद केलेला वजीरखां बद्ध स्थितींत त्याचे समोर आणला गेला. सर्वांचे जोडे जेथें ठेवले होते तेथें त्याला बसण्याचा हुकूम मिळाला. त्याचीं बायका मुलेंहि तेथें आणलीं गेलीं. वैरागी त्याला म्हणाला, " तूं एका हातानें जो अत्याचार केला आहेस, त्याचा दुसऱ्या हातीं मोबदला घे. " " याचा वध करा " अशी आज्ञा होतांच त्याला तुच्छतेनें शहरांत चाऱ्ही बाजूला फिरविलें आणि नंतर तो अग्नीमध्यें जिवंत जाळला गेला. मागाहून सुभ्याचा दिवाण सुचानंद खाला त्याच्या कुटुंबासहित आणला. त्याला वैरागीनें म्हटलें " तुझा हिंदूच्या कुळांत जन्म झाला असतां, इतकें अमानुष नीच कर्म तुझ्याच्यानें कसें झालें ? तूं त्या ' हिंदूधर्माचें संरक्षण करण्याचा कर्तव्यभार आपले स्वतांचे अंगावर घेणाऱ्या 'महापुरुषा'च्या हृदयाच्या आंतपर्यंत हात घालण्याचें साहस कसें केलेंस ! आतां तुझी दिवाणगिरी कोठें आहे ? ईश्वरी न्याय-मंदिरामध्यें तुलाहि फटकारा मिळेल. " सात दिवसपर्यंत वैरागीचे शिख नगरांतील घरें पाडीत होते. शहरांत मसजिद राहिली नाहीं किंवा मकब-राहि राहिला नाहीं. संवत् १७६५ ज्येष्ठ १४ ला ( शक १६३१ ) एक मोठा दरबार भरविण्यांत आला. साऱ्या इलाख्यांतील मुसलमान अधिकारी काढून टाकले जाऊन हिंदूच्या त्याजागीं नेमणुका झाल्या. मुसलमानांच्या जहागिरी व धर्मादाय देणग्या जप्त केल्या गेल्या. त्यावेळीं दिल्ली सम्राट्-पाशीं या सर्व गोष्टी प्रार्थनापूर्वक रडकथा लिहून पाठविण्याशिवाय ते सर्व मुसलमान काय करूं शकणार ? सम्राट्‌नेंहि हेंच रडगाणें गायलें कीं, " वैरागीनें भूताला वश केलेलें आहे. त्या जोरावर त्यानें पंजाबवर अधिकार जमविला, आणि तो मनांत आणील तर दिल्लीलाहि गदगदा हालवील.

सरहिंदहून निघून वैरागीनें राहूवर चढाई केली आणि सर्व रांगड्यांना कैद केलें. पामलच्या हिंदूंनीं येऊन आपल्या मुसलमान अधिकाऱ्याविरुद्ध तक्रारी केल्या. खां महम्मदनें मोठ्या शौर्यानें सामना दिला तरी पण तो वैरागीच्या तीराला बळी पडलाच. तेथून माझेरकोटल्यावर चढाई झाली. तेथील रहीस गुलमहम्मदखां जीव वांचवून पळून गेला. तेथें किशनदास म्हणून एक वाणी रहात होता तो आला. वैरागीनें उठून त्याला आलिंगन दिलें. पूर्वी केव्हांतरी वीर याचेजवळ थोडा काल राहिला होता. त्यावेळीं याच्या शिफारशीवरून त्या शहरवासियांपासून फक्त दोन लाख रुपये घेऊन शहराला माफी दिली आणि ते रुपये त्यानें आपल्या सैन्यांत वाटून दिले.

राएकोट व जिगराव या दोन शहरांना नंतर हस्तगत केलें. राएकोटचा अधिकारी कालाराय नजराण्यासह येऊन भेटला. येथून मलणारा, तकवंडी वरून लुधियान्याला येऊन डेरा दिला. त्यानंतर वैरागीनें दुआबकडे आपलें तोंड फिरविलें. मुसलमान अधिकारी आपण होऊन नगर सोडून पळून गेले. कोणी कोणी भेट घेऊन येऊन क्षमायाचना करूं लागले. फगवाड्याचा रईस चूहलमल व जालंदरचा नबाब हे भेट घेऊन आले आणि त्यांनीं वैरागीचा आश्रय केला. व्यासवरून 'माझे'वर चढाई केली 'माझे' नगरनें प्रसन्नतापूर्वक वैरागीची ताबेदारी पत्करली. सूरसिंह, पट्टी, झाफाल, अलगो, खेमकर्ण आणि चूडिया सर्व अधीन झाले. व्यास आणि रावी यांचे मधला प्रदेश तर युद्धाशिवाय वैरागीच्या हातीं आला. यानीं सर्व जागीं आपला घोडा फिरविला आणि गर्जना केली कीं, आतां हिंदुराज्य स्थापित झालें आहे; कोणीहि मनुष्यानें दिल्लीच्या बादशहाला लगान देऊं नये. वैरागीनें स्वतः होशियारपुरमध्यें येऊन डेरा दिला. सर्व प्रदेश अधिकारी लोकांच्या ताब्यांत वाटून दिला. आणि आपण स्वतः निरिच्छ संतच राहिले. बझवाड्याच्या नबाबानें हरकत उभी केली पण त्याला जिंकला तेव्हां तो प्राण घेऊन पळून गेला. ह्या एका विजयानें यमुना आणि सतलज यांच्यामधील प्रदेश वैरागीच्या ताब्यांत आला. हा प्रदेश त्यानें शिखसरदारांना बक्षीस दिला. करनाल आणि पानिपत बाबा विनोदसिंहाला दिले. बजासिंह सरहिंदचा सुभा केला. आणि फत्तेसिंह सेना घेऊन बाकी इलाखा आपल्या ताब्यांत घेऊं लागला. दिल्ली व लाहोरमधील रस्ता अगदीं बंद केला गेला. करनालपासून तल-

चण्डी, हिसार, झांशी, तरावडी, कैथल, जिंद, सरसा, फिरोजपुर, चूनिया, कसूर, जालंदर, दुआबा, माझा, पठाणकोट, आणि कांगडापर्यंतचा सर्व प्रदेश यांच्या हाताखालीं आला. बाजसिंह नावेर ( नांदेड ) पासूनच वैरागीबरोबर आला होता व दिल्लींत वैरागीबरोबरच हुतात्मतेंत हुत झाला. हा अमृतसरचा ( मिरपुरपट्टी ) राहणारा होता.

याप्रमाणें बावनलक्षांच्या प्रदेशावर हिंदूंचा अधिकार जमला. हजारों हिंदू येऊन याच्या सैन्यांत भरती झाले. लोकांत इतका उत्साहयुक्त आवेश चढलेला होता कीं, लोक गुरु गोविंदसिंहाच्या आदेशाविरुद्ध वैरागीला अकरावा गुरु मानूं लागले. सफलतेंतच महत्तेचें रहस्य आहे. साधारण लोक जेव्हां एकाद्या मनुष्याबद्दल संमति ठेवतात तेव्हां तो मनुष्य वास्तविकच महान् होत असतो. प्रत्यक्ष सफलताच सफलतेची किल्ली आहे हें अगदीं खरें आहे. जगांत साफल्य हें सफलतेचें एक मोठें साधन आहे. जो मनुष्य सफलता मिळवितो त्या मनुष्यामधील अवगुणांनासुद्धां गुणासमान शोभा येते. आणि दुसरीकडे असफलता झाल्यास सर्व गुण अवगुणाचें स्वरूप धारण करतात. सफलतेमुळें अमेरिकेंत वाशिंगटनला ईश्वरतुल्य मानून त्याची पुजा केली जाते. जर तो सफल झाला नसता तर तो आज देशद्रोही ठरला जाऊन त्याचें जीवन म्हणजे एक अवगुणांची रासच दिसली असती. जर सफलता मिळाली नसती तर शिवाजी एक डाकूच वाटला असता.

वैरागीच्या तिरंदाजीच्या कमालीनें मुसलमानांच्या मनावर भयाचा अंधेर पसरला होता. वैरागी मोठा बली आहे, सिद्ध आहे ही भावना जनतेमध्यें, प्रसृत झाली होती. यानीं भूतपिशाच्च, आपल्या स्वाधीन केलें आहे, त्यांच्या सहाय्यानें याचे तीर अगदीं नेमके मुसलमानी सेनेच्या नायकांनाच उडवितात असा समज झाला होता. मुसलमानी सेनेचे अधिकारी याच्यासमोर जावयाला भीत असत, जेव्हां सामन्याला जावें लागे तेव्हां स्वतः बचावासाठीं मागें राहूं इच्छित असत.

हिंदूंच्यामधील नरम–दलाला वैरागीचा प्रतीकार चांगला वाटला नाहीं. परंतु ज्या ज्या लोकांशीं वैरागीला टक्कर द्यावी लागली त्यांच्या मनामध्यें लहान मोठ्याचा कांहींहि विचार येत नव्हता. गुरु तेगबहादरसारख्या वृद्धाची हत्या त्यांनीं केली. गुरु गोविंदसिंहाचीं लहान लहान अर्भकें

भितींत उभी जिवंत चिणून मारलीं गेलीं. बालक हकीकतराय आपल्या सहकारीशीं बोलाचालींत किंचित् वर्दळीवर आला. मुसलमान मुलांनीं मौलवीकडे तक्रार केली. मुकदमा न्यायालयांत पाठविला गेला. काजीनें न्याय दिला—" हकीकत ! मुसलमान होऊन जा, नाहींतर तुझी कत्तल केली जाईल. " त्यावेळीं पंजाबचे हिंदू नुसते दांत ओठ खात होते; पण त्यांची कोण पर्वा करतो ? हकीकतराय अखेर मारला गेला.

पंजाबचा मुसलमान इतिहासकार महम्मद लतीफ वैरागीच्या बाबतींत आपल्या ' पंजाबचा इतिहास पूर्वकालापासून तो वर्तमान कालपर्यंत; ( Histoy of the panjab from the remotest antiquity to the present time ) मध्यें लिहितो—" यांनीं हजारों मुसलमानांचा वध केला. मशीदी व खानकाहे मातीला मिळविलीं; घरांना आगी लावल्या, आणि स्त्रियांची व मुलांची हत्या केली. लुधियानापासून सरहिंदपर्यंत सर्व प्रदेश सफा करून टाकला. पहिल्यानें हा सरहिंदला आला. गुरु गोविंदसिंहाच्या मुलांचा सूड म्हणून नगराला आग लावून दिली. स्त्री वा बालक असा कांहींहि विचार न ठेवतां सर्वांची सरसहा कत्तल केली. मेलेल्यांना कबरीमधून काढून गिधाडें व कावळे यांच्याकडून खावविलें. सारांश, जेथें जेथें गेला तेथें तेथें खड्गाशिवाय काम नाहीं. आणि याचमुळें मुसलमान याला यम ( मलकनमौत ) म्हणूं लागले."

# ७ ‘ पहाडांतील हिंदू राजे ’

एका संतानें केवल दोन वर्षांच्या अवधींत पंजाबच्या मोठ्या भागावर आपली सत्ता स्थापन केली आणि नालागढ, नाहन, खलौर इत्यादि राजांना नजराणे घेऊन भेटीला येण्यास लाविलें, या वर्षी वैरागी अमृतसरला पोंचला आणि येथें दर्बारसाहेबांना ( शिखांचे धर्म मंदिर ) पुष्कळसें द्रव्य व जवाहीर त्यानें अर्पण केलें. येथें एक साधारण दरबार भरविला आणि तेथें शिखांना पारितोषिकस्वरूपानें द्रव्य वाटून देऊन त्यांचें साहस वाढविलें; यावेळीं यानें एक राजनीतीची चाल उपयोगांत आणून पाहिली. त्यानें अशी घोषणा केली कीं, जो कोणी या वेळीं शिख होईल त्याला वैरागीच्या विजयानंतर कर द्यावा लागणार नाहीं. हा आदेश ऐकून जाट जमीदार वगैरेंचे समूहचे समूह शिख होऊं लागले. याप्रकारें वीराची सेना खूप भारी बनली. आतां यावेळीं याच्या राज्याची सीमा एकीकडे यमुना व दुसरीकडे रावीपर्यंत जाऊन भिडली.

वैरागी जरी एक साधु होता तरीहि पण भारतवर्षांत त्याच्या सारखा प्रभावशाली नेता कधींहि झाला नाहीं. या थोड्या अवधींत व यानंतर कांहीं वर्षे जेथें जेथें कधीं युद्धें होत होतीं तेथें तेथें प्रायः वैरागीच्या व्यक्तिगत वीरतेच्या प्रभावानेंच जय मिळत होता. जेव्हां कधीं एखादे वेळीं युद्धक्षेत्रांत हा नसण्याची वेळ येई, तेव्हां तेव्हां मुसलमान पुनः आपलें डोकें वर काढीत व शिख इकडे तिकडे हार खात भटकत फिरत असत. हा परत येत असे परंतु याच्या येण्याची वार्ता पसरल्यामुळें पूर्वींच धूळधाण उडालेली असे. मुसलमानांच्या शक्तीचें कारण त्यांचा एक विश्वास आहे; आणि तो हा कीं, लढलें तर जगांत राज्य आणि परलोकांत स्वर्ग मिळेल. परंतु वैरागी उपस्थित झाल्यापासून त्यांचा हा विश्वास नाहींसा झाला होता. विश्वासाची जागा वैराग्याबद्दलची भीति व्यापून टाकित असे. हा विश्वासी स्वभाव हें त्यांचें दौर्बल्य होतें. मुसलमान, देव–परी–भूत–पिशाच आदींचें

अस्तित्व मानीत. आणि मंत्रतंत्रद्वारा यांना वश करून घेतां येतें हाहि त्यांचा विश्वास होता. वैरागीनें आपल्या धनुर्विद्येच्या अलौकिकत्वाला कांहीं विशेष मंत्रसिद्ध दैवी शक्तीच कारण आहे असें प्रसिद्ध केलें होतें. युद्ध-क्षेत्रांत हा उतरतांच मुसलमान सैनिक भयग्रस्त होत असत. वीराच्या हिंदू व शिख शिष्यांचा त्याच्यावर मोठा विश्वास होता. तो येतांच यांचा उत्साह चौपट वाढत असे. वैरागीच्या सफलतेचें हें एक प्रमुख कारण होतें. यावेळच्या राजकीय परिस्थितीची अनुकूलता हेंहि एक आणखी पोषक कारण होतेंच. दिल्लीचें सत्ताकेंद्रस्थान निर्बल बनल्यानें प्रांताच्या शासन-शक्तिमध्येंहि निर्बलता आली होती.

ज्याप्रमाणें पंजाबांत गुरु त्याचप्रमाणें दक्षिणेंत शिवाजी आणि त्यांचे उत्तराधिकारी पेशवे हेहि मुसलमान साम्राज्याला उखडून टाकण्याच्या कार्याला लागलेले होते. एकदां थोरल्या बाजीरावानें म्हटलें होतें कीं, " वृक्षाच्या मुळावर घाव घालून तें खोड कापून काढा, म्हणजे फांद्या आपोआप सुकून जातील. "

तो वृक्ष आतां उन्मळूं लागला. शाखा कमजोर होऊं लागल्या. राज्याच्या निर्बलतेनें वैरागीच्या यशाला पुष्कळच मदत झाली. तरीसुद्धां त्याचें कार्य इतकें आश्चर्यजनक आहे कीं, त्याला ईश्वरी शक्तिचें साहाय्य होतें असें मानणें भाग पडतें. हिंदू तर त्याला रामचंद्र आणि कृष्ण यांचाच अवतार मानू लागले. वैरागीच्या पश्चात् त्याची मंडळी मुसलमानांच्या चलाखीमुळें किंवा त्याच्या दैवयोगानें निर्बल झाली आणि थोड्याच वेळांत त्यांची समाप्ति होऊन गेली. जर कदाचित् ही घटना घडली नसती तर उत्तर हिंदुस्थानांत निष्कलंक अवताराप्रमाणें वैरागीची पूजा झाली असती.

या सर्वांत जी एक विशेष गोष्ट त्याच्यांत दिसून येते व जिनें त्याच्यांत अमानवीयता असल्याचें सिद्ध होतें तें हें कीं, इतकें अलौकिक यश व विजय प्राप्त होत असूनसुद्धां त्यानें आपला साधुत्वाचा आयुष्यक्रम सोडला नाहीं. युद्ध होत असतांनांसुद्धां तो एका बाजूला अलग बसून भक्तियुक्त ध्यानांत लीन होत असे. केवळ आवश्यकता पडली म्हणजे तो युद्धक्षेत्रांत उडी घेई. जेव्हां राज्य करण्याची वेळ आली तेव्हां वैरागीनें तें आपल्या सरदारांत वाटून दिलें व आपण संतचा संत राहिला. या स्थळीं विदेही जनकाची उक्ति बरोबर लागू होते कीं ज्याप्रमाणें पाण्यांत कमलाचें पान

असुनसुद्धां कोरडेचें कोरडेंच रहातें, तसाच हा या संसारांत राहूनसुद्धां अलिप्त राहिला. पंजाबच्या हिंदूंना हा एक अवतारप्रमाणेंच झाला. परंतु या समयाच्या परिवर्तनाचा हिंदूराजांवर कांहीं परिणाम झाला नाहीं. साधारणतः मनुष्य जुन्यापुराण्या मार्गालाच चिकटून राहूं पहातो. आणि विशेषतः या देशांतील लोकांना तर तो एक तऱ्हेचा रोगच जडून राहिलेला आहे. मुसलमानी आक्रमणाचा परिणाम पहाडी लोकांवर फार कमी झाला. पर्वतांमधून सैन्याचे प्रवेशमार्ग फार कठिण होते. जे कष्ट देशांतल्या इतर हिंदूलोकांना सहन करावे लागले, त्यांचा अनुभव यांना घडला नाहीं. शिवाय त्यांच्यावर मुसलमानांना आक्रमण करतां येणें अशक्य, निदान फार कठिण, असल्यामुळे त्यांना पहाडामध्यें त्यांच्या राज्यावरची सुरक्षितता उपभोगावयास सांपडली. व म्हणून तर हिंदूंच्या कष्टांची यथार्थ कल्पना न करतां आल्यामुळें त्यांना देशांतील इतर हिंदूंबद्दल सहानुभूति उत्पन्न झाली नाहीं. या लोकांनीं हिंदु-धर्माची आस्था कधीं प्रकट केली नाहीं किंवा त्याला निर्भय करण्याचाहि प्रयत्न केला नाहीं. जेव्हां केव्हां या पतित देशाला उठाव करण्याची इच्छा होत होती तेव्हां हिंदूंचे डोळे आशेनें हिंदूराजांच्या सहायाकडे लागत. राजशक्ति वाढविण्यासाठीं कोणती ना कोणती तरी एक वेदी धुंडावी लागते कीं त्या शक्तिसंचयासाठीं व तिच्या कार्योन्मुखतेसाठीं जी केंद्र बनूं शकेल. गुरु गोविंदसिंहानें या राजांची सहायता मागितली होती. आणि हे उलटे त्याचे वैरी बनले होते. वैरागी कांहीं नव्या पंथाचा अधिकारी नव्हता. हिंदुमात्र याचें पूजन करीत होते. यांनीं पंजाबावर आपली सत्ता प्रस्थापित केली होती. हिंदू राजे आपल्याला सहाय्य करतील अशी याला आशा होती. पंजाबांतील आंदोलनांत भाग घेऊन हिंदूराज्य स्थापन करण्यांत त्यांचा लाभच होता. परंतु त्यांचे डोळे जसेच्या तसेच मिटलेले राहिले. दूरची तर दूरच पण अगदीं आपल्याजवळ समोरची अवस्थासुद्धां त्यांना दिसूं शकली नाहीं.

जेजोहून कैलोरचा राजा अजमीरचंद्राला वैरागीनें लिहिलें कीं, " पहिल्यानें गुरूंचा विरोध केलास; परंतु आतां तूं आपलें धोरण बदललें पाहिजे." मोठ्या अहंकारानें व ताठ्यानें त्यानें उत्तर केलें:—" जसें त्याला पळवून लावलें तसें तुलाहि पळवून लावीन. " वैरागीनें त्याचेवर चढाईची आज्ञा दिली. अजमेरचंद्राच्या साह्यासाठीं पुष्कळसे हिंदूराजे एकत्र झाले. किल्ल्या-

वर वीराची चढाई झाली. पुष्कळ सैनिक मारले गेले. किल्ल्याची भिंत थोडीशी पाडली व वैरागीचा विजय झाला. फक्त या एकाच लढाईत त्या सर्व राजांची शक्ति समाप्त झाली. शेवटीं सर्व नजराणे घेऊन येऊन वीराला भेटले. त्यांनीं दिल्लीचा संबंध तोडून टाकला, त्यांची खंडणी बंद केली व वैरागीचें अधीनत्व स्वीकारलें.

संवत् १७६७ ( शके १६३३ ) मध्यें मंडी–नरेश सुधरसेन वैरागीला आपल्या राज्यांत घेऊन गेला, त्याचा शिष्य झाला व त्याचे चरण पुजूं लागला. सारी प्रजाहि त्याला गुरु मानूं लागली. वैरागीला आतां सुख मिळालें. बाह्य थाट बनविला. डोक्यावर कलगी धारण केली आणि राजाप्रमाणें रहाणें सुरू केलें. एका रजपुत सुंदरीशीं विवाह केला.

वैरागीचा पर्वतप्रदेशांत जन्म झाल्यामुळें पर्वतीय प्रदेशावर त्याचें प्रेम होतें. जेव्हां केव्हां वेळ मिळे तेव्हां तो पर्वतावर फिरावयाला जात असे. आजकालचे इंग्रज लोकसुद्धां थंड देशांतील असल्यामुळें दरवर्षी पर्वतावर जाणें पसंत करतात. परंतु जेव्हां वीर पर्वतावर जाई तेव्हां त्याचे शिखांवर सक्ति होण्यास सुरुवात होत असे. वैरागीच्या विरुद्ध मुसलमान लोक कांहींना कांहीं तरी अफवा उठवून पुनः आपली शक्ति वाढविण्याला आरंभ करीत. वैरागीशिवाय शिखांना राज्यप्रबंध करणें अशक्यसें होऊन बसलें होतें पण मनांतल्या मनांत ते त्याचेविरुद्ध जळत असत. यामुळें त्याच्याबद्दल लोकांमध्यें कैक गोष्टी फैलावल्या गेल्या. वैरागी भोगलोलुप होऊन गृहस्थ झाला आहे; याचें तप नष्ट होत चाललें आहे, यानें धर्मयुद्ध सोडून देऊन पंथाला विस्मृति पंथाला लावलें. जेव्हां शिखांचा एकपक्ष त्याचे विरुद्ध तयार झाला तेव्हां सर्वांनीं वरील प्रवादाला आपल्या मनांत पक्की जागा दिली, परंतु हें सर्व खोटें होतें. जर खरोखरच तो आपल्या उच्चस्थितीपासून च्युत झालेला असता तर पुनः पुन्हां तो कार्यक्षेत्रांत काय म्हणून उडी घेता? आणि पुनः पुन्हां याला सफलता कशी प्राप्त झाली असती ? यानें एक विवाह अवश्य केला होता. या विवाहापासून त्याला आषाढ १७६९ ( शके १६३५ ) त एक पुत्र झाला तो त्याच्या बरोबरच दिल्लींत हुतात्मा झाला. याशिवाय याच्या कैक करामती ( चमत्कार ) वर्णन केल्या आहेत. पण त्यावर विश्वास बसणें कठिण आहे.

असें सांगतात कीं, मंडीहून वैरागी प्रवासासाठीं कुल्लुला गेला. तेथील शासकानें याला तेथें पकडलें आणि तो समाचार दिल्लीस लिहून पाठविला; यामुळें मुसलमानांचे येथें विजयवाद्यें वाजूं लागलीं, हिंदूंच्या घरीं शोक होऊं लागला आणि पंथ ( शिख ) निर्नायकत्वामुळें विधवेप्रमाणें दीन व हीन बनला. या एका घटनेनें देशांतील वातावरण अगदीं बदलून टाकलें. मुसलमानांचें साहस वाढलें. दिल्लीहून सैन्यें रवाना झालीं. सर्व ठिकाणीं पुन्हां मुसलमान अधिकारी होऊन बसले. शीख व हिंदू वैरागीचें स्मरण करीत रडूं लागले. आपल्या भूतांच्या सहायानें यानीं आपला कारावासाचा पिंजरा मंडीला आणून उभा केला. शिखासाठीं ईदचा चंद्र वर आला. चंपानरेश भिऊन गेला आणि याला जाळ्यांत फँसविण्याचा प्रयत्न करूं लागला. वैरागीला हें सर्व पहिल्यानेंच माहित झालें होतें. त्यानें नरेशापुढें तें सर्व प्रगट केलें. या घटनेमुळें राजा त्याचा पक्का शिष्य बनला. असें म्हणतात कीं, येथें त्यानें आणखी एका स्त्रीशीं विवाह केला. जेव्हां दिल्लीच्या सेनेनें शिखांना फार जर्जर केलें तेव्हां त्याला मोठ्या कठिण परीक्षेंतून उत्तीर्ण व्हावें लागलें. नंतर पुन्हां पर्वतावर चालता झाला आणि साधु बनून काश्मीर, अमरनाथ, नेपाल इत्यादि यात्रा केल्या. इकडे शाही फौजा देशांत चक्करा घालीत होत्या.

# ८ 'राजसिंहासन हाललें !'

पुराणांत कैक स्थानीं अशा कथा आहेत कीं, अमुक ऋषि तप करूं लागला आणि इंद्राचें आसन हालूं लागलें. तेव्हां ऋषीच्या तपाची परीक्षा करण्यासाठीं इंद्रानें अप्सरा पाठविल्या ......इत्यादि.

जगांत साधारणतः सर्वांत मोठ्या राजाला इंद्र म्हणावयाला हरकत नाहीं. त्याचा धर्म प्रजेला सुखी ठेवणें हा आहे. ज्यावेळीं कोणी ऋषि त्याच्या प्रदेशांत तप करित बसतो तेव्हां त्याला भीति वाटते कीं याची शक्ति वाढून राज्याला एखादें भय तर नाहीं उत्पन्न होणार ! वर्तमान कालांत ऋषींच्या तपाचे जागीं धार्मिक व राजनैतिक संस्था आहेत असें मानलें असतां हरकत नाहीं. जेव्हां जेव्हां एखादा महापुरुष एखाद्या संस्थेचा पाया घालून आरंभ करतो तेव्हां तेव्हां देशाच्या शासकसंस्थेला अशी आशंका उत्पन्न होते कीं या संस्थेची शक्ति वाढून एखादेवेळीं राज्यामध्यें तर ही हात घालणार नाहीं ना ? आणि याच हेतूनें ती संस्था निर्बल करण्यासाठीं किंवा आपल्या स्वाधीन करून घेण्यासाठीं शासकशक्ति निरानिराळे उपाय योजित असते. त्या संस्थेंत आपल्या मनुष्यांची भरती करून ती संस्था आपल्याविरुद्ध जाणार नाहीं अशी व्यवस्था करण्यांत येते. अशींहि मनुष्यें आंत पाठविलीं जातात कीं, जीं त्या संस्थेच्या सर्व अंतस्थ हकीकती व समाचार नियमानें शासकशक्तीला पोचवितील; आणि हे उपाय अमलांत आणूनसुद्धां जर त्या संस्थेची शक्ति वाढतच गेली तर भेदनीतीचा अवलंब करून त्या संस्थेचे तुकडे उडविले जातात. वैरागीनें तप केलें होतें. यानें एका जंगी शक्तीची प्राणप्रतिष्ठा केली होती. मोंगल साम्राज्यांतील बऱ्याच मोठ्या प्रदेशावर याचें स्वामित्व स्थापित झालें होतें. या प्रदेशांत त्यांची फौजी शक्ति नष्ट झाली होती व आतां हिंदुधर्माचा ध्वज तेथें डोलूं लागला होता. यामुळें दिल्लीचें राजसिंहासन हालूं लागलें.

अवरंगजेबाचा मृत्यु होऊन चुकला होता. अवरंगजेबाचें सुखस्वप्न केवळ सर्व भारतवर्ष मुसलमान व्हावा एवढें एकच नसून सर्वत्र भारतीय लोक मुसलमान होऊन एका छत्राखालीं यावेत असें तो इच्छित होता. पहिल्या हेतूसाठीं त्यानें महाधोरणी व बुद्धिमान् अकबराच्या राजकीय धोरणाला तिलांजलि दिली व हिंदूंना पीडा देणें सुरू केलें. अकबराची दैशिक नीति हा मोंगल शक्तीचा पाया होता; तोच मोंगलसाम्राज्याचा निर्माता होता. जर अकबर झाला नसता तर बाबरचा वंश दिल्लीवरील पूर्वींच्या इतर राजवंशाप्रमाणें आसपासच्या प्रदेशावर थोडा वेळ राज्य करून समाप्त झाला असता. अकबराचे उत्तराधिकारी जहांगीर व शहाजहान यांनीं अकबराच्याच नीतीचा अवलंब करण्याचा प्रयत्न केला. जर शहाजहानाचा वडील मुलगा दाराशिकोह गादीवर येता तर हिंदुस्थानावरील शासनसंस्था ही परकीय न राहतां तिनें जातीय रूप धारण केलें असतें. तो उत्तराधिकारी बनूं नये, राजसिंहासनावर आपला अधिकार जमावा म्हणून अवरंगजेबानें मुसलमानांना भडकविलें. दाराशिकोह वेदान्ती स्वभावाचा संत होता. औरंगजेब नीतिनिपुण होता. धार्मिक क्षेत्रांत दारा फार उच्च श्रेणीचा पुरुष होता परंतु औरंगजेबाला राजकीय बुद्धिबलाचे डावांत यश येणें अपरिहार्य होतें. मुसलमानांच्या सहाय्यानें औरंगजेब राज्यावर येऊं शकला. हिंदूंना दारा गादीवर यावा अशी इच्छा होती. आणि ज्यांच्या सहाय्यानें अवरंगजेब गादीवर आला त्या मुसलमानांना तुष्ट करण्यासाठीं ( आणि विशेषतः स्वतःच्या धर्मवेडाच्या दृष्टीनें ) हिंदूंवर त्यानें बलात्कार करणें हें अगदीं स्वाभाविक होतें. दुसऱ्या हेतूसाठीं औरंगजेबानें दक्षिणेतील मुसलमानी राज्यांचे विरुद्ध युद्ध सुरू केलें होतें. याच्या आयुष्याचा बराच मोठा भाग त्याच्या दक्षिणेंतील युद्धांत गेला. विजापुर, गोवळकोंडा हीं राज्यें जिंकल्यानंतर त्याच्या राज्याची मर्यादा भारतवर्षाच्या सर्व सीमांना जाऊन पोचली होती असें म्हटलें तरी चालेल. परंतु मोंगल राज्याची इमारत इतकी अवाढव्य झाली कीं तिचा तिला तोल संभाळणें अत्यंत कठिण होऊन बसलें आणि ती आपल्याच भारानें ढांसळली. अवरंगजेबाचे प्राण जातांच दिल्लीमध्यें गृहकलहाला सुरवात झाली. अखेर जेव्हां बाहादुरशहानें राज्यसूत्रें हातीं घेतलीं तेव्हां त्याला राजपुतान्याकडे जाणें भाग पडलें. वैरागीनें जेव्हां दिल्लीच्या जवळचे करनाल, पानिपत, वगैरे

जिल्हे जिंकून घेतले त्यावेळीं दिल्लीमध्यें भयाची छाया इतकी पसरली होती कीं लोक नगर सोडून पळून जाऊं लागले. दिल्लीचा शासक निजाम-उल्मुल्क या बाबतींत केवळ बादशहाला या स्थितीचें निदर्शक असें एक पत्र लिहिण्याशिवाय आणखी कांहीं करूं शकला नाहीं. बादशहा परत आला तों त्याला पंजाबकडील महाभयाची चिंता उत्पन्न झाली. त्यानें आपलें लक्ष सरहिंदच्या सुभ्याकडे फिरविलें. वैरागी यावेळीं मंडी, कुलु इत्यादी-मध्यें भ्रमण करीत राहिला होता.

बादशहानें मोठालीं सैन्यें देऊन आपले सेनापति हाजी इस्माइलखां आणि इनायतुल्लाखां यांना तिकडे पाठविलें. इकडे इस्मायलखां लाहोरहून सहाय घेऊन निघाला. कसूरचा पठाण रईस महम्मदखांयानें मुसलमानांना एकत्र करून शिखांची शक्ति कुबलण्याचा प्रयत्न केला.

दिल्लीची सेना येण्याबरोबर घाबरून बाबा विनोदसिंह कर्नाल सोडून सरहिंदला येऊन पोचला. पहिलें युद्ध अमीनाबादला झालें. त्यांत शिखांनीं पळ काढला. घायाळ आणि मृत शिखांना, त्यांच्याच केसांनीं झाडाला टांगून फाशीं देण्यांत आलें. वैरागीशिवाय शिख म्हणजे नवरदेव नस-लेल्या वरातीप्रमाणें होते. मनीमखानें सरहिंदवर आपला अधिकार जमविला. वाटेनें शिखांची कत्तल करीत करीत अस्लमखां लाहोरला आला. शिख पळत फिरत होते, मुसलमान त्यांचा पाठलाग करीत होते. तेव्हां पूर्वीपेक्षां अधिक अत्याचार होऊं लागला. हिंदू लोक वैरागीचें स्मरण करून करून रडत होते. ही स्थिती ऐकून वैरागी आपल्या अदृश्य शक्तीवर विश्वासून कुलूहून निसटला आणि मंडीवरून हुशारपुरला येऊन पोचला.

अरण्यांत सिंहाची गर्जना होतांच हरिणादि दुसरे वन्य पशु लागलींच पळायला सुरवात करतात त्याचप्रमाणें यावेळीं झालें. वैरागीची कार्यक्षे-त्रांतील अवतारणा ही मुसलमानांसाठीं सिंहाची गर्जनाच होती. प्रत्येकजण आपापले प्राण घेऊन पळूं लागला. शिखांचें साहस वाढलें. लोकांच्या घरांत पुनः नवयुगावतरण झालें. मुसलमान स्त्रिया रडून रडून वैरागीला शिव्याशाप देत. हिंदू कन्या व महिला यांच्या मुखांतून वैरागीसाठीं आशी-र्वाद निघत. वैरागीच्या येण्याचाच फक्त अवकाश होता, सर्व गेलेले प्रदेश पुनः आपोआप स्वाधीन झाले. यावेळीं सुद्धां त्याचें भय मुसलमानांवर तसेंच होतें. तो पहिल्याप्रमाणेंच दौरा करीत गेला व स्वाधीन झालेले इलाखे

भिन्न भिन्न सरदारांना देत गेला. रामसिंह लुधियानाचा शासक नेमला गेला. माळवा फुलकियांना आणि माझा मझलियांना दिला. पुरुदचा इलाखा रूपचंद्राच्या स्वाधीन केला. लोहगढचा किल्ला आपली राजधानी बनवून सेना बरोबर घेऊन वीर वैरागी भ्रमण करूं लागला. सिंह बकरी एक झाली, धर्माचें राज्य झालें, इस्लाम ताब्यांत आला, देवी देवतांची पूजा होऊं लागली. देशांतल्या हिंदूंना शांतीचा उसासा घेतां आला. वैरागानें निश्चय केला कीं आपली सेना घेऊन सहारणपुर इत्यादि मुसलमानी नगरें जिंकावयाचीं, परंतु हें करण्याचे आधीं एक लहानशी गोष्ट करणें बाकी होतें. ज्यानें गुरूंच्या मुलांना धोक्यानें पकडवून दिल होतें त्या गंगाराम नांवाच्या ब्राह्मणाकडे ते गेले. पहिल्यानें मुरंडच्या रांगड्यांना दंड केला. खेडीला जाऊन गंगारामाला सहकुटुंब पकडला. आणि नगरच्या ठाणेदार वगैरेच्या वधाची आज्ञा दिली. शिख जेव्हां गंगारामाचें उदाहरण देऊन ब्राह्मण जातीला निंदूं लागतात तेव्हां त्यांनीं हें लक्षांत ठेवले पाहिजे कीं, त्याच कुकर्म करणाऱ्या ब्राह्मणाला दंड करणाराहि ब्राह्मणच होता. गुरूंचे स्वतःचे बंधु शत्रूंना मिळून गुरूंना कष्ट झाले आहेत. तरीपण तेवढ्यानच त्यांचे वंशाला आम्ही दोष देऊं शकत नाहीं.

सहारणपुरच्या शासकाचें नांव अलीमहंमद होतें. यानें वैरागी आल्याचें ऐकतांच धर्मयुद्धाची घोषणा केली. अगणित मुसलमान मेहदी लावून एकत्र झाले. वैरागी येऊन पोंचतांच अली स्वतः भयामुळें पळून गेला. परंतु लढाई निकराची झाली. जेव्हां सरदार शालिबखां मारला गेला, तेव्हां सर्व जणांनीं पळ काढला. सहारणपुरमध्यें अशी लूट झाली कीं तेथें कांहींहि राहिलें नाहीं. पुष्कळशा लोकांचा वध झाला.

यानंतर वैरागीनें नजीबाबाद व जलालाबादच्या पठाण रहिवाशांना पत्रें पाठविलीं आणि कळविलें:—" मी तुमचा समाचार घ्यावयास आलों आहें. सावध व्हा ! तुमचें नगरसुद्धां सहारणपुरप्रमाणें लुटलें जाईल. " लागलीच नजीबाबादला जाऊन वीरानें वेढा दिला. येथील शहानवाजखां खुप लढला. परंतु विजय मिळवूं शकला नाहीं. नगर लुटलें गेलें. गंगेच्या आसपासचीं कैक नगरें जिंकलीं. अंबोटा आणि ननोतावर चढून जाऊन खूप लूट माजविली. एक मनुष्य महम्मद जफरुद्दीन ननोनाचें युद्ध प्रत्यक्ष पाहून त्या युद्धाचें वर्णन करतो:—" नगराच्या एका भागांत तीनशें शहा-

जाठ्यांचा ( राजपुत्र वा राजवंशीयांचा ) वध केला गेला. ज्वालापुर आणि सदवराच्या राजांपासून पुष्कळसें द्रव्य भेट घेतलें गेलें. मुरादाबादचा प्रदेश लुटून वैरागी जलालाबादला जाऊन पोंचला. तेथील सरदार जलालखानें असा सामना दिला कीं, शिखांची गाळण उडाली. शिख शिड्या घेऊन किल्ल्यावर चढत होते, आणि पठाण त्यांना वरून ढकलून देत होते." खाफीखानें लिहिलें आहे कीं, या हल्ल्याचेवेळीं वैरागी त्या सेनेबरोबर नव्हता. लोहगढमध्यें शिखांच्या वैगुण्याचें वर्तमान ऐकून क्रोधानें फणफणत तो तेथें आला व त्यानें नगर जिंकून घेतलें.

वैरागीचे याप्रमाणें होणारे विजय व लूटमार ऐकून असें आश्चर्य वाटतें कीं काय वैरागी जेथें जाई तेथें तेथें घनघटेप्रमाणें जाई आणि त्याच्यापुढें सामन्याला कोणी उभेंच रहात नसे ! ! ही साधारण गोष्ट आहे. जेव्हां महमुद गजनवी आदि मुसलमान लोकांनीं भारतवर्षावर स्वाऱ्या केल्या तेव्हां हिंदूंचीहि अशीच अवस्था होती. हिंदू बलहीन होते. त्यांना आपलें रक्षण कसें करावें हें समजेनासें झालें. त्यांचें असें सत्ताकेंद्रस्थान नव्हतें कीं, जें विदेशीय शत्रूंच्या सामन्याला उभें राही. कोणत्याहि मुसलमानानें या निर्बलतेचा फायदा घेतला. आतां दिल्लीचें केंद्रस्थान पोखरलें गेलें होतें. त्यांना तर आपल्या प्राणांची चिंता येऊन पडली होती. सरदारांचें व ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांचें रक्षण कोण करतो ? ठिकठिकाणच्या सरदारांनीं आपल्या प्राणांचें संरक्षण एकएकट्यानेंच करण्याची वृत्ति धरली होती व यांतच त्यांच्या सफलतेचें रहस्य आहे. ( तरीपण सर्व शिख सैन्यानें मार खावा, हार खाण्याची पाळी येऊन ठेवावी. हताश व्हावें व एकटा वैरागी येतांच हें पारडें फिरावें व केवळ एकट्याच्या पराक्रमावरच निश्चयानें विजय मिळावेत. आणि अशा वेळा कांहीं कांहीं प्रसंगाच्या नसत तर सर्व प्रसंगीं व सर्व वेळां वैरागी असला तर जय, नसला तर पराजय, अशी शिखांची स्थिती होती आणि ही कांहीं सामान्य आश्चर्याची गोष्ट नव्हे. )

# १ 'उलटे दिवस वा पडता काळ'

पहाडच्या एका हिंदूनरेशानें गुरु गोविंदसिंहाचें संबंधीं असें म्हटलें होतें:—"कुठें मोंगलसाम्राज्य आणि कुठें युद्धसामग्री वगैरेनें रहित असा एक संत" हे शब्द वैरागीच्या बाबतींत अक्षरशः सत्य होते. मोंगलसाम्राज्याचे सामन्याला युद्धसामग्रीचा ठावठिकाणाहि नसतांना एकएकट्या अशा साधूची काय कथा होती ! परंतु परमात्म्याची लीला कोण जाणूं शकतो ? याच साधूनें दिल्लीसम्राट्च्या डोळ्यादेखत अतिशय थोड्या अवधींत एक मोठें राज्य स्थापित केलें; आणि आपणांवर तुटून पडणाऱ्या शाहीसेनेला मारून परतविलें.

परंतु कोणाचेच दिवस एकसारखे रहात नाहींत. युरोपमध्यें प्राचीनकाळचा हॅनिबाल हा एक सर्वांत मोठा असा सेनापति गणला जातो. त्यानें इटलीवर स्वारी करून रोमच्या साम्राज्याला नष्ट करण्याचा इरादा ठेवला होता. रोमसाम्राज्य त्याच्या जन्मभूचें—कार्थेजचें—शत्रू होतें. युरोपच्या अगम्य व अनुल्लंघनीय आल्प्स पर्वताला ओलांडून जाणारा हा पहिला सेनानायक होऊन गेला. कित्येक वर्षें याला इटलीमध्यें विजय मिळत होते. अखेर पडत्यावेळीं हा आपल्या देशांत पळून जाण्याच्या प्रयत्नांत मारला गेला. युरोपचा दुसरा सेनानायक रोमचा पहिला केसर झाला. त्यानें रोमसाठीं युरोपचा फार मोठा भाग जिंकला. याचा अंत फार वाईट तऱ्हेनें झाला. याच्या मित्रांनीं त्याला नकळत त्याच्या विरुद्ध संगनमत करून त्याचा वध केला. याहूनहि वरचढ अशा अद्वितीय नेपोलियनशीं कोण सामना करूं शकला होता ? कित्येक वर्षेपर्यंत युरोपचे सर्व देश याचें नांव निघतांच कांपत असत. बादशहांना गादीवरून उतरवून ज्याला वाटेल त्याला तो सिंहासनाधीश्वर करीत होता. इटली, आस्ट्रिया, जर्मनी, रूस, स्पेन इत्यादि राष्ट्रें याचा शिक्का मानीत होते. परंतु तोच नेपोलियन काल

फिरतांच एकटा एका दूरच्या लहानशा बेटांत समुद्राचे किनाऱ्यावर वाळूचे कण मोजीत दिवस काढीत होता. इंग्लंडचा सर्वांत मोठा बादशहा आलफ्रेड झाला. शत्रूशीं लढत असतां एकवेळीं त्याला पळून जावें लागलें. एका झोंपडींत त्यानें आश्रय घेतला. तेथील म्हातारीनें त्याला आगटींत भाकरी भाजावयाला लावलें. आलफ्रेडला हें नवें काम कोठून येणार ? भाकर जळाली. म्हातारीनें त्याला असे वाईटसाईट बोल ऐकविले कीं, त्याला त्याचें पुढें जन्मभर विस्मरण झालें नाहीं. शाहीसैन्याशीं टक्कर देतांना महाराणा प्रतापला कोणते प्रसंग सोसावे लागले नाहींत ? एकावेळीं आपल्या स्त्रीपुत्रांसह त्याला कित्येक दिवस रानावनांत गुजारावे लागले. एकवेळीं खाण्यासाठीं तर जवाच्या भाकरीवर गुजारा करावा लागणार आणि त्याहि पण एका जंगली मांजरानें पळविल्या आणि त्याला भुकेचे कष्टांत आपलीं अर्भकें राहिलेलीं पहावीं लागलीं.

बहादुरशहाजवळ वैरागीच्या शक्तीसंबंधीं पुष्कळशा कागाळया जाऊन पोंचत होत्या. सुभा सरहिंदचा मुलगाहि त्याचेकडे जाऊन आपलें सर्व वृत्त त्यानें त्याला निवेदन केलें. असें सांगतात कीं वैरागी आपल्या भुतांकडून आपल्याला मारवील कीं काय अशी भीति बादशहाला त्यावेळीं वाटत असे.

बादशहा दक्षिणेहून निघून अजमिरला येऊन पोंचला. येथें कांहीं मुसलमान एकत्र होऊन बादशहाकडे गेले आणि म्हणाले कीं, धर्माच्या रक्षणाची कांहीं तजवीज काढा, बादशहानें आपली तरवार म्यानांतून काढून जमिनीवर ठेवली व म्हणाला—" जर कोणी पुरुष असेल तर त्यानें ही तरवार उचलावी आणि धर्मशत्रूचा अंत करावा. " ( याचा अर्थ असा कीं मी तर असमर्थ आहें परंतु कोणी समर्थ असेल तर माझ्या जागीं येऊन त्यानें तें काम करावें ) पण कोण पुढें येतो ? कोणालाहि तरवार उठाविण्याचें साहस करवलें नाहीं.

अखेर निरुपाय होऊन अजगरखां, समंदखां, असदअल्लहखां व नूरखां यांचेबरोबर एक मोठें सैन्य देऊन त्यांना वैरागीवर पाठविलें. यावेळीं वैरागी पर्वतावर निघून गेलेला होता. शाही सेनेनें तरापडीवर आपला अधिकार जमविला. सरस्वती नदीच्या किनाऱ्यावर शिखांचा पराजय झाला. त्यांनीं लोहगढांत येऊन आश्रय घेतला. कोट आबूखांच्या जवळ एक फार

मोठें युद्ध झालें. शाही सैन्य एक लक्षांजवळ होतें. वैरागीचें सैन्य जास्तींत जास्ती म्हणजे त्याच्या पांचव्या हिशाइतकें म्हणजे वीस हजार होतें. त्यांचा अशा प्रकारचा पराजय झाला कीं त्यांना वाचणें कठीण झालें. त्यांनीं पळ काढला. ज्याचें जिकडे तोंड होतें तिकडेच त्यानें पाय काढला. ( इतके ते भयग्रस्त झाले होते. ) वैरागीहि घोड्याला दवडीत जात होता. मिर्झाबेगचा मुलगा नवाबबेग त्याचा पाठलाग करीत होता. त्याचे सर्व साथी एक एक निघून गेले. दहाबारा कोस गेल्यानंतर सूर्यास्त झाला. घोडा चालेनासा झाला. घोड्याला सोडून वैरागी एकटाच उजाड जंगलांत घुसला. अंधेरी रात्र होती. वरून पाऊस पडूं लागला. तहानभूकेनें व्याकूळ होऊन तो निरुपायानें पळत जात होता. शत्रूहि मागून पाठलाग करीत होता. पळतां पळतां समोर आग दिसली. तेव्हां तेथें एखादें घर असावें असें वाटलें. त्यानें तिकडे तोंड फिरविलें. आपण एका बागेंत गेलों आहोंत असें त्याला दिसून आलें. बागेचा माळी व माळीण आगटीजवळ शेकीत होते. वैरागी तेथें बसतो आहे तोंच घोड्याची टाप ऐकूं आली. यानें लपावयाला एखादी जागा आहे का म्हणून विचारलें. जवळच एक आड होता. प्राण-रक्षणाकरितां तो त्यांत उतरला. पिच्छा करणाऱ्यानें माळयाला धमकावलें. तेव्हां त्यानें भयभीत होऊन पत्ता दाखवून दिला. वैरागी हें त्यांचें संभाषण ऐकतांच तसाच बाहेर पडला. व चुपचाप शेतांतून पळत पळत निसटून गेला. त्यांचे पाय घायांनीं भरून गेले. रस्त्यांत एक झोंपडी दिसली, तींत तो गेला. बाकी रात्र थोडी विश्रांतींत घालविली. सकाळीं झोंपडीचा धनी येऊन पोंचला. त्यानें आरडाओरड केली. वैरागीनें चटकन खंजीर काढला आणि त्याला लंबा केला. पुढें तो चालता झाला व कांहीं दिवसांनीं लोहगडाला येऊन पोंचला.

इतक्यांत आणखी शाहीसेना येऊन पोंचली. या सेनेंत राजपुत्र ( शहाजादा ) जहांदरशहाहि होता. शिख लोक इकडे तिकडे लुटीत फिरत होते. शाहाबादजवळ शाहीसेनेबरोबर शिखांचें युद्ध झालें. जर रजपूत पलटण त्यांना मागाहून येऊन न मिळती तर शिखांनीं विजय मिळविला असता. शहाजाद्याच्या सेनेनें लोहगडाला वेढा घातला. हा घेरा एक महिनाभर होता. शिख लोक घाबरूं लागले. वैरागीनें उत्साहजनक भाषणानें त्यांचा उत्साह कायम ठेवला. त्याच्या वाणींत जादू भरलेली होती. एकवेळीं

किल्ल्यांत खावयास कांहींहि नव्हतें, तेव्हां कांहीं शिखांनीं मुसलमानी वेषानें बाहेर जाऊन आंत सामग्री आणली.

जेव्हां शिख लोक भुकेनें मरूं लागले तेव्हां त्यांनीं वैरागीला सतावून सोडण्यास आरंभ केला—" आतां आम्हांला वांचीव ! आतां तुझें तें तप कोठें गेलें ? तुझ्या त्या अदृश्य शक्ति कोठें आहेत ? " अर्ध्यारात्रीं वीर उठला आणि त्यानें क्रोधानें शाहीसेनेवर छापा घातला. हा दिवस चमकोरच्या युद्धाचा होता. वैरागीनें शिखांना म्हटलें " गुरुपुत्राच्या वीरतेचें स्मरण करा आणि मृत्यूसाठीं तयार व्हा. " शिखांनीं वीरतेनें लढण्यांत कांहीं कसूर केली नाहीं. परंतु हे आंत कोंडलेले होते, यांना कोठूनहि सहायता नव्हती आणि मोंगलसेना बाहेर असून त्यांना सहायतेचें आनुकूल्य होतें.

मुसलमान लेखक लिहितात कीं, वैरागीनें आपल्यासारखा दिसणारा गुलाबू नांवाचा एक पुरुष आपल्या जागीं बसवून आपण स्वतः बाहेर पडला आणि पर्वताचा रस्ता धरला. गुलाबू पकडला गेला. खानखानानें हा वैरागीच आहे असें समजून ती आनंदाची वार्ता बादशाहाला लिहून धाडली कीं, वैरागी पकडला गेला आहे. परंतु जेव्हां वस्तुस्थिति कळून आली तेव्हां बादशहानें त्याची फार निर्भत्सना केली.

या गोष्टीमुळें बहादुरशाहाला इतका क्रोध आला कीं, तो स्वतः सैन्यासह हैदरी पताका घेऊन युद्धाची घोषणा करीत मैदानांत उतरला. बाह्यात्कारें जरी मोठ्या डौलानें सेना निघाली तरी बादशहाचे व सैन्याचे मनांत वैरागीच्या सामर्थ्याबद्दल दहशत बसली होती. बादशहाला वाटलें कीं, त्याचे जर प्राण गेले तर मुल्लांच्या कोरड्या बातानीं काय व्हावयाचें आहे ? असें सांगतात कीं, बादशहानें तहासाठीं पत्रही लिहिलें होतें. दैवयोगानें लाहोरला पोंचतांच तो आजारी पडला आणि कांहीं दिवसानंतर मरण पावला. हें वर्तमान संवत् १७७० ( शके १६३६ ) मध्यें झालें.

बादशाहाच्या मृत्यूनें शिखांचे दिवस पालटून जाऊन त्या प्रदेशाचे अधिकारी आणि सर्व सुभे दिल्लीशीं बिघडून बसले. दिल्लीच्या राजसिंहासनाचे प्राप्तीसाठीं झगडा होण्याला आरंभ झाला. २।३ वर्षें देशांत अंदाधुंदी माजून पंजाबमध्यें शिख आणि मुसलमान अशा दोन शक्ति निर्माण होऊन

बसल्या. जेव्हां कधीं मुसलमान दुर्बल होऊन बसत तेव्हां शिखांची उठावणी होऊन देशांत ते दंगल उडवून देत असत. वैरागी पर्वतावर गेला कीं लागलीच मुसलमानांचें डोकें वर निघत असे. ठिकठिकाणीं मुसलमानी सेना शिखांच्या मागें लागत असे. हा काल दोघांच्याहि पारस्परिक आंदोलनाचा म्हटला जाईल. यावेळीं या दोन शक्तींची जणूं काय कुस्ती होत होती. कधीं एक खालीं यावा तर कधीं दुसरा—पण कोणताहि निकाल होत नव्हता.

जेव्हां बादशहा सेना घेऊन यांचेवर चालून येत होता तेव्हां शिखांनीं मराठ्यांप्रमाणें त्याचेविरुद्ध वृकयुद्ध ( गनीमी काव्याचें युद्ध ) सुरू केलें होतें. जेव्हां केव्हां संधि मिळे तेव्हां शिख शाहीसेनेवर छापा घालीत आणि लगेच जिकडे तिकडे निघून जात. शत्रु त्यांचें कांहींहि निवारण करूं शकत नसे.

बादशहाच्या मृत्यूनंतर वैरागीनें पुन्हां आपला घोडा दौडावयास आरंभ केला. हा ठिकठिकाणीं सेना ठेवीत जात होता. थोड्याच वेळांत त्यानें हरिद्वारपर्यंतचा प्रदेश आपल्या हाताखालीं घेतला. सर्व ठिकाणीं याचे नांवचा शिक्का चालू लागला. आणि नंतर त्या प्रदेशाचें राज्य शिखांच्या हवालीं करून हा पुन्हां पर्वतावर निघून गेला. तो तेथें नसण्याचा अवकाश कीं लागलीच मुसलमानी सेना बलवान् होऊं लागल्या. शिख त्यांच्यापुढें पळ काढूं लागले. कित्येक स्थानीं शीखांनीं त्यांना तोंडहि दिलें; परंतु साधारणतः शिख पुढें पळत व ते यांचा पाठलाग करीत. याप्रमाणें एक वर्ष निघून गेलें. वैरागी पर्वतावरून पुन्हां परत फिरला. ब्रसीगांवच्या युद्धांत शिखांना विजय मिळाला. त्यानंतर वैरागी करतारपुरला पोंचला व त्यानें सरहिंदवर आक्रमण केलें. चूहडमल आणि अमीनखां त्याच्याशीं सामन्याला उभे राहिले. परंतु त्यांचा पराजय झाला आणि त्यांना वैरागीची अधीनता स्वीकार करावी लागली. जालंदरचे जाहागीरदार फैजअल्लीखां आणि सीफअल्लीखां कांहीं कोसांवर पुढें येऊन भेटले; परंतु त्यांनीं गुरु गोविंदसिंहाशीं शत्रुत्व केलें होतें म्हणून वैरागीनें त्यांची अर्धी जहागीर जप्त केली.

संवत् १७७० (शके १६३६) मध्यें वैरागी अमृतसरमध्यें आला. त्यानें तेथें एक फार मोठा दरबार भरविला आणि आपल्या सरदारांना जहागिरी दिल्या. पुष्कळांचा महसूल माफ केला. अमृतसर शहराला पूर्ण स्वतंत्रता दिली. नव्या सैन्याची भरती करण्याला आरंभ केला आणि ठिकठिकाणीं अधिकारी नेमले. त्यानंतर पतियाला, गुरुदासपुर आणि पठाणकोठ या प्रांतांवर अधिकार जमविला. गुरुदासपुरास एक किल्ला बांधून त्यांत युद्ध-सामग्री आणि खाद्य पदार्थ यांचा चांगलाच संग्रह केला. पंजाबच्या अन्य भागांतहि दौरा काढून ते भाग आपल्या ताब्यांत आणून राज्याला जोडले. आनंदपुरला जाऊन पहाडी राजांना एक संदेश पाठविला कीं, हिंदु धर्माच्या संरक्षणासाठीं तुम्हीं वैरागिला येऊन मिळणें हें तुमचें कर्तव्य आहे. यानंतर तो पर्वतावर चालता झाला. मुसलमानांनीं ठरल्या-प्रमाणें पुन्हां आपलें डोकें वर काढलें, आणि त्याच्या राज्यांत गडबड करण्यास आरंभ केला. त्याचा परिणाम असा झाला कीं, एके वेळीं जम्मूचा सुभेदार जबरदस्तखां दिल्लीस जातांना लाहोरला थांबला. गुरुदास-पूर हें हिंदु राज्याची राजधानी असलेलें त्याला पाहवलें नाहीं. त्यानें गुरु-दासपुरावर चढाई केली; परंतु पराभव होऊन त्याला परत यावें लागलें. वैरागिला पुन्हां तिसऱ्यांदा चढाई करणें भाग पडलें. सुभेदार हमीदखानें खूप शर्तीचा सामना केला. युद्ध खूप जोरानें चाललें होतें. सुभ्याच्या तोफांनीं शिखांमध्यें खळबळ माजवून दिली. इतक्यांत एका कहरसिंह नांवाच्या नवयुवकानें सुभा निमाज पढतांना पाहिला. यानें जलदीनें त्याच्यावर झडप घातली आणि त्याचें शीर कापून वैरागीच्या पुढें आणून ठेवलें. वैरागीनें त्याच्या वीरतेची फार प्रशंसा केली, आणि ह्मटलें कीं, " या पुरुषाच्या पराक्रमानें ाज आह्मांला विजय प्राप्त झाला. " वैरागी आतां गुरुदासपुरला राहूं लागला. दिल्लीची राजशक्ति आतां ढिली पडली होती. कांहीं दिवसांनीं वैरागीनें सर्व राज्य सरदारांच्या हवालीं केलें व आपण मंडीला चालता झाला. हा जाण्याचाच अवकाश कीं, लगेच मुसलमानांनीं फिरून आपली शक्ति उभी केली.

वैरागीवर हा एक दोष येऊं शकतो कीं, तो राजाप्रमाणें राहूं लागला, आणि असें करणें गुरूच्या आज्ञेविरुद्ध होतें व याचमुळें याची अवनति झाली. गुरूनें याला या गोष्टीसाठीं मनाई कां केली हें लक्षांत येण्याला

कठीण दिसतें. किंबहुना वैरागीच्या असफलतेचें कारणच तो राजा न होण्यांत आहे असें ह्मणावयास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. याच्यांतील वैराग्यभाव अद्याप पूर्ण रूपानें दूर झाला नव्हता. हा वारंवार विजय प्राप्त करीत होता; परंतु राजशक्ति आपल्या हातांत ठेवण्याची इच्छा न धरतां राज्य दुसऱ्यांच्या स्वाधीन करून देत होता. या लोकांना राज्य संभाळण्याची योग्यता नव्हती. केवळ एकाच गोष्टीनें पंजाबची शांति कायम ठेवणें शक्य होतें. स्थायीरूपानें राज्यसूत्रें वैरागीनें आपले हातीं घेणें ही ती गोष्ट होय. परंतु वैरागी स्वतः यापासून दूर राहिला.

# १० वैरागीची अत्यंत अहितकारी असावधानता.

बादशहाच्या मृत्यूनंतर दरबारांत अमीर लोकांत कित्येक पक्ष निर्माण झाले. गादीच्या उत्तराधिकाऱ्यांमध्यें अशी तरवार चालली कीं, कित्येकांचा अंत झाला. या अमीरांमध्यें दोन सय्यद बंधूंची शक्ति सर्वांहून अधिक वाढली. त्यांच्या सहाय्यानें फिरुकशीयर बादशहा बनला. यानेंसुद्धां थोडींच वर्षें राज्य केलें. जरी स्वतः हा सुखभोगांत निमग्न रहात होता तरी पण याच्या कारकीर्दींत वैरागीची बंदी व त्याची हत्त्या ही मोठी महत्त्वाची घटना घडून आली. यांत फिरुखशीयरचा किती हात होता हे सांगणें मोठें कठिण आहे; तथापि शिखांच्या इतिहासांत याचें नांव अत्यंत अपराधी असें दाखविलें गेलें आहे. वैरागीच्या मागें शिखांशीं केलेल्या करारांचा भंग होऊन त्यांच्यावर जे अत्याचार केले गेले त्या सर्वांबद्दल हाच जबाबदार धरला गेला आहे.

ज्यावेळीं दिल्लीचे अमीर परस्पर दलबंदी करून आपापल्या पक्षाच्या राजकुमारांना सिंहासनावर बसवीत व ते दुसऱ्या पक्षांकडून मारले जात, अशावेळीं वैरागीला फार चांगली संधि होती. ज्याप्रमाणें पुढें महाराजा रणजितसिंगाला करावें लागलें त्याप्रमाणेंच वैरागीला पंजाबमध्यें आपलें एक स्थिर असें राज्य स्थापित करतां आलें असतें, परंतु वैरागीनें याचा विचारसुद्धां केला नाहीं. जर त्यानें असें केलें असतें तर नंतर ज्या घटना घडून आल्या त्या तशा घडून आल्या नसत्या आणि फरुखशीयरच्या कुटिल नीतीला सफलता मिळण्याला कांहीं अवसरहि मिळाला नसता. वैरागीच्या सर्व आयुष्यभर एकच चूक झाली ती ही कीं, त्यानें व्यक्तिविषयक वैराग्याचा अवलंब करून देशाची मोठी हानि होण्याला अवसर राहूं दिला. ( स्वतः राज्यसूत्रें हातीं घेऊन राज्यसूत्रधार होण्यानें त्याच्या वैराग्यशील आयुष्याची हानि झाली नसती. देशाच्या हितार्थच पण राज्यपदाचा बाह्यतः मात्र अवलंब करावा लागला असता, आणि त्यामुळें इतरांना तो

वैराग्यशील दिसला नसता पण अंतर्बाह्य वैराग्य ठेवण्यांत इकडे देशाची मात्र अत्यंत हानि झाली. आणि हा दोष मात्र त्याच्या माथीं कायमचा बसला. ) जेथें एका दृष्टीनें आत्मयज्ञांत त्याचें महानुभावित्व दिसून येतें तेथें हें असें होणें साधारणतः स्वाभाविक आहे. श्रीमान् विदेही राजा जनकाच्या वैराग्याला तो राजा होता तरी दूषण लागलेलें नाहीं असें असून ही गोष्ट वैरागीच्या मनाला पटली नाहीं हें हिंदूचें दुर्दैव ! दुसरें काय ? याचा परिणाम स्वतः वैरागीला व हिंदुधर्माला हानिकारक झाला. व्यक्तिविषयक नीतिधर्माच्या दृष्टीनें त्याचा त्याग उच्चपदाला शोभणारा असेल तरी पण राजनैतिक धर्माच्या दृष्टीनें हा अशा तऱ्हेचा प्रमाद घडला कीं ज्याची दुरुस्ती मागाहून होणें कधींहि शक्य नसतें.

देशांत राजद्रोह फैलावणें हें एका दृष्टीनें सोपें आहे, पण या राजविद्रोहाला सफल करणें हें त्याहून अधिक कठिण आहे; आणि त्या सफलतेच्या परिणामांची सुरक्षितता कायम करणें हें सर्वांहून अत्यंत कठिण आहे. क्रांतिकारक राजद्रोह फैलावण्याची साधनें धुंडतात व राज्यक्रांति घडवून आणतात आणि असें समजतात कीं, या दोन गोष्टींनीं आपला हेतु सिद्ध होईल. जे लोक जंगी शक्ति उत्पन्न करून विजय मिळवितात त्यांना ती शक्ति तो मिळालेला विजय सदासर्वदा आपले हातांत ठेवण्यास पुरेशी पडेल असें वाटतें; परंतु असें होत नाहीं. देश जिंकून घेतला आतां सांभाळ करणें यांत एवढें काय आहे ? ( इतर सहज सांभाळतील ? ) आणि जर अवश्यकताच भासेल तर परत येऊन गेलेला देश पुन्हां जिंकूं ( त्यांत बिघडलें कोठें ? ) असें वैरागीला वाटलें. जर प्रतिस्पर्धी म्हणून एखादें शक्तिशाली राज्य अस्तित्वांत नसतें तर ही समजूत बरोबर ठरली असती. ( लाहोर आणि दिल्ली जिंकून घेऊन जर मोंगलसाम्राज्याचें नांव हिंदुस्थानाच्या यापुढील इतिहासांतून तो पुसून टाकता तर त्याचें राज्यपद न स्वीकारणें योग्य झालें असतें. कारण मोंगलसाम्राज्य नाहींसें झाल्यानें हिंदूराज्याला आघात करणारी शक्ति नाहींशी होऊन मग हळूहळू हिंदूराज्य प्रबल झालें असतें. ) अथवा मोंगलसाम्राज्याला वारंवार छेडण्याची हिंमतच झाली नसती अशी एखादी सुरक्षित व सुसंघटित राज्यसंस्था स्थापन करता तरीहि त्याचें तें करणें योग्य ठरलें असतें. या गोष्टीची फार अवश्यकता होती. वैरागीला सहजगत्या जे विजय

मिळाले ते, वैरागीच्या अलौकिक तेजापुढें दिल्लीची सत्ता आपल्या प्राण-भयामुळें कांपत असे, यामुळें मिळाले. त्यांना आपल्या प्राणांची भीति पडली होती. जेव्हां दिल्लीच्या राज्याचे पाय थोडेसे स्थिर झाले तेव्हां एका साधारण कपटनीतीचा अवलंब करून त्यांनीं वैरागीला निर्बल बनवून सोडलें.

जेव्हां नवें राज्य स्थापन होतें तेव्हां त्या राज्याच्या स्थापकांना प्रतिपक्षाच्या फंदफितुरीच्या आणि लालूचीच्या कुटिल नीतीपासून स्वपक्षीय लोकांना फोडण्यांत येणार नाहीं अशा तऱ्हेची सावधानता ठेवावी लागते. आपल्या पक्षाचें या कुटिल नीतीपासून संरक्षण करावें लागतें. नवीन राज्य-संस्थापकाला जर कोणी विरोधी पक्ष नसला तर मात्र त्यानें स्थापन केलेलें राज्ययंत्र सुलभतेनें चालूं शकतें व अधिकाधिक बलवान् होत जातें. परंतु परतंत्र जातीचे विरुद्ध कौटिल्यादि नीतींचा अवलंब करणारा प्रतिपक्ष नेहमीं असतोच. स्वतंत्रता स्थापन करून विजेत्या जातीचे हातून आपल्या देशाला आणि जातीला सोडविण्याचा प्रयत्न करणारा या फुटीच्या योगानें येणाऱ्या निर्बलतेपासून आपणांला बचावण्याची खबरदारी पहिल्या-पासून जर न घेईल तर त्याचा प्रयत्न आणि यशस्वितेला पोचणारें कार्य-सुद्धां थोड्याशा फितुरीच्या योगानें सर्व व्यर्थ जातें. याला केवळ एकच उपाय आहे व तो हा कीं, केंद्रीकृत अशी प्रबल सत्ता स्थायीरूपानें कोणा एका व्यक्तीच्या हातांत पाहिजे. ती शक्ति म्हणजे राजशक्ति होय. ( नवीन स्थापिली जाणाऱ्या वा भयंकर शत्रूशीं टक्कर देणाऱ्या प्रजासत्ताक राज्यपद्धती-मध्यें, अशा ऐन प्रसंगींसुद्धां एकमेव सत्ताधारी ( Dictator ) निर्माण करणें हें अत्यावश्यक होत असतें. ही गोष्ट पटण्यासाठीं एक उदाहरण दिलें म्हणजे पुरें आहे. बोलशेविझम्—जो समानतेच्या अतिरेकाच्या पायरीला पोचविणारा पंथ, ज्यांत उचनीच भाव नाहीं, कोणी मोठा नाहीं, कोणी लहान नाहीं, सर्व बंधु आहेत वगैरे भावनाच ज्याचें मुख्य तत्व असा बोल्शेविझम्—त्याला सुद्धां एकमेवसत्ताधीश नेमणें भाग पडलें. लेनिन हा तो सत्ताधीश होय. कोणत्याहि देशांतील अत्यंत प्रबल सत्ताधारी राजाची सत्ता आणि लेनिनचे हातांतील सत्ता यांत बाह्यतः कांहींच फरक नाहीं, जेव्हां कोणीहि जाति दास्याच्या जबड्यांतून निसटून स्वतंत्र झाली आहे तेव्हां तेथील शासन राजशासनच झालेलें आहे. खड्ड्यांत पडलेला मनुष्य

खड्ड्यांतून पहिल्यानें जमिनीवरच येऊन उभा राहतो. एकदम हवेंत उडूं शकत नाहीं. जर एका राजतंत्राच्या जागीं प्रजातंत्र राज्य स्थापन होईल तर या वैरागीच्या शासन संस्थेप्रमाणें तें निर्बल होऊन, प्रजा एखाद्या लहानशा गोष्टीनें नेत्यावर अप्रसन्न झाली कीं लागलीच त्या शासनाची समाप्ति झाली असेंच समजावें, आणि एकमुखीं शासनाच्या जागीं कांहीं निवडलेले अधिकारी यांचें शासन स्थापन होईल; तरीसुद्धां, पेशव्यांचे वेळेला मराठी सत्ता अनेक सरदारांच्या हातांत असतांना ज्याप्रमाणें प्रतिपक्षीयानें एकाला दुसऱ्या विरुद्ध करून त्याला कुटिलनीतीच्या बलावर त्या मराठी सत्तेला नष्ट करून टाकतां आलें त्याप्रमाणें तें नष्ट होऊन जाईल. जर वैरागी राजपदाचा अधिकार स्वतःचे हातांत घेऊन एक स्थायी सेना उभी करता तर महाराजा रणजितसिंहानें जें कार्य पुढें करूं घातलें तेंच कार्य यावेळीं फार सुलभतेनें तो करूं शकला असता.

ज्या जातीमध्यें धर्मभेदामुळें किंवा भिन्न भिन्न प्रांतांच्या प्रांतिक अभिमानामुळें परस्पर मेळ होत नाहीं, आणि ज्यांतील व्यक्ति थोड्याशा लालचीनें वा भयानें एक दुसऱ्याचे विरुद्ध होऊं शकतात; त्या जातीमध्यें कोणी बलवान् मनुष्याचे हातीं राज्यशासन असणें हेंच श्रेयस्कर आहे. मागच्या शतकांत जपान अनेक विभागांनीं विभागला गेला होता. जेव्हां जपानच्या राजानें सर्व सत्ता आपल्याच हातीं घेण्याची जोखीम आपल्या शिरावर घेतली तेव्हां सर्वांनीं मिळून जगांत ज्याला दुसरी तोड मिळणार नाहीं, असा अद्वितीय स्वार्थत्याग केला. सर्वांनीं आपापल्या हातांतील लहान लहान प्रांतसत्तांचा लोभ टाकून आपापले सत्ताखंड जपानचा अधिराजा जो मिकाडो याच्या स्वाधीन केले; आणि हें सर्व, मिकाडोला जपानचें एक शासन व एक जाति स्थिर करतां यावी यासाठीं घडून आलें. आमच्या या दुर्दैवी भारतवर्षाला सुदैवानें कित्येकवेळां असें घडवून आणण्याचे प्रसंग आले पण आमच्या दुर्भाग्यानें स्वार्थ आणि ईर्ष्या हे रोग आमच्यांत इतके बोकाळले होते कीं, हा उपायच कोणाला सुचला नाहीं. स्पेन, हालंड जर्मनी, इटली आदिकरून कोणी ना कोणी महान् व्यक्तीच्या राज्यशक्तीच्या बलावरच स्वतंत्र आणि एकरूप जाती बनवल्या गेल्या.

वैरागीला सत्ता आपल्या हातांत ठेवण्याची इच्छा नव्हती. कदाचित् सत्ता हातीं घेतल्यास शिख लोक दोष देतील म्हणून त्याच्या मनाला

संकोच वाटत असावा. वैरागी सर्व राज्य शिखांच्या हातांत देऊन टाकीत असे, आणि याचमुळें हा धोक्याची शिकार बनला.

असाहि संभव आहे कीं, वैरागी या युद्धाला एक धार्मिक युद्ध समजत असे आणि शिखांनीं राजा म्हणण्याचे अभावीं आपल्याला गुरु म्हणावें हें आवश्यक समजत असेल. त्याच्या प्रतिपक्षीयांना याचा विरोध करावयाला हें एक साधन मिळालें. त्याच्या विचारपरंपरेंत एक चूक होती आणि ती ही कीं, धार्मिक स्वतंत्रतेच्या युद्धांत त्या युद्धाचा नेता धार्मिक पदाधिष्ठितच असला पाहिजे असें त्यानें मानलें. राम आणि कृष्ण यांनीं राजत्वाच्या रूपानेंच धार्मिक युद्धें केलीं होतीं (?) ( श्रीशिवरायानें दैशिक व धार्मिक स्वतंत्रता राजत्वाच्या आश्रयानेंच स्थापन केली होती.) शिखांचा स्वाभाविक कल या आंदोलनाला धार्मिक युद्ध मानण्याकडे होता. वैरागीहि विचारतरंगाच्या योगानें असेंच समजूं लागला असावा असा पुष्कळसा संभव आहे.

# ११ धर्म आणि राजनीति.

नवा धर्मपंथ उत्पन्न करून मनुष्यांचे हिताचा प्रयत्न करण्यांत असें एक भय असतें की त्यामुळें कांहीं काळानंतर जातीची उन्नति वा शक्तिमत्ता ही प्राप्त करण्याच्या विचाराकडे डोळेझांक होऊन तें काम मागें पडतें. लोक केवळ एकदेशी धार्मिक सिद्धांतांनाच उराशीं बाळगून आपल्या कार्याला संकुचित स्वरूप देतात. आणि याच कारणानें जगांतील प्रत्येक देशांत धार्मिक वृथाभिमानाची स्थापना होऊन त्यानें मनुष्यांना आपसांत एक दुसऱ्याचें कट्टे शत्रु बनविलें. जेथें धर्म एकाला दुसऱ्याशीं लढण्याला प्रवृत्त करतो तेथें संकोचित धार्मिक बुद्धीची संकोचवृत्ति नाहींशी करून जातीला एकात्मतेच्या भावनेनें एकरूपता आणणें हीच राजनीति आहे.

जेथें धर्माची संकुचित वृत्ति नाहीं आणि जेथें जातीचे अस्तित्वाचा पाया राजनीतीवर रचलेला आहे अशी जाती, जगांतील सर्व जातीमध्यें एक ' हिंदु ' हीच आहे. " हिंदु " हा शब्दच मुळीं धार्मिक अर्थाचा बोधक नसून राजनैतिक अर्थाचा बोधक आहे. हिंदु शब्दाचा अर्थ ते लोक कीं जे या आमच्या भारतवर्षाचे नैसर्गिक स्वामी आहेत. इस्लाम् वा इसाई धर्म आपले दृष्टीपुढें ठेवून जे लोक ' हिंदु शब्दाचा अर्थ धुंडूं पाहतात ते चूक करतात. हिंदु जातीचा पहिल्यानेंहि कोणता एक असा विशिष्ट धर्म नव्हता किंवा आतांहि पण नाहीं. मतांच्या दृष्टीनें जैनामध्यें ईश्वराचें अस्तित्व न मानणाऱ्यापासून तों वेदांत्याप्रमाणें सर्वच ब्रह्म मानणाऱ्यापर्यंत ( या टोंकापासून तों त्या टोंकापर्यंतच्या सर्वमतवाल्यासह ) सर्वांचा समावेश हिंदूंमध्यें होतो. ज्या नियमांना वा सिद्धांतांना हल्लीं अस्तित्वांत असलेले धर्म आपापल्या धर्माचा पाया समजतात त्या त्या नियमांना वा सिद्धांतांना हिंदू ' दर्शन ' ( शास्त्रें ) समजतात आणि स्वतंत्र विचार करण्याचा व पटेल तें मत स्वीकृत करण्याचा अधिकार देतात.

हिंदूंना दुसरे धर्माचे लोक थट्टेनें म्हणतात कीं हिंदू म्हणजे काय ? यांचा तर कांहीं ' एक ' असा धर्मच नाहीं. ! ! हें अगदीं सत्य आहे ( हिंदूमध्यें कोणतेंहि विशिष्ट असें एकच मत नाहीं. सर्व मतांचा, सर्व सिद्धांतांचा सर्व संग्राहकरूपानें झालेला समवाय हा त्यांचा धर्म होय. त्यांना, हिंदूचा धर्मसिद्धांत कोणता, हा प्रश्न अगदीं अनाठायीं होईल. ते एकदेशी वा संकोचित वृत्तीचे नाहींत. अगदीं सामान्य बुद्धीच्या मनुष्याला आकलन होतील अशा सिद्धांतांपासून तों असामान्य व अद्वितीय बुद्धीच्या व सामर्थ्याच्याच मनुष्याला आकलन होणें शक्य असणाऱ्या उदात्ततम महान्सिद्धांतापर्यंत सर्व सिद्धांतांचा यथाक्रम व यथायोग्य संग्रह करणारी महान् बुद्धिशाली अशी हिंदू जाति आहे. जगांतील यच्चयावत् सर्व धर्मांमध्यें दिसणाऱ्या सिद्धांतांचा समावेश पूर्वींच यांत झालेला असून इतर कोणालाहि आकलन न झालेले असे महत्तम सिद्धांत आपल्या बुद्धिसाम्राज्यांत सांठविणारी हिंदू जाति हा एक महान् व विशाल प्रदेशव्यापी असा वटवृक्ष आहे. इतर सर्व धर्म, धर्मपंथ, मतें व मतांतरें हीं या दिव्य हिंदूजातिरूप वटवृक्षाच्या फांद्या, पारंब्या, व डहाळ्या आहेत. ) हिंदू जातीला या गोष्टीचा अभिमान व भूषण वाटलें पाहिजे कीं, याचें मस्तक ( शाखाग्राही, संकोचित, व एकदेशी ) धार्मिक सिद्धांतांच्या कैदेंत न पडतां उन्नत होऊन राहिलेलें आहे. आपणच बनविलेल्या कांहीं नियमांना व सिद्धांतांना एकमेव सत्य मानून त्यासाठीं लढाया मारण्याला तयार होणें हें केवळ अज्ञानाचें काम आहे असें त्यांना वाटतें. अशा संकोचित अर्थाचा धर्म केवळ अज्ञानी लोकांचा होऊं शकतो. हिंदूमध्यें अज्ञानी वा मूढ लोकांनाहि जागा आहे. हिंदू जाती मातेसारखी मनुष्यजातींतील सर्व श्रेणींच्या मनुष्यांना आपल्या कृपेची छाया विश्रांतीसाठीं द्यावयाला तयार आहे. ते इच्छितील तर वाटेल त्या देवतांचें आराधन करोत, वाटेल तर त्यांच्या मूर्तीचें पूजन करोत. जोपर्यंत त्यांच्यांत अज्ञान आहे तोंपर्यंत या गोष्टी त्यांना लाभदायी होतील; परंतु जेव्हां ते अज्ञतेपासून मुक्त होतील तेव्हां या गोष्टींच्या पलीकडे ते निघून जातील. व ज्ञानाची परिसीमा गांठतील हें हिंदूजाति पूर्णतः जाणून आहे.

त्यासाठीं असें म्हणतां येईल कीं, एका दृष्टीनें हिंदु–धर्म एक तऱ्हेची राजनीतिच आहे. राम आणि कृष्ण यांचें जीवन–ज्यांना आम्ही हिंदू

अवतार समजतों त्यांचें जीवन—एक राजनैतिक जीवनच होतें. राम आणि कृष्ण यांना हिंदू ईश्वर—पदाधिष्टित करून त्यांचें पूजन करतात; परंतु रामानें वा कृष्णानें कोणत्या एका विशिष्ट मताची स्थापना केली नाहीं. त्यांचें ईश्वरत्व त्यांच्या कर्मात्मक जीवनांतच होतें. ज्यांना हिंदू लोक ईश्वराच्या जवळ जवळ पूज्य मानतात, त्या प्राचीन कालच्या ब्राह्मणांचा (ऋषींचा—यांत ब्राह्मण, क्षत्रिय, वगैरेंमध्यें झालेल्या ब्रह्मज्ञांचा समावेश होतो. ब्राह्मण म्हणजे ब्रह्म जाणणारा या अर्थानें ब्राह्मण शब्दाचा येथें अर्थ समजावयाचा.) कोणत्या तरी धर्ममतावर वा समजुतीवर विश्वास हा धर्म नसून विद्या (ज्ञान) व त्याग हा त्यांचा धर्म होता. प्राचीनकालीन हिंदूमध्यें वेदीवर (व्याख्यानपीठावर) उभे राहून मूर्तिपूजा खंडनादिक व्यर्थ मतवेडावरच्या अप्रस्तुत गोष्टीमध्येंच आपली शक्ति व्यर्थ दवडणारे क्षत्रिय नव्हते तर आपल्या आयुष्यभर आपल्या क्षत्रियधर्मांचे श्रीशिवराय, महाराणा प्रताप वा वीरवैरागीप्रमाणें खऱ्या क्षत्रियधर्मांचें पालन करणारे खरे क्षत्रिय होते. आजकालचे सुधारक क्षत्रिय आणि ब्राह्मण धर्मांवर वादविवाद माजवून एकाला खरा व दुसऱ्यांना खोटा ठरविण्यांतच आर्यधर्मांचे पुनरुज्जीवन समजून राहिले आहेत वेदशास्त्रप्रतिपादित धर्मांच्या केवळ पाठानें किंवा त्यांच्या व्याख्यानपीठावरून व्याख्यानरूपानें वर्णन करण्यानें देशांत खरे ब्राह्मण वा क्षत्रिय इत्यादि निर्माण केले जात नाहींत हें या हल्लींच्या ब्राह्मण क्षत्रिय वगैरे दिशाभूल झालेल्या भोळया लोकांच्या लक्षांत येत नाहीं. प्राचीन धर्मांच्या खऱ्या पुनरुज्जीवनांचा अर्थ देशांत खरे ब्राह्मण व क्षत्रिय उत्पन्न करणें हा आहे. ( केवळ त्यांच्या कर्तव्याकर्तव्यावर वा धर्माधर्मावर गप्पा झोडणें नव्हे.) जे लोक राजनैतिक कार्यांना भिऊन आपणांला धार्मिक व्यक्ति दर्शवीत स्वतःचा प्राण वांचवूं पहातात, त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, इसाई, मुसलमान किंवा शिखांप्रमाणें कोणचा तरी नवा धर्मपंथ उत्पन्न करण्याचा प्रयत्न ते करीत आहेत, या देशाच्या प्राचीन धर्माला पुनरुज्जीवित करण्याचें कार्य त्यांच्या हातून घडत नाहीं.

राजनीति या संकोचित धर्मकल्पनेच्या सर्वथा विरुद्ध आहे. राजनीति हा हिंदुधर्माचा एक फार मोठा भाग आहे. आणि याचमुळें हिंदू संकुचित धर्मकल्पनेच्या कक्षेबाहेर राहून स्वभावतःच समस्त देशाच्या हितामध्यें प्रयत्नशील राहिले आहेत. गुरूंच्या आंदोलनानें या देशाचें पुष्कळसें हित केलें

आहे तरीपण धर्मपंथासारख्या संकोचित स्वरूपाचे कल्पनेच्या एकदेशी-यत्वाच्या तावडींत सांपडून वैरागीशीं विरोध करावयाला शिख लोक तयार झाले. वैरागी खरा हिंदू होता. संकोचित धर्मकल्पनेच्या कक्षेच्या पलीकडे तो होता. मतमतांतरें व संप्रदाय यांच्या संकोचित क्षेत्रांतून लोकांना काढून तो त्यांची एक जाति निर्माण करूं इच्छित होता. धार्मिक पक्षपात व संकोचित वृत्ति यांच्या विरुद्ध त्यानें युद्ध केलें; परंतु विजय प्राप्त झाल्यावर त्याच्या साक्षीदारांचे मनांत धार्मिक संकोच—भावानें आपलें ठाणें दिलें. आणि वस्तुस्थिति पुन्हां जशीची तशीच होऊन राहिली. जर या देशांतील लोक धर्माला इहपरलोकांसाठीं आपलें व्यक्तिगत साधन समजतील, प्रत्येकाला या धर्मसाधनांतून आपणा स्वतःसाठीं पटेल तें साधन स्वीकारण्याची पूर्ण स्वतंत्रता देतील आणि सर्व देशाच्या ( सामुदायिक ) कल्याणासाठीं सर्व लोक राजनीतिच आपला ( सामुदायिक ) धर्म आहे हें लक्षांत घेतील तर तोच काय तो एक देशाच्या उन्नतीला कारणीभूत उपाय ठरेल.

# १२ शाही कूटनीतीची सफलता.

फरुकशीयर राज्यावर येतांच शिखांच्या विरुद्ध मुसलमानांच्या तक्रारी जाऊन पोंचूं लागल्या. त्यानें लाहोरच्या सुभ्याला शिख लोकांना तंबी पोंचविण्याचा आदेश दिला, सुभ्यानें सरहिंद-जवळ शिख एकत्र होत होते त्यांचेवर जाऊन चढाई केली, आणि त्यांना पराजित केलें. इतक्यांत वैरागी येऊन पोंचला आणि त्यानें नवाबी सेनेवर खूप शर्तीनें तरवार चालविली. रक्ताचे पाट वाहविले. शाहीसेनेची दाणादाण झाली. परत येतांना कित्येक ठिकाणीं मुसलमानी सेनेवर त्यानें विजय मिळविले आणि गुरुदासपुरमध्यें येऊन डेरा दिला.

लाहोरच्या सुभ्याकडून वैरागीवर मात होणें अशक्य आहे हें फरुकशी-यरच्या ध्यानांत आलें. त्यानें मंत्रिमंडळाशीं विचारविनिमय केला. कांहीं तरी दुसरा उपाय शोधला पाहिजे हें विचारांतीं ठरविण्यांत आलें. पुष्कळ दिवसांपासून गुरु गोविंदसिंहाच्या दोन स्त्रिया—माता सुंदरी व साहेबदेवी—या दिल्लींत रहात होत्या. बादशहानें त्यांच्याद्वारा आपला मतलब साधावयाचा असें ठरविलें. बादशहानें हिंदुमंत्री रामदयाळबरोबर मातासुंदरीसाठीं नजराणे देऊन निरोप पाठविला कीं, “आमचा वंशही गुरूचा आहे. गुरु नानकानें आमच्या वंशाला बादशाहीचा वर दिला होता, वैरागी प्रजेवर निष्कारण अत्याचार करून राहिला आहे. यानें सर्व देशाला त्रस्त करून सोडलें आहे. त्याला पत्र लिहून या अनुचित कार्यापासून दूर रहाण्याविषयीं तुम्ही आज्ञा द्यावी, बादशहा शिखांना जहागीरी देण्याला तयार आहे.” बाद-शाहा दंडनीतीमध्यें सफलता मिळवूं शकला नाहीं; तेव्हां त्यानें साम व दान नीतीचा अवलंब केला.

स्त्रियांवर मंत्र्याचा डाव लागूं झाला. मातेच्या जवळ प्रसिद्ध भाई मान-सिंह व सदकीसिंह रहात होते. त्यांनीं बादशहाच्या कपटाच्या जाळ्यांत न सांपडण्याविषयीं त्यांना पुष्कळ प्रकारें सांगितलें. वैरागीला पत्र न लिहि-

ण्याविषयींहि विनविलें. शिवाय तो गुरूंचा शिष्यहि नाहीं व त्याचेवर आपला कांहीं जोरहि नाहीं असा युक्तिवादसुद्धां केला. परंतु स्त्रीहट्ट प्रसिद्धच आहे. मातेनें बादशहाच्या इच्छेनुसार वैरागीला पुढील प्रमाणें पत्र लिहिलें. "तुम्ही गुरुंचे खरे शिष्य आहांत हें सिद्ध झालें आहे. तुम्ही पंथाची फार मोठी सेवा केली आहे. त्याला बुडण्यापासून वांचविला आहे. परंतु आतां बादशहा जहागीरी द्यावयाला तयार आहे. तेव्हां जहागीरीचा स्वीकार करा. आमचे म्हणणें ऐका व लूटमार बंद करा!"

वैरागीनें पत्र वाचलें. वाचतांच त्याचा चेहरा लाल झाला. त्याचवेळीं त्यानें दरबार भरविला व तें पत्र वाचून दाखवून म्हणला—"स्त्रियांचे बुद्धीला त्यांच्या पायाजवळचेंच दिसत असतें. मातेनें हें असें पत्र लिहिलें आहे, तुर्कांच्या कपटजालाला ही काय जाणूं शकणार ?" थोड्या क्रोधानें वैरागीनें पत्राचें उत्तर लिहिलें कीं:—"असें पत्र आपण मला लिहिणें व्यर्थ आहे, माझ्यावर आपला काय अधिकार आहे ? आपण शिख आहांत; मी एक वैरागी साधू आहें. मी गुरूंचा कधींहि शिष्य नव्हतों. गुरु गोविंदसिंह मला भेटले होते ही गोष्ट खरी. एकवेळां त्यांनीं मला माझ्या पुत्राचा बदला घे असें म्हटलें होतें. मी आपल्या तरवारीच्या आणि धनुष्यबाणाच्या बळावर हा इतका प्रदेश जिंकला आहे. आणि यांच्याच बलावर मी लाहोर व दिल्ली जिंकीन. मी कोणाची जहागीरहि घेऊं इच्छित नाहीं व कोणाचा उपकारहि मानित नाहीं. तुम्ही मला मुसलमानांच्या स्वाधीन करूं इच्छित आहांत. आपण विसराल परंतु माझे हृदयांत जोपर्यंत गुरुपुत्रांची स्मृति जागृत आहे, तोंपर्यंत मी आपल्या निश्चयापासून रतिभर चळणार नाहीं."

पहा देशाचें दैव ! कुठें येऊन कमान तुटली ! एक स्त्री कैकयी तिनें श्रीरामाला राज्याला मुकविलें आणि वनवास घडविला. मराठ्यांच्या ऐन भरांत आलेल्या साम्राज्याला एक स्त्री आनंदीबाई इच्या ईर्ष्येनें नष्ट करून टाकलें. या कथा पुष्कळ बोधप्रद आहेत. पहिला बाजीराव महाराष्ट्रांत एक महापुरुष होऊन गेला. त्यानें मराठी साम्राज्याला नवें रूप देण्याचें मोठें कार्य केलें. सारी राज्यशक्ति याच्या हातांत आली. याचे बाळाजी व राघोबा हे दोघे पुत्र होते. बाळाजीच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र माधवराव पेशवा झाला. गुरूंच्या मालिकेंत हरगोविंदला जी योग्यता आहे तशीच पेशव्यांच्या मालिकेंत माधवरावाची योग्यता आहे. माधवराव केवळ दहा

वर्षें राज्यावर येऊन झालीं नाहींत तोंच क्षयरोगानें वारले हें महाराष्ट्राचें दुर्भाग्य होय. माधवरावाच्या मृत्यूनंतर त्यांचें धाकटे भाऊ नारायणराव यांना पेशवापद प्राप्त झालें. आनंदीबाई—राघोबाची स्त्री—याबद्दल मनांत जळूं लागली. तिला वाटलें कीं, नारायणराव चौथ्या पेशव्याचा भाऊ आहे आणि राघोबा—तिचा—पति—तिसरे पेशव्याचा भाऊ आहे म्हणून राज्यपदावर त्याचा अधिकार आहे. कांहीं सैनिकांबरोबर संगनमत करून तिनें राजभवनांत नारायणरावाचा खून करविला. राघोबाला या गुप्तकटाची माहिती नव्हती. परंतु त्या हत्याकांडाचेवेळीं तो तेथेंच होता. नारायणरावानें धांवत जाऊन त्याचें वस्त्र धरलें आणि म्हणाला " काका, मला ह्या मारेकऱ्यापासून सोडीव. " राघोबा वस्त्र सोडवून पळून गेला आणि घातक्यांनीं पेशव्याला कापून टाकला. आतां राघोबानें गादी हातांत घेण्याची इच्छा केली. मंत्रिमंडळानें त्याची आज्ञा मानण्याचा नकार केला आणि पेशव्याची गर्भवती पत्नी—गंगाबाई—यांचा पक्ष घेतला. राघोबानें मुंबईच्या इंग्रेजापाशीं सहायप्रार्थना केली. आणि मराठीसाम्राज्याच्या नाशाचें बीज पेरलें. इंग्रेज आणि मराठे यांच्या युद्धाला येथून आरंभ झाला.

पंजाबची ' जिन्दा ' इनें महाराजा रणजितसिंहाचे पश्चात् त्याच्या राज्याशीं असेंच वर्तन केलें. येथें या गोष्टींचें वर्णन करणें अनावश्यक वाटतें. या कथनाचा हेतु हाच कीं, स्त्रियांच्या हस्तक्षेपानें आमच्या नाशांत किती भाग घेतला आहे हें समजावें; आणि आम्हीं लोक व्यक्तिगत संबंधाची सार्वजनिक जीवनांत अवास्तव व अयोग्य भीड धरतों व त्यापासून किती भयंकर परिणाम होतात हें आमच्या लक्षांत यावें. पत्र खुद्द गुरु गोविंदसिंहाच्या पत्नीनें लिहिलें हें खरें धरलें तरी पण राजनैतिक कार्याकार्याच्या विचारणेंत शिखांनीं त्यांच्या गुरूंच्या स्त्रियांना गुरु—प्रतिनिधिरूप मानणें हें काय उचित व हितकर होतें ? काय त्यांची बुद्धि गुरूप्रमाणें सर्वदर्शी म्हणून हितकर व माननीय होती. ? त्यावेळच्या शिखांचा यांत कांहीं मोठासा दोष नाहीं. आम्हीं सर्वजण आपापल्या व्यक्तिगत जीवनाचे इतके ताबेदार झालेले असतों कीं सार्वजनिक जीवन व त्या वैयक्तिक गोष्टी यांच्यांतील तारतम्य जाणण्याची दृष्टीच आम्हांत नसते. आमचें खाजगी व घरगुती मनोमालिन्य एकमेकांत असतें आणि आम्ही सार्वजनिक व सामाजिक जीवनांतहि त्याचा संबंध आणून सार्वजनिक अहित—जाणून

वा न जाणून—करण्याला कारणीभूत होतों. आम्ही वैयक्तिक व सार्वजनिक जीवन पृथक् पृथक् करूं शकत नाहीं. आम्ही व्यक्तिगत गुणांवर इतका भर देतों व ते इतके अवश्यक समजतों कीं, आमच्यांत सार्वजनिक जीवनोपयोगी गुण उत्पन्न होण्यालाच कठिण पडतें ( कारण यांकडे थोडेंहि लक्ष नाहीं. ) एखादा मनुष्य कितीहि सर्वप्रिय, सरळ, कुलीन आणि उदार परंतु देश व जातिविषयक कल्पनारहित आहे तर त्या मनुष्यापेक्षां सर्वप्रियता वगैरे वैयक्तिक गुणांनीं रहित असून सुद्धां जर देशभक्त व जातिप्रेमी असा दुसरा एखादा मनुष्य असेल तर हा दुसरा मनुष्य त्या पहिल्या मनुष्यापेक्षां किती तरी पटीनें देशाला व जातीला निश्चयानें उपयोगी आहे; ही गोष्ट आम्हांला जेव्हां कळेल तेव्हां आम्हांमध्यें सार्वजनिक जीवनोपयोगी सद्गुण उत्पन्न होऊं लागतील. ज्या मनुष्याची प्रवृत्ति, विचार व कार्य देशहितविरोधी आहे. तो स्वतः कितीहि सरळस्वभावी, साधा व त्यागी असो, तो खरा नागरिक कधींहि होऊं शकणार नाहीं. या कथनाचा असा अभिप्राय नाहीं कीं व्यक्तिगत गुणांची सार्वजनिक गुणांना अवश्यकता नाहीं. किंबहुना ( शुद्ध व दिव्य ) सार्वजनिक जीवन वैयक्तिक सद्गुणांच्या पायाशिवाय उत्पन्न होऊं शकत नाहीं व असल्यास कायम राहूं शकत नाहीं.

बादशहाचे मंत्री आपलें काम करीत राहिले होते. वैरागीच्या उत्तरानें त्यांना समजून चुकलें कीं, सामनीतीनें आपलें कार्य होत नाहीं. आतां भेदनीति शिलक राहिली होती आणि तिच्याकरितां मसालाहि तयार होताच. दोन्ही मातांनीं वैरागीचें उत्तर अपमानकारक मानलें. आगीवर तेल ओतणारे जवळच होते. बादशहाकडून दोन्ही मातांचा आदर होऊं लागला आणि दोघीजणी त्या कपटजालांत अडकल्या. वैरागीचे सर्व उपकार त्या विसरून गेल्या. शिख सरदार व पंथ यांना पत्र लिहून त्यांनीं कळविलें कीं आपणांत जो कोणी गुरु गोविंदसिंहाचा शिख असेल त्यानें त्या वैरागीची साथ करूं नये. कारण तो स्वतःला शिख म्हणवीत नाहीं.

या आदेशानें पंथांत खळबळ उत्पन्न केली. या पत्रानें विषबीजाचें कार्य केलें. पंथाकडून मातांकडे पत्र लिहिलें गेलें कीं:—“ आम्हीं वैरागीला गुरु बनवून आपणां स्वतःला विकून घेतलें होतें. आतां आम्ही त्याची साथ सोडून देतों. परंतु आम्हीं आतां आमचा नेता पुढारी कोणाला करावें हें

तुम्हीं आम्हांला सांगा. जर आम्ही युद्ध सोडून घरीं जाऊं तर संसारांत फसूं व युद्धाचा विसर पडेल. मग आपले राज्याचें कसें होईल ? " यावर उत्तर आलें कीं " गुरूला सदोदित सह–वासी ( सतत बरोबर राहणारा ) समजा व ग्रंथसाहेब तुमचा पुढारी आहे. वैरागीसमोर आपलें शीर कधीं झुकवूं नका. " आज्ञा फार कडक होती व तिचा प्रभावहि तसाच पडला.

संवत् १७७३ मधील वैशाखीच्या ( शके १६३९ ) मेळ्याचा दिवस हा अमृतसरमध्यें मोठा अशुभ दिवस झाला. पुष्कळसे शिख एकत्र झाले. वैरागीहि मोठ्या थाटमाटानें आला. डोक्यावर कलगी लावलेली होती, वर छत्र झुलत होतें. आल्याबरोबर राजसभेच्या मुख्य स्थानावर जाऊन बसला. मातांच्या पत्राचा परिणाम होऊन चुकला होता. याच्या विरुद्ध एक पक्ष तयार झाला होता व तो आपणाला तत्खालसा ( तत् म्हणजे तो ( गुरूचा ) खालसा याचा–वैरागीचा–नाहीं ) म्हणवूं लागला. वैरागीचा विश्वस्त सरदार विनोदसिंह यांचा नेता होता. वीर स्थानापन्न होतांच त्याला क्रोध आला. बाबा विनोदसिंह व कहानसिंह यांनीं त्याला बाहू पकडून उठवून दिला. त्याचवेळीं गलबला झाला. आरोळी झाली–" जो गुरूचा शिख असेल त्यानें याचेपासून दूर हटावें ! तत्खालसा पृथक् झाला. पुष्कळसे शिख विरुद्ध झाले व वैरागीचे शत्रु बनले. कांहीं शिखांनीं याचें सामान लुटण्यास आरंभ केला. त्यावेळीं वैरागीनें एक पंजाबी म्हण आहे ती म्हटली " बिल्ली शेर पढाया, शेर बिल्लीनूं खाण आया " ( मांजरानें वाघाला शिकवण दिली व वाघ मांजरालाच खायला उठला. )

फूट व फितूर हा या देशाचा एक महान् रोग आहे. बादशहा ही वार्ता ऐकून फार प्रसन्न झाला. जें कार्य लाखों मनुष्यांचा बली देऊन होऊं शकलें नाहीं तें या एका लहान चलाखीच्या चालीनें पार पडलेलें दिसूं लागलें. मुसलमानांच्या घरांतून आनंद मानला जाऊं लागला. वैरागीनें हिम्मत सोडली नाहीं. अजूनपर्यंत सर्व राजकाज यानें शिखांवरच सोंपविलें होतें. आतां त्याला साधारण हिंदूंची आवश्यकता भासूं लागली. त्यानें आपल्या पद्धतींत फरक केला. पाहिल्यानें तर त्यानें जाहिर केलें कीं, मी कलीमध्यें ' निष्कलंकी अवतार ' झालेला आहें. दुसरी गोष्ट युद्धध्वनि ( रणगर्जना ) " जयधर्मकी " हा बनविला. आणि असें जाहिर केलें कीं, मी देशामध्यें चक्रवर्ती राज्य स्थापन करणार आहें.

वैरागी अगदीं एकटा होता. केवळ थोडेसे शिख त्याचेबरोबर होते. परंतु हिंदूंनीं त्याची साथ सोडली नाहीं. आपल्या शिष्यांतूनच भरती करण्याला आरंभ करून थोड्याच दिवसांत त्यानें एक सेना तयार केली.

इकडे बादशहानें पाहिलें कीं, हा अवसर फार छान आहे. वैरागी आतां निर्बलतेच्या अवस्थेंत आहे. लागलेंच दिल्लीहून सैन्य रवाना केलें. ही सेना मोठ्या तडफेनें नैनाकोटपर्यंत येऊन थबकली. येथें वैरागीची सेना निकराच्या लढाईसाठीं उभी होती. शाहीसेनेनें 'अल्ला हो अकबर'ची घोषणा करून हल्ला केला. परंतु हिंदूंनीं 'जयधर्म' ही आरोळी देऊन आकाश दुमदुमवून सोडलें. रणशिंगें ( युद्धवाद्य ) फुंकलीं जाऊं लागलीं. शंखध्वनीनें कानठाळ्या बसूं लागल्या. जे कालपर्यंत दुकानदारी करीत होते ते तरुण शाहीसेनेशीं आज शर्थीनें टक्कर देत घेत होते. प्रेतांचे ढीग लागले. शाहीसेना आपल्या मनोराज्यांतच गर्क होती. प्रत्यक्ष वैरागीलाच पकडून आणूं ही त्यांची घमेंड, परंतु येथें खडकाशींच डोकें आपटून घ्यावें लागलें. अखेर शाही सेनेचे पाय उखडले आणि आपल्या जाया झालेल्या लोकांना टाकून देऊन आणि लढाईचें सामान तेथेंच सोडून त्या सेनेनें पळ काढला. लाहोरचा सुभा अलमखांचें सहाय्य घेऊन आला. वैरागीनें त्याचा बटाला-जवळ पराजय केला. तत्खालसानें त्याचा साथ सोडून देऊन त्याला निर्बल बनविल्यावरसुद्धां वैरागीची ही वीरता व हा पराक्रम पाहून बादशहाच्या आश्चर्याला सीमा राहिली नाहीं. तो आपल्या मंत्र्याबरोबर या गोष्टीची पुन्हां चर्चा करूं लागला. परंतु या आपसांतील फुटीपासून वैरागीचें बल कमी झालें व शिख आणि हिंदू यांच्यांत दुजाभाव उत्पन्न होऊन शिखांच्या पृथक्पणाला यावेळेपासून विशेष स्वरूप आलें.

या घटनेपासून आम्हीं एक मोठी शिकवण घेतली पाहिजे. थोडीशी धार्मिक विभिन्नता देशाच्या एकरूपतेंत कितीतरी प्रत्यवाय उत्पन्न करूं शकते. मनुष्याचा मेंदू एक पेचदार यंत्र आहे. कांहीं विशेष संधीला जर एखाद्या नव्या गोष्टीनें त्यावर परिणाम झाला तर तो नवीन परिणाम जुन्या सर्व संस्कारांना दाबून टाकूं शकतो. जर एखादेवेळीं मनुष्य क्रोधवश झाला तर त्यावेळीं तो मनुष्य धर्माधर्माचे नियम व जुनेपुराणे संबंध पार विसरून जातो. जेव्हां मनुष्याचे मनावर कामाचा प्रभाव पडतो तेव्हां त्याला समाजाचें वा संबंधीयांचें भय वा लज्जा नाहींशी होऊन कार्याकार्याचा विचार

पार मावळून जातो. धर्म आणि राजनीति यांच्या सिद्धांतांची अशी सरमिसळ होऊन जाते कीं एकाची दुसऱ्यापासून भिन्नता ओळखणें दुरापास्त होऊन बसतें. इस्लामधर्मांत धर्म व राजनीति या दोन्हींची विभिन्नता न समजतां दोन्हीहि एकरूपच मानलीं जातात. हिंदूंमध्यें धर्माचें कांहीं भिन्न अस्तित्व नाहीं. त्याचें स्थान धर्म ( कर्तव्यकर्म ) घेतो. क्षात्रधर्म हीच राजनीति बनते आणि मनुष्याच्या इतर साधारण धर्माला ( कर्तव्यकर्माला ) धर्म (Religion) नांव दिलें जातें. अत्याचाराला दूर करून ( अत्याचाऱ्याला शिक्षा लावणें व त्याचेकडून होणाऱ्या अत्याचारापासून ) निर्बलाला सहाय करणें आणि त्याचें रक्षण करणें हा सर्वांत मोठा धर्म आहे, आणि सर्वांत मोठें राजनैतिक कर्तव्य आहे.

गुरूनीं आपलें कार्य धार्मिक स्वरूपांत सुरू केलें. त्यांच्या धर्माची उन्नति इस्लाम धर्माला विरोधी होती. इस्लाम एक राजशक्ति होती. या राजशक्तीची घमेंड तोडण्यासाठीं आणि धार्मिक स्वतंत्रतेचें आंदोलन यशस्वी करण्यासाठीं गुरूनीं महान् स्वार्थत्याग केला आणि अखेर प्रजापीडकांच्या राजशक्तीला नष्ट करण्याचा निश्चय केला. हें साध्य सिद्ध होण्याची अगदीं वेळ आली होती तोंच आमच्या दुर्दैवानें एक किरकोळ पंथाभिमानाची अडचण उभी केली गेली. जोंपर्यंत वैरागी शिख पंथाच्या नियमानुसार अमृत चाखून विधिपूर्वक शिख होणार नाहीं तोंपर्यंत त्याची साथ कोणी करूं नये हें वेड शिखांत पसरलें. जणूं काय हिंदुस्थानांतील इतर हिंदू मेले वा नष्ट झाले तर त्यांत शिखांचें कांहींच नुकसान नाहीं. हाताच्या एका बोटानें सर्व देहाला बळी देऊन आपलें एकट्याचेंच अस्तित्व ठेवण्याचा मूर्खत्वानें केलेला आत्मघातकी प्रयत्न आणि शिखांनीं हिंदूंच्या अस्तित्वाची वा सुरक्षिततेची पर्वा न करतां किंबहुना एका तऱ्हेनें त्यांच्या नाशाला कारणीभूत होण्याचा केलेला प्रयत्न हे दोन्हीहि सारखेच बुद्धिभ्रष्टतेचे व आत्मनाशाचे होत. समाजांतील कोणत्याहि एका वर्गांत सर्व समाजाचें सामुदायिक अस्तित्व, सुरक्षितता आणि सुस्थिति यांच्या विचाराला तिलांजलि देऊन आपल्या एकट्या वर्गाच्याच विचारांत निमग्न राहणें हें सर्वस्वी आत्मघातकी आहे हें हिंदूसमाजाच्या—त्यांतील सर्व वर्गांच्या—मनांत जोंपर्यंत बिंबणार नाहीं तोंपर्यंत त्या समाजाचें नष्टचर्य खास संपणार नाहीं. जर हिंदू समाजाला पुन्हां सर्व जगांत उन्नतीच्या शिरोभागीं विरा-

जमान व्हावयाचें असेल तर त्यांतील सर्व वर्गानें हा एकलकोंडी तुसडेपणा व कूपमंडूक वृत्ति सोडून आपली विचारदृष्टि सर्वसमाजव्यापी करावयाला शिकलें पाहिजे. (तो सुदिन आम्ही कधीं आणणार ?) यावेळीं वैरागीनें, स्वतःची इच्छा श्रद्धा असो वा नसो एका महत्कार्याच्या सिद्धीसाठीं अमृत चाखण्याला हरकत नव्हती. थोड्याशा गैर गोष्टींनीं अगदीं घडत आलेल्या कार्याचा विघात झाला. परंतु दोष कोणाचा ? या देशांत लोकांची बुद्धिच विपर्यस्त वृत्तीनें कार्य करते. स्वतंत्रता आणि समता ही मनुष्यांत जातीय जीवनाचें मूळ आहे. या गोष्टींपुढें इतर बाबतींतील विभिन्नतेचें कांहीं महत्व नाहीं. या विभिन्नतेच्या बाबतींत प्रत्येकजण आपल्याला तेवढा ठीक मानून बाकी इतरांना चुकलेले मानतो. यांत कांहीं कोणाचा फायदाहि नाहीं वा तोटाहि नाहीं. पण जेव्हां या मतविभिन्नतेच्या कारणानें समाजाचा जो अति पवित्र नियम—मनुष्याची स्वतंत्रता—तिला ते पायाखालीं तुडवितात तेव्हां देशघाताच्या महान् दोषाला पात्र होतात. आणि समाजाबरोबरच आपणांलाहि (इच्छा व प्र.त्न नसतांहि ) नष्ट करून घेतात. कोणीहि स्वतः धार्मिक दृष्टया कितीहि उच्चवृत्तिचा असला तरी कोणत्याहि कारणानें देशाची हानि करणाऱ्या व त्या देशाला धोका देणाऱ्या मनुष्याचा तो अपराध अक्षम्य आहे.

ग्रं. क्र. २४५०

# १३ तत्त्वालसाशीं बादशहानें केलेल्या शर्ती.

मंत्र्यांनीं बादशहाला अशी सल्ला दिली कीं, तो एकटा भुजंगाला ( वैरागीला ) मारूं शकत नाहीं. तत्वालसाला जेव्हां आपण आपल्या पक्षाला मिळवून घेऊं तेव्हांच वैरागीची शक्ति नष्ट करूं शकूं. सापाला सापाशीं लढविणें हेंच इष्ट आहे ( पाहुण्याकडून साप मारतांना त्यांत अनिष्टाचा परस्पर नाश होऊं शकतो व आपलें काम होतें. ) हिऱ्यामध्यें हिऱ्याच्याच साह्यानें छेद पाडतां येतो. विषाला विषाशिवाय उतार नाहीं. त्याचबरोबर त्याचेकडून बादशहाला हेंहि सुचविलें गेलें कीं, " बादशहानें खालसाकडे आपला वकील पाठविला पाहिजे, खालसा बुद्धिहीन आहे, सर्व कार्य सिद्ध होईल. "

बादशहाला ही गोष्ट पटली. त्यानें लागलीच पुढीलप्रमाणें चिठ्ठी लिहून खालसाकडे रवाना केली.—" खालसा ! माझ्याबरोबरचें वैर दूर करा (?) बाबर आणि बाबा एकच बात आहे. वैरागी सर्व फिसादीचें मूळ आहे. तो तर गादीवर बसूं पहात आहे. त्यानें माताजीचा ( गुरूंच्या पत्नीचा ) अपमान केला आहे. या विषवृक्षाला उपटून टाकला पाहिजे. तुम्ही अमृतसरमध्यें घरबसल्या दहा हजार ( रुपये की मोहरा ? कांहीं स्पष्ट नाहीं. सर्व मोघम. ) घेत जा आणि माझ्याशीं संधि करा ( तह करा ) " ! ! !

शिखांमध्यें वैरागीसंबंधीं पहिल्यानेंच घृणा उत्पन्न होऊन चुकली होती. पत्र मिळतांच ते संधि करावयाला तयार झाले. वैरागीचे एकदां विरोधी बनल्यावर याशिवाय त्यांना दुसरा मार्गच नव्हता. ( विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः—एकदां विवेकापासून मनुष्य भ्रष्ट झाला म्हणजे तो अवनतीच्या तळाला जाऊन पोंचलाच पाहिजे ) दाण्यांच्या लोभानें पक्षी जाळ्यांत सांपडले. शिख सरदारांनीं विषमिश्रित दुधाचा प्याला घेतला व खालीं लिहिलेल्या शर्ती कबूल केल्या.

( क ) शाही राज्यांत शिख कधींहि लूटमार करणार नाहींत.

( ख ) कोणीहि शिख वैरागीची साथ करणार नाहीं.

( ग ) जर कोणी शत्रु लाहोरावर चढाई करून आला तर लाहोरच्या अधिकाऱ्याला सहाय्य दिलें जाईल.

बादशहाकडून कबूल केल्या गेलेल्या शर्ती येणें प्रमाणें:—

( क ) कोणताहि बादशहा शिखांची जहागीर हिसकून घेणार नाहीं.

( ख ) कोणत्याहि हिंदूला जबरदस्तीनें मुसलमान बनविलें जाणार नाहीं.

( ग ) कोणीहि मुसलमान कोणत्याहि हिंदूच्या समक्ष गोवध करणार नाहीं.

हा संधि केवळ एक हातचलाखी होती, परंतु त्यायोगानें भोळे शिख बादशहाच्या या कृतीला भाळले. बादशहानें त्याच वेळीं कित्येक शिख सरदारांना माफी दिली आणि सरदार नानकासिंग, फतेहसिंग इत्यादींना लाहोरच्या सैन्यांत नोकरी देवविली.

बादशहाचा मतलब साधला—वैरागी सैन्याच्या विरुद्ध शिखांची ईर्ष्या आणि द्वेष यांची आग भडकूं लागली. दोन्ही एक दुसऱ्यापासून कायमचे विभक्त होऊन बसले. आणि एक दुसऱ्याला नष्ट करण्याला तयार होऊन राहिले.

बादशहाला इतकी सफलता कशी प्राप्त झाली असें वैरागीला आश्चर्य वाटत होतें. परंतु त्यानें प्रयत्नाची पराकाष्ठा करण्याचा निश्चय केला होता. हा प्रयत्न खुद्द लाहोर आपल्या अधिकारांत आणण्याचा होता. वर वर्णन केलेल्या परिस्थितींत अगदीं मोठ्यांत मोठ्या मनुष्याचें मन सुद्धां गोंधळून जावयाचें. एकतर तर कैक वर्षें वैरागी प्रांतिक मुसलमान अधिकारी आणि बादशहा यांच्या सेनेशीं लढत राहिला. पहिले जे सहाय्यक होते ते सर्व अलग होऊन तमाशा पहात राहिले; इतकेंच नाहीं तर ते एकवार असलेले मित्र आणि सहाय्यकच शत्रूला देखील जाऊन मिळाले !

ज्यांनीं आपलीं घरें सोडून रणभूमि आपल्या चरितार्थाचें साधन बनविलें अशा शिखलोकांत पुष्कळसे विश्वासघातकी होते. त्यांना युद्धाचा चांगलाच अनुभव मिळाल्यामुळें युद्ध म्हणजे त्यांचा एक खेळ होऊन बसला होता. यांच्या

सहाय्याशिवाय पंजाबच्या राजधानीवर—लाहोरवर—स्वारी करणें एक मोठ्याच साहसाचें काम होतें. परंतु अशा लोकांचा विरोध असूनसुद्धां लाहोरवर आक्रमण करण्याचा विचार केवल असाधारण मनुष्यच मनांत आणूं शकतो. वैरागी दृढनिश्चयी होता. तो आपल्या स्वीकृत व्रताच्या सिद्ध्यर्थ प्रयत्नांची परमावधि करण्याला तयार झाला. गुरुदासपुरमध्यें जितके साथीदार मिळाले तेवढे एकत्र करून लाहोरकडे मोर्चा वळविला आणि शालामार बागेजवळच्या बागबांपुरा नांवाच्या एका स्थलीं येऊन त्यानें आपली छावणी दिली. वैरागीच्या जीवनांतील हा एक मोठा नाजुक समय होता. त्याची भवितव्यता या स्थलांवरील परिणामांवर अवलंबून होती. यावेळीं जर वैरागीला सफलता मिळती तर त्याच्याशीं होणारा पंजाबामधील विरोध पार नाहींसा झाला असता. आणि पंजाबचा इतिहास किंवा एका दृष्टीनें भारतवर्षाचा इतिहास बिलकूल बदलून गेला असता. वैरागी यावेळीं कोणत्या विचारतरंगांत मग्न होता, हें कोणीहि सांगूं शकणार नाहीं. त्यानें देशविषयक जीवनमरणाच्या प्रश्नाला कायमचा निकालांत काढण्यासाठीं किती मोठ्या संकटाला टक्कर दिली ! ! जर लाहोरचा पहिल्यानेंच त्यानें निकाल लावला असता तर किती तरी चांगलें झालें असतें. ! ! ! पण या दुर्दैवी हिंदुस्थानांतील, देशाचा व जातीचा विघात करणाऱ्या राक्षसी नराधमांना फितुरीचे चाळे सुचतील व या दिव्य हिंदुजातींतील महापुरुषाच्या देशोद्धारार्थ होणाऱ्या अनेक वेळच्या भगीरथ प्रयत्नांनीं उभारल्या जाणाऱ्या भाग्यमंदिरावर ते दुष्ट विश्वासघाताच्या व देशद्रोहाच्या तेलानें भडकणारे जळजळीत निखारे पसरून ते मंदिर जाळून पार भस्म करून टाकतील हें त्या विचाऱ्यांना काय ठाऊक ? परमेश्वरा ! ! या दुष्ट देशद्रोही व फितुरीला सोकावलेल्या जातिभक्षक राक्षसांना या तुझ्या आवडत्या भारतवर्षांतून कधीं निर्बीज करून टाकशील? एवढी एक गोष्ट जर घडून आली तर या भारतवर्षावरील भाग्यसूर्य लवकर उदित होऊन पुन्हां कधींहि अस्ताला जाणार नाहीं ! !

वैरागीला हा समय महासंकटपूर्ण होता. परंतु भारतवर्षासाठीं तर तो याहूनही अधिक नाजुक होता. एका मनुष्याचें काय ? तो आपलें काम करतो. साफल्य होवो वा न होवो. त्याच्या जीवनाच्या अंताबरोबर ती सफलता वा विफलता एकसारखीच आहे. परंतु असे अवसर जातीच्या

जीवनांत क्वचितच येतात. ( ते आणूं म्हटल्यानें येत नाहींत. ) आणि असले प्रसंग एकतर जातीला उन्नतीच्या शिखरावर नेऊन बसवतात किंवा अवनतीच्या खोल अंधाऱ्या दरींत फेकून देतात. असल्या प्रसंगाचा प्रभाव जातीवरच कायमचा होऊन राहतो. वैरागीची सेना लाहोरच्या जवळ आहे ही कल्पना हृदयाला ( औत्सुक्यानें ) कंपायमान करते. पहिल्याप्रमाणें जर वैरागीला येथेंहि सफलता मिळाली असती तर...[ पण या तरचा काय उपयोग ? ]

अल्लमखां नांवाच्या लाहोरच्या सुभ्याजवळ दहा हजार फौज होती. परंतु तत्खालसानें सहाय्य करण्याची प्रतिज्ञा केली होती. सुभ्यानें त्यांना निरोप पाठवून बोलावून घेतलें. जवळ जवळ पांच हजार पर्यंत खालसा त्यांच्या मदतीस गेला. त्यांच्या सैनिकाला आठ आणे आणि हवालदाराला एक रुपया रोज वेतन होतें. बीरसिंग खालसा सैन्याचा नेता होता. सुभ्याच्या मुसलमान सेनेशीं तर वैरागीचे सैनिक वीरतापूर्वक लढले. मुसलमानांची प्रेतें त्यांच्या पायाखालीं तुडविलीं जाऊं लागलीं. हें पाहून सुभ्यानें खालसाला पुढें केला व आपण मागें झाला. हें पाहतांच वैरागीचे अंत–करणावर जबर आघात झाला. ज्या लोकांना बरोबर घेऊन कैक वर्षेंपर्यंत अनेक युद्धें केलीं त्याच आपल्या सहकारी लोकांवर तरवार चालविण्याची कल्पना देखील वैरागीच्या ( जातिप्रेमी ) अंतःकरणाला अगदीं असह्य झाली. वैरागीनें सैन्यासह पाय माग घेतला आणि तो गुरुदासपुरला परत येऊन पोचला.

या युद्धांत जरी वैरागीच्या तरवारीनें शत्रूंची पुष्कळ प्राणहानि झाली; तथापि या ( स्वजातीयांच्यामुळें उत्पन्न झालेल्या कृपेच्या मनोदौर्बल्यामुळें घडून आलेल्या) वैरागीच्या हार खाण्यानें देशाचे भाग्यांत फार मोठा पालट झाला. संवत् १७७५ ( शके १६४१ ) तील ही घटना भारतवर्षाच्या इतिहासांत ( शल्यासारखी बोचत राहणारी ) स्मरणीय अशी राहील. संवत् तर निघून गेला. परंतु युद्धाचा परिणाम मात्र चिरस्थाई झाला.

बादशहाला आपली जादू लागू पडली हें पाहून फार समाधान वाटलें. त्यानें तत्खालसाच्या शूरत्वाची व साहसाची फार प्रशंसा केली आणि मातांना पुष्कळसें धन दिलें.

## टीप.

"वैरागीनें सैन्यासह पाय मागें घेतला..."

[ पृष्ठ-१०४.

[* कर्तव्याकर्तव्याचा प्रश्न पुढें उभा राहिला असतां बुद्धीला भ्रम उत्पन्न होणें सामान्य मनुष्यांना तर स्वाभाविक आहेच, परंतु असामान्य पुरुषांना सुद्धां तो प्रश्न जितका अधिक गुंतागुंतीचा तितका अधिक भ्रमोत्पादक होतो, याचीं पुराणकालापासून तों अर्वाचीन कालापर्यंत अनेक उदाहरणें घडून आलेलीं आहेत, तीं याच देशांत आहेत असें नाहीं. जेथें जेथें मनुष्यजातीचा निवास होऊन मनुष्य कांहीं विशिष्ट श्रेणीच्या संस्कृतीपर्यंत पोंचतो व त्याचे मनामध्यें कर्तव्याकर्तव्याच्या विचारांचें प्रादुर्भवन होऊं लागतें, तेथें तेथें तसल्या प्रसंगांत घोटाळलेल्या बुद्धीचींहि उदाहरणें सांपडणें अपरिहार्य असतें. अशाच प्रसंगांपैकीं एका प्रसंगांत अद्वितीय अशा कार्याकार्यशास्त्राचा उदय झालेला असल्यामुळें जगाच्या पुरातन व अर्वाचीन कालासाठींच नव्हे तर भावीकालासाठींसुद्धां स्पष्ट मार्गदर्शक आणि म्हणून चिरपुण्यस्मरणीय असा तो प्रसंग होऊन राहिलेला आहे. तो प्रसंग म्हणजे अर्जुनाला भारतीययुद्धाचे आरंभाला झालेला कर्तव्यमोहकाल हा होय. असे कर्तव्यमोहाचे काल अनेकांना अनेकदां येऊन गेलेले आहेत, परंतु कर्तव्याकर्तव्याच्या मोहकालांत सर्वांना मार्गदर्शक व म्हणूनच सर्व जगाला वंद्य असा गीतारूप दिव्यप्रसाद मिळाल्यामुळें अर्जुनाचा हा प्रसंग संस्मरणीय झालेला आहे. अर्जुनाला मोह पडला व श्रीकृष्णाच्या स्पष्टार्थदर्शक अशा दिव्य उपदेशानें त्याचा मोह दूर होऊन तो आपलें स्पष्ट कर्तव्य जाणूं शकला. भ्रमांत पडलेल्या प्रत्येक मनुष्याला तसल्या प्रसंगीं त्याचेजवळ जर श्रीकृष्ण प्रत्यक्ष उपदेष्टे होतील किंवा श्रीगीतेचें रहस्य त्यावेळीं त्याच्या मनांत जागृत होईल तर कर्तव्याला अकर्तव्य समजून विकर्माचें अथवा अकर्माचें कर्तव्यभावनेनें अनुष्ठान घडल्यामुळें होणारे अनर्थावह परिणाम खास टळतील. मनुष्य जितका जितका अधिक असामान्य शक्तियुक्त असेल तितके तितके त्याच्या अकर्माच्या वा विकर्माच्या अनुष्ठानाचे परिणाम घातुकपणांत अधिकाधिक व्यापक, चिरस्थायी आणि भयंकर होत असतात.

वीर वैरागी जेव्हां जेव्हां शत्रूशीं झुंज द्यावयाला उभा राही तेव्हां तेव्हां तो वीरत्वाचा व शूरत्वाचा मूर्तिमंत आदर्श बनून उभा राही. शत्रूला तो नेहेमीं सिंहाप्रमाणें कर्दनकाळ भासे. त्याच्यापुढें त्यांना कंप सुटे. तो आलारे आला कीं त्यांनीं—त्याच्या शत्रूंनीं—रणांतून पाय काढलाच अशी

स्थिति असे. त्याला 'शत्रूपुढें अपयश' हें कधींच ठाऊक नव्हतें. परंतु देशद्रोही व फितूर झालेले कुऱ्हाडीचे दांडे बनून वीर वैरागीच्या विरुद्ध मुसलमानांचे साह्यकर्ते या नात्यानें जेव्हां शिख लोक त्याच्यापुढें उभे राहिले तेव्हां एकदम दृश्य पालटलें. वीरवृत्तीचा वीर वैरागी त्या शिखांना पाहून दयामयतेनें कोमलहृदयी बनला. समोर विरुद्ध होऊन उभ्या राहिलेल्या आपल्याच बंधुवर्गाला पाहून कृपेनें तो आविष्ट झाला. वास्तविक पूर्वींचे स्वजन शत्रूला मिळाल्यामुळें शत्रुवत् होऊन आततायी रूपानें परजनाप्रमाणें वधाई झाले हें त्याच्या लक्षांत आलें नाहीं. तो अर्जुनाप्रमाणें 'कृपयाविष्ट' होऊन विगलितवीर्य बनला. शत्रूंना यथायोग्य दंड देऊन त्यांच्या आक्रमणामुळें संकटग्रस्त झालेल्या स्वधर्माचा, स्वजातीचा उद्धार करणें व परतंत्र झालेल्या स्वदेशाला त्यांच्या तावडींतून स्वतंत्र करणें हें वीर वैरागीचें ध्येय होतें. कोणतेंहि इतर कारण हें ध्येय विचलित करण्याला समर्थ होणें शक्य नव्हतें. अशा अविचलित ध्येयाला साध्य करून घेण्यांत ज्यांचें ज्यांचें साह्य मिळेल, जे जे उपकारक होतील ते ते स्वजन व मित्र आणि त्या ध्येयाला जाण्याला ज्यांचा प्रतिबंध होईल, जे जे विरुद्ध होतील, जे जे घातक, विरोधी वा अनुपकारक होतील ते ते परजन व शत्रु होत. बुद्धिपुरस्सर विरोधानें शत्रु होतील हें स्वाभाविक ठरेल, परंतु बुद्धिमांद्यानें आपण करीत आहोंत तें व्यक्तीच्या किंवा व्यक्तिसमूहाच्या विरुद्ध असलें तरी ध्येयाला विरोधी वा घातक अशा समजुतीनें विरोध करण्याला उद्यत झालेले कांहीं स्वजन असले तर तेंहि शत्रूच समजावे कीं काय ? अशी एक शंका वाटण्यासारखी आहे. हेतुदृष्ट्या जरी हे लोक अपराधी व म्हणूनच शत्रु ठरत नाहींत तरीपण परिणामदृष्ट्या हे दोषी असल्यामुळें शत्रूप्रमाणें वधाई म्हणतां येत नाहींत तरी ते दंड्य नाहींत असें कोणीहि विचारी पुरुष म्हणूं शकणार नाहींत. अर्थात हा दंड परिणामाच्या भयंकरतेच्या तरतमभावानें मृदु वा कठोर होऊं शकेल. कदाचित् देहदंडहि न्याय्य होऊं शकेल. ही गोष्ट—ही तत्वाची गोष्ट—जी गीतेंतील सार्वभौम उपदेशांतील एक होऊं शकेल——ती वीराच्या लक्षांत आली नाहीं. दिसावयाला स्वजनासारखे दिसणारे परंतु शत्रुबुद्धीनें अधर्मावलंबी होऊन पुढें उभे ठाकलेल्या स्वजन-शत्रूशीं 'धर्म्ययुद्ध' चालविण्यासाठीं उभे न राहतां वीर वैरागी भ्रांतीनें विकर्मावलंबी बनला. शक्य तोंपर्यंत त्यांनीं शत्रुपक्षाकडून युद्धार्थ उभ्या

राहिलेल्या त्या शिखांना त्या स्वधर्मघाती व स्वजातिनाशक पापरूप विरोधापासून परावृत्त करावयाचें, किंवा त्यांना त्यांना ती गोष्ट करणें कोणत्या ना कोणत्या तरी उपायानें अशक्य करून टाकावयाचें आणि हें सर्व अशक्य झाल्यास देहदंड द्यावयाचा, तें न करतां आजपर्यंत ज्यांना बरोबर घेऊन साह्यकर्ते या नात्यानें त्यांच्या हातून विजयसंपादन करविले त्याच प्रत्यक्ष समोर–शत्रुपक्षाकडून लढत आहे तरी—विरोधी होऊन आलेल्यावर शस्त्र कसें उगारावें, ते स्वजन आहेत ! ! या भावनाप्रधान बुद्धिभ्रमानें कृपाविष्ट होऊन वीर वैरागी युद्धापासून परावृत्त झाला. आणि ध्येयाची फार मोठी हानि झाली. वीर वैरागी हा असामान्य पुरुष होता आणि म्हणूनच त्याच्या हातून झालेल्या एका वेळच्या चुकीनें कार्याचीहि असामान्य हानि झाली. असामान्य पुरुषाच्या क्षणिक बुद्धिभ्रमानेंसुद्धां देशाची, धर्माची, वा जातीची हानिसुद्धां असामान्य होऊन बसते. जसा असामान्य पुरुष नाहींसा झाला म्हणजे त्याची जागा भरून काढावयाला जवळ जवळ अशक्य होतें; त्याचप्रमाणें त्याच्या चुकीनें झालेली हानि असामान्य असल्यामुळें ती पुन्हां भरून काढावयाला जवळ जवळ अशक्यच होऊन बसतें. आणि तशीच हानि वीर वैरागीच्या शिखांशीं आलेल्या युद्धप्रसंगांत विचाररहित भावनावशतेनें परावृत्त होण्यानें देशाची धर्माची व जातीची झाली; तसें झालें नसतें तर काय झालें असतें हें वाचकांच्या लक्षांत येईलच. असे आणी–बाणीचे व निर्वाणीचे प्रसंग जातीच्या व देशाच्या दीर्घ आयुष्यक्रमांत अनेक वेळां येतात. व त्यांचे चांगले वाईट परिणामहि चिरकालपर्यंत त्या जातीला व देशाला भोगावे लागतात. विचारहीन भावनावशता कर्तव्यमूढ बनविते व अशा कर्तव्यमूढ लोकांच्या लहानमोठेपणावर त्याच्या चुकांचे लहानमोठे परिणाम इतरांना भोगावे लागतात. आणि म्हणून कर्तव्याकर्तव्याची मीमांसा जाणण्याची प्रत्येकाला अवश्यकता आहे. मग तो सामान्य सामर्थ्याचा मनुष्य असो वा असामान्य सामर्थ्याचा मनुष्य असो. विशेषतः असामान्य सामर्थ्याच्या मनुष्याला कर्तव्याकर्तव्य वा कार्याकार्य विचारणाशक्ति आपल्यांत आणणें हें अत्यंतावश्यक असतें. ही विचारणाशक्ति त्यांच्यांत नसल्यानें इतिहासकालांत वा वर्तमानकालांत देशावर धर्मावर वा जातीवर कसकसे हानिकारक परिणाम झाले आहेत हे बहुतेकांना माहितच आहेत. ]

# १४ वैरागीची आशा.

वैरागीचें साहस नष्ट झालें असेल; परंतु त्याची आशा अजून सुटली नाहीं. जग आशेंत स्थित आहे. जर आशा राहिली नाहीं तर लोक इतके घाबरून जातात कीं त्यांचे नाड्यांतील रक्त पार गोंठून जातें. एक मनुष्य खोल पाण्यांत बुडूं लागतो, जोंपर्यंत त्याला वांचण्याची आशा असते तोंपर्यंत तो हातपाय मारित असतो, परंतु आशा सुटतांच तें पाणी त्याला अथांग वाटूं लागतें. तो आशा सोडून देतो. त्याचे हातपाय मारणें बंद होतें. ती अवस्था अत्यंत करुणाजनक व खेदोत्पादक असते.

प्रत्येक जाति संकटापासून आपलें संरक्षण करूं इच्छित असते. आणि जेव्हां कांहींहि उपाय चालत नाहीं तेव्हां ती स्वात्माहुति देऊन टाकते. अशा जातींतील जीवनशक्तींचीं चिन्हें नाहींशीं होतात. जातीला स्वसंरक्षणाचा मार्ग दाखविणारेच तिचे रक्षक असतात. पैलथडीला पोंचण्याचा अधिक नजीकचा व कमी काळ घेणारा मार्ग जितका कोणी दाखवील तितका जातीमध्यें अधिक जीवनसंचार होऊन तिचा उत्साह वाढत जातो. वैरागी हिंदूसाठीं कल्की अवतार होता. कारण त्यानें सर्वांच्या मनांत संकटमुक्ततेची आशा उत्पन्न केली होती. मी तुम्हांला अपमानाच्या आणि दास्याच्या स्थितींतून काढून धर्म आणि मान यानें मंडित अशा जीवनाकडे नेऊन पोचवितों हें त्यानें हिंदूंना सक्रियतेनें दाखविलें होतें. बायकामुलांच्या तोंडावर आशेचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं व त्याला सफलता मिळावी म्हणून ते प्रार्थना करूं लागले.

इतक्या यातनांतून व संकटमय अवस्थांतून जावें लागत असूनसुद्धां जिच्यामध्यें आशेची ज्योति जळत असते, ती जाति खरोखर पूजेलाच पात्र आहे.

वैरागीनें परततांच खालसाला प्रसन्न करण्याचा ( त्यांना पुन्हा शुद्धीवर आणण्याचा ) प्रयत्न केला. त्यांना लिहिलें—" आपण धोक्यांत आलां

आहांत. गुरु गोविंदसिंहाच्या उपदेशाला तुम्ही धुळीला मिळविलेंत. आपले शत्रु आपल्यांत फूट करवून आम्हांला नष्ट करून टाकतील ! विचार करा, ही संधि पुन्हां येणार नाहीं ! मी तर साधु आहें; माझें काय बिघडेल ? तुमचें मात्र सर्वस्व जाईल. अजून तरी उमजा आणि शत्रूची साथ सोडून द्या ! या मला मिळा, पहिल्यानें शत्रूंचा निकाल लावूं व मग आपल्यांतील भानगडींचा निकाल लावून घेऊं.

चिठ्ठी पोचली. खालसांनीं ती ऐकली आणि सर्वजण अगदीं चूप झाले. आम्हीं काय करीत आहोंत ! हा विचार प्रत्येकाच्या मनांत उद्भवूं लागला. कोणालाहि बोलण्याचें साहस झालें नाहीं. अखेर एक निहंग शीख म्हणालाः—" त्यानें गुरूचें म्हणणें टाळलें आहे. त्याच्याबरोबर आमचा मेळ कसा होणार ? जर याला मेळ हवा असेल तर यानें कलगी उतरावी आणि अमृत चाखावें. " ( शिख होण्याचा एक विशिष्ट संस्कार. ) वैरागीनें असें करणें म्हणजे त्याचा नैतिक मृत्यु होता. असें त्यानें केलें असतें तर त्याचा प्रभाव नष्ट झाला असता. वैरागीच्या तेजस्वितेंतच त्याची शक्ति होती. जर त्यानें ही राजनैतिक बल देणारी तेजस्विता सोडून दिली असती तर शिखांबरोबर त्यानें मेळ करणें आणि न करणें हें सारखेंच झालें असतें.

वैरागीचा हा प्रयत्नहि निष्फल झाला. त्यानें म्हटलें—" ठीक आहे ! ( मी क्षत्रियाचा छावा आहें ) राजपुतीणीच्या पवित्र व तेजस्वी कुक्षींत जन्म घेतला आहे. मी एकटाच काय करूं शकतों तें पाहीन."

त्यानें कलानौरवर चढाई केली. नबाब फतहदीन रुपया आणि घोडे नजराणा घेऊन भेटीला आला व वैरागीची भेट घेऊन त्यानें त्याचे प्रभुत्वाला मान्यता दिली. त्यानंतर वैरागी श्यालकोटकडे गेला. तेथेंहि त्याला कोणी विरोध केला नाहीं. श्यालकोट घेतल्यावर त्यानें क्रमाक्रमानें वजिराबाद आणि गुजरातचे प्रांतावर आपला अंमल बसविला. व पुढें त्यानें हडप, धन, पठोहार इत्यादि ठिकाणीं खूप लूटमार केली. त्या साऱ्या भागांत याच्याशीं सामना करावयाला कोणतेंहि शासन अस्तित्वांत नव्हतें. हजारों हिंदू त्याचे चेले बनले. परंतु यापासून लाभ काय ? वैरागीला या विजय-यात्रेंत पुष्कळांची संपत्ति मिळाली परंतु त्यामुळें त्याची शक्ति वाढली नाहीं.

ज्या लोकांशीं याचा मेळ बसला ते लोक राजनैतिक दृष्टीनें व्यर्थजीवी होते. ते आपणां स्वतःला मेंढराप्रमाणें समजत असत. कोणी यावें आणि त्यांच्यावरील लोंकर कातरून घ्यावी. शेकडों वर्षांच्या पारतंत्र्याच्या विषानें त्यांच्यांतील स्वतंत्रतेचे दिव्य भाव नष्ट करून टाकले होते. त्यांच्या दृष्टीनें राजसंस्था एक अशी वस्तु होती कीं, ज्यांत लोकांना त्यांत कांहीं करावयाचें वा करावयाला नाहीं. कोणी मनुष्य कदाचित् साहस करून जर त्यांच्यावर शासन करूं लागला तर तोच तेथील अधिकारी आणि राजा होऊन बसे. गारोड्याचा तमाशा पाहणारांप्रमाणें त्यांच्या मनाची स्थिती होती. तो गारोडी असें मोहित करून टाकतो कीं, पाहणारांना आपली नजरबंदी झाली आहे असें सुद्धां ध्यानांत येत नाहीं. ते इतके मोहमग्न होतात व त्यांच्या डोळ्यावर असा पडदा पडतो कीं, सर्वजण त्याच्या हाताकडे लक्ष न देतां केवळ पुढें काय होतें हेंच उत्सुकतेनें पहात असतात. अशा लोकांच्या मनामध्यें जोंपर्यंत कांहीं विशेष परिवर्तन घडून येत नाहीं, तोंपर्यंत ते स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेण्याला असमर्थ असतात. या सर्व प्रदेशांत कांहीं थोड्या ठिकाणा शिवाय इतर जागीं गुरूंच्या स्फूर्तिदायी जिवनाचा फार थोडा परिणाम झाला होता. वैरागीनें त्यांच्यावर आपली सत्ता स्थापन केली, परंतु ती फक्त नाममात्र होती. वैरागीसाठीं—त्यानें आरंभलेल्या व घडूं घेतलेल्या महत्कार्यासाठीं—जे आत्मबलिदान करूं शकतील अशा मनुष्यांची त्याला अवश्यकता होती. अशा प्रकारचे वीरवृत्तीचे लोक याला लवकर कोठून व कसे मिळणार ? हा जो वैरागीच्या शक्तीचा देखावा होता तो विझणाऱ्या दिव्याची अखेरची चमक होती.

ज्यानें शेकडो वर्षांच्या पारतंत्र्याच्या भयंकर व नाशकारी जबड्यांतून हिंदूजातीला सोडविण्यासाठीं स्वातंत्र्यदानाचें यशकंकण हातांत बांधलें होतें, असा हा वैरागी या प्रांतांतील हिंदूजातीचा पहिला सुपुत्र होय. हा वैरागी अशा सत्पुत्रांपैकीं एक होता कीं, जे जगदुद्धाराठीं कधीं कधीं या संसारांत प्रकट होऊन हरएक जाति व देश अशांचा यथार्थ अभिमान बाळगीत असतात.

# १५. गुरुदासपुरचा वेढा.

वैरागीची सफलता पाहून बादशहाला कसें शांत बसवणार ? बादशहानें जरी त्याचे पंख तोडून टाकले तरीपण हा बिन-पंखी पण स्वातंत्र्यप्रेमी पक्षी तसाच थोडाबहुत उडत राहिला होता. जर वैरागी जिवंत राहिला व पकडला गेला नाहीं तर तो केव्हांना केव्हां तरी लाहोर शहर आपले हस्तगत करून घेईल व पंजाबमध्यें कायमची हिंदुसत्ता स्थापित करील अशी बादशहाला चिंता पडली होती. हें संकट टाळण्यासाठीं संवत् १७७६ ( शके १६४२ ) मध्यें बादशहानें अबदुलसमंदखांला तीस हजार प्रबल फौज बरोबर देऊन दिल्लीहून रवाना केलें. आणि दुसऱ्या अधिकाऱ्यांनाहि वैरागीवर आपल्या सेना धाडण्याविषयीं आपले हुकूम पाठविले.

असेंहि सांगतात कीं, अबदुलसमंदखांनें वैरागीला धोका देण्याकरितां व असावध ठेवण्यासाठीं कित्येक प्रकारचे नजराणे वगैरे देऊन आपले दूत त्याचेकडे पाठविले. त्यांनीं वैरागीकडे येऊन असें सांगितलें कीं, जरी बादशहानें त्याला फौज देऊन आपणांवर पाठविलें आहे तरीपण अबदुलसमंदखां अंतःकरणापासून आपला शिष्य बनूं पहात आहे. तो आपली कोणत्याहि तऱ्हेची हानि करूं इच्छित नाहीं. वैरागीचा या गोष्टींवर विश्वास बसला होता वा नाहीं याच्याशीं आपल्याला कांहीं विशेष कर्तव्य नाहीं. शाही फौज येऊन पोंचली आणि गुरुदासपुरापासून कांहीं अंतरावर तिची छावणी पडली. लाहोर व जालंदर येथूनहि फौज आली. गुरुदासपुराचा आंत बाहेर जाण्याचा रस्ता चोहोंकडून बंद केला गेला. जों जों अधिकाधिक काळ लोटत गेला तितकी तितकी युद्धसामग्री व खाद्यसामग्री कमी कमी होत गेली. जेव्हां खाण्याचे पदार्थ अगदीं खुंटले, खावयाला कांहीं उरलें नाहीं तेव्हां पांचशें शिपाई खाद्यपदार्थ आणण्यासाठीं मोठ्या कुशलतेनें गुप्त रीतीनें बाहेर पडले व सामुग्री आणण्याला वेढ्याबाहेर निघून गेले. ते दूर

गेले नाहींत, तोंच शाही फौजेला तो समाचार त्यांच्या गुप्त हेराकडून मिळाला आणि त्यांचेवर कांहीं फौज जाऊन त्यांचा तिनें पाठलाग केला. ते पांचशें शिपाई प्रशंसनीय शौर्यानें वीराप्रमाणें लढून रणक्षेत्रांत धराशायी झाले. आणि त्यांची गणना हुतात्म्यामध्यें (Martyr) झाली. आंतील भुकेनें ग्रासलेले लोक जेव्हां फार तंग झाले तेव्हां वैरागीविरुद्ध तक्रार करूं लागले. स्वामिभक्त बाजसिंहानें सर्वांना आश्वासन देऊन असें सांगितलें कीं, सर्व लोकांनीं मृत्यु आला तरी वैरागीवरील विश्वास ढळूं देऊं नये. तो फार शहाणा आहे. तो सर्व जाणतो आहे. त्याच्यांत शक्ति आहे व तो आपल्या सर्व कष्टांना दूर करील. मिर्जाजानच्या कोटाच्या आंत एक किल्ला बनविण्याची त्यानें आज्ञा दिली आहे व आपण सर्व जण तेथें सुरक्षित निघून जाऊं. या आश्वासनानें सुद्धां सैनिकांची भयग्रस्तता दूर झाली नाहीं. लोकांची भुकेनें इतकी दशा झाली कीं, त्यांनीं आपली भूक शमविण्यासाठीं घोड्यांचें मांस खाण्याला आरंभ केला. यानें सुद्धां त्यांची भूक शमेना. याप्रमाणें चार महिने गुजरले. लाहोरच्या शासकानें आज्ञा प्रसिद्ध केली कीं, जो जो शिख शाही–पताके खालीं येईल त्याला त्याला अभयदान दिलें जाईल. कांहीं शत्रूला जाऊन मिळाले व ते कैद केले गेले. लढून मरणें सोपें आहे; पण क्षणाक्षणाला मृत्युयंत्रयातना सहन करावयाला लावणारा व भुकेनें व्याकुल करीत करीत येणारा मृत्यु अत्यंत कठीण आहे. वैरागीनें एकवार आपले सर्व साथीदार एकत्र करून शत्रूवर चाल केली; परंतु थोड्याशा लोकांसह इतक्या मोठ्या सेनेपुढें टक्कर द्यावयाची असल्यामुळें कांहींहि चाललें नाहीं. जेव्हां सर्वजण भुकेपुढें निरुपाय झाले, तेव्हां वैरागीजवळ येऊन याचना करूं लागले. त्यानें सांत्वनपूर्वक सर्वांना शांतपणें उत्तर दिलें:—"स्मरण ठेवा. संसारांत सुख आणि दुःख दोन्हीं मनुष्याला लागलेलीं आहेत. सुखाबरोबर दुःख सोसावें लागणें हें अपरिहार्य आहे. मी सुद्धां तुमच्याबरोबर तुम्हीं भुकेले आहांत तोंवर तोंडांत एक दाणासुद्धां घालणार नाहीं." घेऱ्याच्या आंतलि मनुष्यांच्या यातनांचा नुसत्या कल्पनेनें अनुभव घेतां येणार नाहीं. या अशा असहाय्य अवस्थेंत शत्रूहि त्यांना फार कठिण परीक्षेंत लोटीत होता. एकवेळ शाही सेनानायकांकडून आज्ञा झाली कीं—" हत्यार खालीं ठेवा ! " भुकेनें ते इतके सतावून गेले होते कीं पुष्कळजण बाहेर निघून आले. त्यांचा शत्रूचे वचनावर

विश्वास नव्हता. ( तरीपण बुडणारा मनुष्य काडीचाहि आश्रय करूं पहातो त्याप्रमाणें हें झालें. )

जेव्हां स्वाधीनता सोडून वांचण्याचा प्रयत्न करण्याशिवाय आणखीं दुसरा कोणताहि उपाय राहिला नाहीं तेव्हां विवशतेनें त्यांनीं किल्याचे दरवाजे उघडून दिले, आणि मुसलमानी सेनेनें आंत प्रवेश केला. वैरागी भुकेच्या आगीनें अगदीं सुकून जाऊन अस्थिपंजर होऊन राहिला होता. परंतु कोणाहि सैनिकाचें त्याचेजवळ जाण्याचें साहस होईना. सिंहाजवळ—मग तो मरणोन्मुख झालेला असला तरी—नुसतें जवळ जाण्यालासुद्धां भय वाटतें. अखेर वैरागीनें पाहिलें कीं जें होणार तें चुकवितां येत नाहीं. होऊं घातलेल्या गोष्टीपुढें हट्ट निरुपयोगी आहे हें वैरागीनें पाहिलें. आपण होऊन धनुष्यबाण दूर ठेवून दिला आणि मुसलमान सैनिकांना म्हटलें कीं तुम्हीं निःसंकोच बंदी करा. त्यांनीं त्याला साखळ्यांनीं बांधला. अब्दुलसमदखानला या विजयानें फार प्रसन्नता वाटली. हा समाचार ऐकून मुसलमानांना सुखाची झोंप मिळाली. हिंदूंच्या सर्व आशांवर पाणी फिरलें. त्यांच्या घरीं शोक होऊं लागला. स्त्रिया शोकावेगानें आक्रोश करूं लागल्या. त्यांचा एकमेव आधार तुटला. वैरागी एका उज्ज्वल व अत्यंत दैदीप्यमान ताऱ्याप्रमाणें चकाकत होता. चवदा वर्षेपर्यंत आपल्या पराक्रमपूर्वक व देशोद्धारक अशा जीवनाच्या प्रकाशानें सर्व जगाला प्रकाशित करीत दीपवून सोडणारा तो वीर वैरागी अखेर धूमकेतूसारखा तुटून पडला !

# १६ हौतात्म्याचें दिल्लींतील अपूर्व दृश्य.

दिल्ली भारतवर्षाचें केंद्र आहे. तिच्या इतिहासांत सर्व देशांचा इतिहास येऊन जातो. महाभारतकालापासून दिल्लीच्या आणि कुरुक्षेत्राच्या इतिहासाला आरंभ झाला. तेव्हां पासून अजूनपर्यंत दिल्ली जशीची तशीच चित्ताकर्षक होऊन राहिलेली आहे. बंगालमध्यें एक म्हण आहे " दिल्लीपति जगताचा ईश्वर आहे. " युरोपांत प्राचीनकाळीं ज्याप्रमाणें रोम होतें, यावेळीं जसें लंडन आहे, तेंच स्थान आशियाखंडांत दिल्लीला प्राप्त झालेलें आहे. या नगरींत काय काय झालें नाहीं ! कौरवपांडवांचें हें स्थान आहे, राजपूत महाराजाधिराज येथें झाले, पृथ्वीराजाची हीच नगरी राजधानी होती, कितीतरी मुसलमानवंश याठिकाणीं झाले, मोंगल वंशहि येथेंच राज्य करीत होता, मराठ्यांनींहि येऊन येथें तळ दिला, ब्रिटिश राज्यहि येथें येऊन स्थिरावलें आहे. एक दिल्ली नगर आणि एक कोहिनूर हिरा यांच्यांत भारतवर्षांतील साऱ्या क्रांत्यांचा संपूर्ण इतिहास भरलेला आहे. दिल्लीमध्यें अत्याचार झाले, दिल्लीमध्यें वध झाले, दिल्लीनें अनेक रक्तपात पाहिले, दिल्लीवरील तैमूर, नादिर आणि अबदल्ली यांचीं आक्रमणें कधीं विसरलीं जाणार नाहींत. १८५७ सालच्या क्रांतियुद्धाचीं शिपायांचे बंडाचीं (?) चिन्हेंहि येथें कायम रहातील. परंतु जें दृश्य आतां आमच्या समोर येत आहे तसलें दृश्य आजपर्यंत दिल्लींत दुसरें झालें नाहीं व कदाचित् पुढेंहि होणार नाहीं. ही दिल्लीची घटना हिंदुस्थानांतच नव्हे तर सर्व जगांत अनुपम आहे. एक महावीर, दिव्यत्यागी, रणयोद्धा, जाज्वल्य देशभक्त, अलौकिक धर्मप्रेमी, हिंदु जातीचा अभिमानी, समर्थ कर्मयोगी आणि स्थितप्रज्ञ तपस्वी लोखंडाच्या साखळ्यांनीं जखडलेला दिल्लीमध्यें आणला गेला. ज्यांनीं त्याला सुखदुःखांत, शीतोष्णांत, जयपराजयांत सोडलें नाहीं असे त्याचे सातशें चाळीस साथीदार त्याजबरोबर होते. हे त्याच्या सर्व सेनेंतील निवडक मुकुटमणि होते. तत्कालसानें वैरागीचा त्याग केल्या-

वर देखील यांनीं त्याची साथ सोडली नाहीं व गुरुदासपुरच्या कष्टांतून व मृत्युयंत्रणापासून सुद्धां ते जीवित राहिले. ते कांहीं साधारण लोक नव्हते. सगळेच्या सगळे भारतमातेचे लाल होते. ते बंदा वैरागीबरोबरच बंदी करून आणले गेले.

दृष्टीदृष्टींत फरक असतो. बादशहाच्या दृष्टीला हे लोक वीर दिसले नाहींत तर मेंढ्या दिसत होते. (किंवा वीर दिसत असून आपल्या दृष्टीला जणूं फसविण्यासाठींच वीर असून—आणि म्हणूनच त्यांना अशा स्थितीला पोंचवीपर्यंत बादशहाला घास गोड लागला नाहीं किंवा सुखाची झोप आली नाहीं यासाठीं—त्यांना मेंढरें बनविण्याचा किंवा तसें दाखविण्याचा प्रयत्न केला गेला.) त्याची इच्छा अशी होती कीं, लोकांनींहि यांना मेंढरेंच समजावें. सर्वांना काळ्या मेंढ्यांचीं कातडीं पांघरवून गाढवांवर स्वार केले गेले. वैरागीच्या तोंडाला काळें फांसलें गेलें आणि हिंदुस्थानच्या मानधनाची विटंबना करणारी, ज्याचा बदला परमेश्वरानें कदाचित् भविष्यकाळाच्या पटावर आपल्या अचूक अशा दिव्य अंगुलीनें चित्रवूनहि ठेवला असण्याचा खास संभव आहे अशी मुसलमानी नीचता व क्रूरता सिद्ध करणारी, हिंदु जातीच्या स्वाभिमानाला चरके देत शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करणारी, नीच आणि राक्षसी मुसलमानांनीं काढलेली हिंदुहुतात्म्यांची ही वरात दिल्लीच्या गल्ल्यागल्ल्यांतून फिरविली गेली!

त्याच्या साथीदार सैनिकांसह वैरागी काजीच्यासमोर उभा केला गेला. त्यानें आपल्या नियमाप्रमाणें व आपल्या धर्म (?) शासनानुसार पहिली शर्त ही घातली कीं, मुसलमानी धर्माचा स्वीकार करीत असाल तर तुम्हाला प्राणदान देण्यांत येईल. असा प्रस्ताव करणें म्हणजे या धर्मवीरांचा अपमान करणें होतें. त्या वीरांनीं या प्रस्तावाला तुच्छतेनें उत्तर दिलें —" प्राणहरण करणें किंवा प्राणदान करणें हें तुमच्या स्वाधीन नाहीं. कोठपर्यंत तुम्हीं जीवनदान करूं शकणार?" बस्स! या उत्तरानंतर त्यांच्या वधाची आज्ञा झाली. देहदंडाची आज्ञा ऐकतांच त्यांचीं वीरमनें प्रफुल्लित झालीं व ते आनंदी दिसूं लागले. कोतवालीसमोर रोज शंभराशंभरांची हत्या केली जाऊं लागली. मनुष्यांच्या अंतःकरणांच्या अवस्थांचें ज्यानें थोडेंबहुत अनुशीलन केलें आहे त्याच्या हें तेव्हांच लक्षांत येईल.

कीं, जेथें भीरु मनुष्य मृत्यूच्या भयानें दबला जाऊन सदा रडत रडत मृत्यूच्या जबड्यांत जाऊन पडतो तेथेंच वीरहृदयी मनुष्य आपलें कर्तव्य पूर्ण करीत असतां मृत्यूला तोंड देतो व मोठ्या आनंदानें हंसत हंसत जाऊन त्याला कवटाळतो. आपला धर्म पूर्णतः पालन करण्यांत आपणांला हा पुरस्कारच मिळत आहे आणि ज्याला लोक चुकीनें दंड म्हणतात, अशा या दिव्य मृत्यूच्या आगमनानें तो प्रसन्न रहात असतो.

या वीरांच्या आमोदाची कल्पना सोळा वर्षांच्या एका कोमल कुमाराच्या धीरोदात्त उदाहरणानें कोणालाहि करतां येण्यासाखी आहे. या बालकाची आई रडत रडत त्या मांगाकडे जाऊन पोचली व म्हणूं लागली कीं—" माझा पुत्र निर्दोषी आहे. हा कोणत्याहि अपराधाशिवाय पकडला गेला आहे. हा वैरागीचा शिष्य नाहीं; याला सोडून द्या. " त्या बालवीराची जेव्हां पाळी आली तेव्हां त्या मांगानें त्याला सोडून दिलें. बालकानें म्हटलें—" माझ्यासाठीं काय म्हणून विलंब होतो आहे ? मी शीघ्र स्वर्गारोहण करूं इच्छितों. " मांगानें त्याला उत्तर दिलें—" तुम्ही आई, तुझ्या प्राण-रक्षणाकरितां प्रार्थना करीत आहे. " त्यानें म्हटलें—" ती चुकत आहे आणि मातेकडे वळून तिला संबोधून म्हणाला—" तूं मोठी हत्यारी आहेस. मला स्वर्गांतून ओढून काढून नरकांत फेकून देऊं इच्छिते आहेस का ? " आई बिचारी रडत रडत दूर झाली.

आठव्या दिवशीं वैरागीची पाळी आली. दरबारी त्याला बघावयाला आले. त्यांमधील एका मुहम्मदअमीन नांवाच्या अमीरानें वैरागीला म्हटलें:—" तुझ्यासारख्या धीमान् पुरुषानें, ज्यामुळें तुझी अशी दुर्दशा होऊन राहिली आहे, अशी वाईट वाईट कर्में कां केलीं ? " वैरागीनें उत्तर दिलें—" मी प्रजापीडकांना दंड करण्यासाठीं ईश्वरानें आपल्या हातांत धारण केलेलें एक शस्त्र होतों. या जगांत जेव्हां गर्व मर्यादा सोडून अमर्याद होतो आणि ईश्वराची प्रजा अत्यंत दुःखपीडित होते तेव्हां माझ्यासारखा दुष्टांचा संहार करणारा जन्म घेतो हें तुम्ही काय ऐकलें नाहींत ? "

बादशहानें विचारलें, तूं कशा प्रकारच्या मृत्यूनें मरण वरूं इच्छितोस ? वैरागीनें गंभीरतापूर्वक उत्तर दिलें—" जशी तुझी इच्छा असेल त्याप्रमाणें

मला सर्व प्रकारचा मृत्यु एकसारखाच आहे. मी या देहालाच सर्व तऱ्हेच्या दुःखांचें मूळ समजतों आहें." वैरागीच्या चाऱ्ही बाजूला भाल्यांच्या पंक्ती उभ्या केल्या गेल्या. त्यांच्यावर त्याच्या साथीदारांचीं शिरें टांगलेलीं होतीं. एका भाल्यावर त्याच्या अत्यंत लाडक्या अशा मांजरीचें शिर लटकत होतें. वैरागीचा लहानगा बालपुत्र त्याच्या मांडीवर बसविला गेला. बादशहानें सुरा देऊन आज्ञा दिली कीं:–"आपल्या हातानें बालकाचा वध कर." वैरागीनें अर्थातच या गोष्टीचा तिरस्कारपूर्वक निषेधानें नकार केला, तोंच त्या हत्याकारी मांगानें वैरागीच्या देखतां देखतां त्या बालकाच्या शरीराचे दोन तुकडे केले आणि त्याचें रक्तमय हृदय (काळीज) वैरागीच्या छातीवर फेंकून मारलें. त्या अधम व राक्षसी कृत्यानंतर लोखंडाच्या तापविलेल्या लाल लाल सळ्यांनीं त्याला मारावयाला आरंभ केला. तापवून लाल झालेल्या चिमट्यांनीं त्याच्या अंगांतील इतके मांसाचे गोळे तोडतोडून बाहेर काढले गेले कीं, त्याचीं हाडें बाहेर दिसूं लागलीं. त्यानें मरेपर्यंत, मी अत्याचाराचा वृक्ष उपटून टाकला आहे, याला आतां फळेंफुलें लागणार नाहींत, हा सद्विश्वास व अभिमान सोडला नाहीं. त्याच्या तोंडावर खेदाची वा दुःखाची किंचित् देखील छटा नव्हती. भयंकर कष्ट व क्लेश होत असतांहि त्याच्या तोंडांतून उस् सुद्धां निघालें नाहीं. जेव्हां वैरागीचीं बोटें उतरलीं जात होतीं तेव्हां हा विदेही जनकाप्रमाणें (देहातीत अवस्थेंत) निर्देह बसलेला होता. निजीबुद्दौलानें त्याला विचारलें, इतके कष्ट होत असतां सुद्धां तूं अजून प्रसन्न कसा राहिला आहेस? वैरागीचें उत्तर असें होतें कीं–"ज्याला आत्मज्ञान आहे त्याला आत्मा सुखदुःखातीत आहे हें ठाऊक असतें." असेंहि सांगतात कीं त्याला त्यानंतर हत्तीच्या पायाखालीं तुडविलें व पुढें त्याचें मृत शरीर एका खड्ड्यांत फेकून दिलें गेलें.

ज्याच्या जीवनांतील सर्व कृत्यें केव्हांहि अनुपमच आहेत असा एक वीर पुरुष या देशांत उत्पन्न झाला. परंतु आश्चर्य आहे तें केवळ हेंच कीं, असल्या वीरशिरोमणीला ही हिंदु जाति विसरून गेली आहे. त्याच्या मृत्युस्थानावर एखादी समाधि नसली तरी चालेल, त्याच्या नांवानें एखादें मंदिर वा गुरुद्वार नसलें तरीहि हरकत नाहीं, जरी त्याच्या नांवानें कोणत्याहि प्रकारचें दुसरें कांहीं स्मारक झालें नाहीं तरी चिंता नाहीं परंतु जर

हिंदु युवकांच्या हृदयमंदिरांत श्रीराम व श्रीकृष्ण यांच्याप्रमाणेंच वैरागीच्या नांवाला स्थान नसेल तर याहून अधिक अक्षम्य असें पाप या हिंदु जातीच्या माथीं बसणारें दुसरें कोणतेंहि नाहीं !!!

भिम्बरमध्यें जाऊन एका साधूनें 'मी वैरागी आहें व मीच दिल्लीहून प्राण वांचवून निघून आलों आहें' असें जाहीर केलें. त्याचे वंशज अजून गादीवर आहेत. तेथें प्रतिवर्ष वैरागीच्या नांवावर मेळा भरत असतो.

---

# १७ वीर वैरागीचे मृत्यूनंतर.

वैरागीचे डोळे मिटण्याचाच अवकाश कीं, शिखांचे डोळे उघडले. त्यांच्या दृष्टीवरील भ्रमपटल नाहींसें झालें. आतां त्यांना समजलें कीं आम्हीं काय करून बसलों आणि त्या करणीचें काय प्रतिफल मिळालें आहे ! वैरागीच्या दिव्य व अद्वितीय कर्तव्यपरायणतेचें मोल आतां मागाहून त्यांच्या लक्षांत आलें. परंतु पक्ष्यांनीं शेत खाऊन टाकल्यावर मग पस्तावून काय फायदा ?

ज्यानें वैरागीला पकडून बंदी केलें त्या अबदुलसमंदखानलाच दिल्ली दरबारनें लाहोरचा शासक बनविला. त्यानें शत्रूचें शिर कापून घेतलें होतें. तत्खालसा इस्लामचा शत्रु होता. ( आणि त्याचें शिर--वीर वैरागी--त्यांच्या पासून काढून घेतला गेला. ) आतां तो तत्खालसा निराधार होऊन बसला. यानंतर पेटूं पाहणारी आग एकदम विझवून टाकणें अवश्यक होतें. तो खालसाच्या विध्वंसासाठीं नवे नवे ढंग शोधूं लागला. त्यानें संधीच्या शर्तीना धाब्यावर बसविलें. तो संधि तर केवळ मुसलमानांच्या स्वार्थसिद्धीसाठीं केला गेला होता. भोळाभावडा खालसा बिचारा राजनीति काय जाणणार ? त्याचा विश्वास कीं संधिपत्रांत लिहिल्या गेलेल्या 'सदा' या

शब्दानें संधि स्थायी होऊं शकतो. **संधीच्या शर्तींचें पालन फक्त जोंपर्यंत दोन्हीहि पक्ष दुसऱ्यापक्षाकडून आपल्या शर्ती पुऱ्या करून घेण्याच्या सामर्थ्यानें युक्त असतात तोंपर्यंत संधि अस्तित्वांत असतो हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं.** पहिल्यानें त्या तुराण्यानें—अबदुलसमंदखानें शिखांच्या जहागिरी जप्त केल्या आणि त्यांच्या जमिनीवरील कर दुप्पट केला. ज्यांना नौकरीवर ठेवलें होतें त्यांचें वेतन अर्ध्यावर आणून ठेवलें. शिखांनीं अपमान होतो म्हणून स्वतःच नोकऱ्या सोडून दिल्या. यानंतर तुराणीनें जाहीर केलें कीं मागील वर्षांत ज्यांची ज्यांची मालमत्ता शिखांनीं लुटली त्यांनीं त्यांनीं प्रार्थनापत्रें पाठवावीं. बस्स, मग काय पाहिजे होतें! लोकांना फक्त इषारा पुरे होता. प्रार्थनापत्रें येण्याला आरंभ झाला. एकहि शिख असा उरला नाहीं कीं ज्याच्या विरुद्ध चारपांच तक्रारी आल्या नाहींत. कोणाला चोरीच्या तर कोणाला खुनाच्या आरोपावर कैद करण्याचा सपाटा सुरू झाला. या कालासंबंधीं असें सांगतात कीं, शिखाचें शिर कापून आणणाराला पुरस्कार ( बक्षीस ) मिळत असे. एका शिराचें मूल्य दहा रुपयेपर्यंत झालें. कित्येक जणांनीं पळून जाऊन राजपुतान्यांतील संस्थानांत आश्रय घेतला व कित्येक असेच इकडे तिकडे भटकत फिरत होते. गुरुद्वारें ओसाड पडलीं. दिवाळीचा सण बंद झाला. हिंदूंना पुन्हां मुसलमान करण्यांत येऊं लागलें. कांहीं कालपर्यंत अशी दुर्दशा चालली होती. एकवेळीं राजपुतान्यांत पळून गेलेल्या शिखांनीं पंजाबवर एकत्र होऊन हल्ला चढविला. तुरुंग फोडले गेले, आणि लूटमार सुरू झाली. ज्या ज्या लोकांनीं शिखांविरुद्ध प्रार्थनापत्रें पाठविलीं होतीं त्यांना त्यांना शोधून काढून त्यांचा सर्वनाश केला. ज्या मौलवींनीं हिंदूंना मुसलमान बनविण्याची धर्माज्ञा ( फतवा ) दिली होती त्यांचा वध केला. यामुळें सुभेदारानें अधिक कठोर नीतीचा अवलंब केला. याचमुळें भाई तारूसिंहासारखे हुतात्मे चरख्यावर चढवून छिनले गेले. आणि भाई मणिसिंहानें धर्मासाठीं आपल्या देहाचे एक एक बंध हंसत हंसत कापूं दिले. याप्रमाणें कित्येक वर्षें गेलीं.

या आंदोलनाचा परिणाम शिखांचीं लहान लहान बारा संस्थानें स्थापन होण्यांत झाला. ज्यांनीं आपल्या बाहुबलानें वैरागीच्या मृत्यूनंतर कित्येक वर्षांनीं आपल्या राज्याचा पाया घातला, त्या बारा संस्थानांपैकीं डेराचा

एक महासिंह नांवाचा सरदार होता. कुंजाहचा एक क्षत्रिय मोतीराम म्हणून त्याचा दिवाण होता. दिवाण मोतीरामच्या मसलतीवरून लहोरवर त्यानें आपला अधिकार स्थापन केला. आणि बऱ्याच शिख संस्थानांना आपल्याबरोबर मिळवून घेऊन शिख साम्राज्याचा पाया त्यानें घातला.

या सर्व घटनांचें वर्णन करणें हा या पुस्तकाचा उद्देश नाहीं. हें चरित्र पूर्ण करण्यापूर्वी एका प्रश्नाचें उत्तर देणें राहिलें आहे. वैरागीच्यामागें त्यांच्या अनुयायांचें काय झालें, त्यांच्यापैकीं हल्लीं कोणी नजरेस कां येत नाहींत हा तो प्रश्न आहे. संवत् १७८२ [ शके १६४८ ] मध्यें अमृतसरमध्यें पुन्हां दिपवाळीचा सण साजरा केला गेला. त्यावेळीं तत्खालसा व वैरागीचे शिख दोघेहि एकत्रित झाले. गुरूद्वारीं लाखों रुपये चढविण्यांत आले. दोन्ही दळें त्या द्रव्याचे हिस्सेदार होऊं लागले. त्यांच्यांत त्याकरितां इतकें वैमनस्य वाढलें कीं, आपसांत तरवार खणखणूं लागली. त्यावेळीं त्यांच्यांतला एक वृद्ध मणिसिंह म्हणून तेथें होता. तो म्हणालाः—" ऐका! वैरागीच्या मृत्यूनें आम्हांला निर्बल करून टाकिलें आहे. आम्हीं आतां कोणत्याहि कामाचे राहिलों नाहीं. शत्रूच्या कूटनीतीनें आमच्यांत फूट पाडली आहे. काय आतां सुद्धां आपण आपसांत लढून कापाकापी करून मरून जाणार ? " या भाषणाचा शिखांवर चांगलाच परिणाम झाला. सर्वांनीं ' आपण जें सांगाल तें आम्हांला कबूल आहे ' अशी कबूली दिली. त्यानें एक प्रस्ताव केलाः—" कागदाच्या दोन तुकड्यावर " वाहे गुरूकी फत्ते " व " दर्शनी फत्ते " असें लिहून चिठ्या सुवर्णमंदिराच्या पायऱ्यांचे जवळ पाण्यांत सोडून द्या. जर दोन्हीं तरतील तर चढावा दोघांचा होईल. आणि जर पहिल्यानें एखादा कागद बुडाला तर मग त्या पक्षाचा कांहीं अधिकार राहणार नाहीं." यावर दोन्ही पक्षाला संतोष वाटला. असेंच केलें गेलें. दैवयोगानें म्हणा किंवा अन्य कांहीं कारणानें म्हणा वैरागीचा कागद पहिल्यानें बुडाला. त्याचे शिख विस्मित होऊन गेले. त्यांपैकीं पुष्कळसे तत्खालसामध्यें सामील झाले आणि जे कांहीं थोडे राहिले ते गुमनामींत राहूं लागले. याप्रकारें वैरागीच्या अनुयायांचा शेवट झाला आणि बाह्य फुटीची आग विझली गेली.

इति

# ‘ अमरमृत ’

[ बॅ. विनायकराव सावरकरकृत ]

क्रूर लोहपंजरांत या निरुंदशा
तीक्ष्ण सुळे !—लोहांचे दांत रक्त पी
तेंवी शिवशिवत, सदा देतिना मुळीं
अल्प वळायातेंही तनुसि तयाच्या !
पीतरक्त लोहसुळे टोंचटोंचुनी
देहाची जाळी ज्या जाहली असा
निजरक्तीं न्हालेला कवण हाय हा
पंजरांत बंदिवान ? सिंह कीं जसा ?
पंजरस्थ सिंहाच्या श्वान शिकारी
भोंतिं जसे भीत—धीट रक्त पिपासू
भुंकत बहु टपति तया भक्षुं फाडुनीः
शत्रूंचे तेवि मुक्त खड्ग हे थवे
भुंकत त्या पिंजरासि ढकलिती पुढें.
दिल्लीचें दीर्घ पटांगण; सभोंवतें
लोहगजांचें कुंपण रोखतें जनाः
ज्या भंवतीं शतसहस्र हिंदु—अहिंदू
नरनारी दाट उभ्या दूरवर—अहा
प्रेक्षाया हिंदूंच्या वीररक्षका—
प्रेक्षाया हिंदूंच्या रक्षकासची

ना परंतु हाय हाय तद्वधासही !—
प्रेक्षाया मात्र ! ! तोंच मुख्य कसायी,
बादशाह ज्या वदती, तोहि येः हळूं
फाटक—ना फट केवल करकरूंनिया
पंजर लव उघडे. ओढूनि शृंखला
फरफर फरफटित हाय ठेंचठेंचुनी
बंदीवानासि टाकिला पटांगणीं;
खणखण उपसूनि उगारूनि भोंवतीं
शस्त्रास्त्रें शतशः सहसाचि रोंखलीं.

एक एक शिष्य तया वीर गुरूचाः
शिष्य आणि वीर गुरूच्याहि गुरूचा
शृंखलांत बद्ध पुढें एक एक ये.
" होशी कां मुसलमान ? वांचसी तरी ! "
" हिंदू मी ! शीख अम्हीं ! मरण मी वरी ! ! "
एक एक उत्तर तुच्छवित कुराणा—
उठतांची पडत धर्मवीरवराचें
एक एक शीर्ष बळी क्रूर कृपाणा !
शंभरदां प्रश्न उठत रानटी स्वरीं:
"होशी कां मुसलमान ? वांचसी तरी !"
शंभरदां उत्तर दे कंप अंबराः
हिंदू मी ! शीख अम्हीं ! मरण मी वरी ! !
एक एक करित धर्मवीर दोनशें
वर्जुनि भय गर्जुनि जय धर्मगुरूचा

वधशिळेसि वाहुनि निजशीर्ष देतसे !
बोथटलें तें कृपाण: जात बुडुनिया
सद्य उष्ण उष्ण शोणितांत वधशिळा:
अति अघोर अति उदास दिवसही दिसे
झिंगतसा लाल लाल रक्त पिऊनी.

हाय, अहो ! परि ह्या अति किळस आणि त्या
स्थानीं बीभत्स—ह्याचि समयिं हें कसें,
कां, ये अतिकोमल अति करुण लेंकरूं ?
आणि पडुनि त्या बंदी वीरवराच्या
सहसा तें मूल गळा स्फुंदुनी वदे:
हाय पिताजी ! ! हा, हा, काय दशा ही
तनुची तव आज राजसाजभूषिता ! !
राजराजभूषणार्ह बंदिवान तो
वीरवर **श्रीबंदा** अहह आपुल्या
एकुलत्या एक्या तनयासि हुंगुनी
बोले: हे बाल ! तुझा मी नसे पिता !
हिंदुधर्मची बाला पूज्य तव पिता,
माता तव हिंदु जाति: जा तिच्यावरी
लिंबलोण ओवाळुनि कमलकोमला
तनुचें तव तनया जा टाक सत्वरीं ! !.
सत्वरची साश्रू—सोल्हास तरीही—
उठत राजबिंडा तो वीरतनय तैं,

१ सद्य=ताजें.

[library stamp]

" होशी कां मुसलमान ? वांचसी तरी ! "
" हिंदुधर्ममंगलार्थ मरण मी वरी ! ! "
आणि हाय हाय तया अर्भकाप्रती
नेताती ते नृशंस वधशिलेकडे:
हळुं, न्यारे हळुं, संभाळूनि—लेंकरूं
हें लहान इतुकें कीं सांचल्या तया
रक्ताच्या डबक्यांतचि सहज बुडुनिया
जावें कीं जातां त्या वधशिळेकडे ! !
बोथट तरि तें कृपाण कठिणतम तरी
अति सहजचि कर्म भयंकर करीत तें !
कठिणतमहि बलिदानीं सहजतम तसें
वीरसुत श्रीबंदा वीरवराचा
निजतनुच्या नवनालावरुनि खुडुनिया
वाहुनि दे हिंदुधर्ममंगलार्थ कीं
समरचंडिकाचरणस्थंडिलावरी
निजसुंदर मुखमंडल कमलकुसुमसें !
हरहर ! सत्‌श्रीअकाल ! जय ! पुनः पुन्हां
श्रीबंदा गर्वभरें गर्जना करी.
वीर करी गर्जः आणि शोक करि पिताः
किति सुंदर ! शूर किती ! बाल एकची
अंतरलें तेंहि अभाग्यासिः घे अशी
श्रीबंदा हाय हाय हाय अंतरीं ! ! !

तों ते आलेच कोपकंपभरानें
थरथरतें शब्द शिव्या शाप, वर्षतां;

आणी यच्छब्द उभ्या पंचनदासी,
सिंहाचा जेंवि गुहे, तेंवि गर्जवी:
यद्गर्जे अक्षरशः मुसलमान तो
ग्रामधाम सोडित घे वन सहस्त्रशः
घोरीपासूनि शल्य अति अघोर जें
दास्याचें हृदयिं सले पंचनदाच्या
तें उपटुनि शतकांचा सूड सहा घे
यत्कृपाणः त्या बंद्या वीरवरातें
तेचि मुसलमान अजि श्वान कीं जसे
शृंखळितां सिंहावरि भुंकती बहू
तेंवि भुंकभुंकत पुसताति बहुपरीः
हें कुराण—हें कृपाण ! बोल पुनरपी,
कुफरा ! हो मुसलमान वांचसी तरी !

धर्मांधा ! यःकश्चित सैनिकें दिलें
ज्याच्या ना कवडीचें मोल कुराणा,
सेनानी तो स्वयेंचि घालणार कां
मूढा तव भीक भीतिशी अशा खुळ्या !
" सचमुच क्या ऐसा है ? "—मुख्यकसाई,
बोलति ज्या बादशाह, तो वदे मधें:
' जावोची तरि सेनानीप्रती तया
सेनेहुनि अधिक समादर समर्पिला ! !
तो कुराण फेंकी ? तूं फेंक कृपाणा !

१ घोरी=महंमदघोरी

प्राज्ञ ग्रंथ संग्रह

आणी जा तीक्ष्णाग्रा सांडसाप्रती
लोहाच्या लाल तापवोनि आण जा: ”
लाल लाल सांडस तीक्ष्णाग्र तीरसे
घेउनि ये हत्यारी: अढळ आसनीं
वीर बसे योगयुक्त: “ बोल पुनरपी,
होशी ना मुसलमान ? ” एक एक त्या
प्रश्नातें प्रश्नचिन्ह तेंवि पूर्तवी
तप्त लोहसांडस सहसाचि खुपसोनी
वीराच्या तनुंत तीर तूणिरीं तसा !
प्रश्नांतीं एक एक तोडुनी अहा
मांसाचा लचका ओढूनि काढिती
लाल तापलेल्या खुपसूनि सांडसा !
अक्षरश: हा अघोर छळ रिपू करी !
अक्षरश: तें अघोर धैर्य तो धरी ! ! !

—तो बंदा अखिल हिंदुवंद्य हुतात्मा[1]
“ छळ अघोर हें ही तैं धैर्य चळविना ?
तरि अघोरतर भोगो खल छळांप्रती; ”
बादशाहचि तो !—तन्निधिंत पडे कां
क्रौर्याची ती उणीव ? घोरतर छळा
कल्पी लव हत्यारी: तोंचि गर्जला
बादशाह; “ ना तैसें मूढ ! हाणितां
आघाता शत न होय घाव शरीरीं

१ हुतात्मा—Martyr, प्राणसमर्पण करणारा.

विषम तसा घाव होय हाणितां मनीं
आघाता एक मात्र !—कुफर कारटा
मृतहि चिरा–तोडा तें हृदय ! " हृदय तें
त्या हुतात्मावीरतनयतनुसि चिरुनिया
तोडिति तें क्रव्याद क्रूरः—आणखी
उष्ण रक्त थबथबुनी गळत ज्यांतुनी
जिवलगशा राजसशा लाडक्या अशा
एकुलत्या तनयाचें हृदय तें अहो
जनकाच्या त्या वदनीं कोंबिती बळें ! !
हाय हाय–धन्य धन्य–हायहाय–हा !
धन्य धन्य धन्य ! तरिहि धैर्य ना चळे ! ! !

उस्सहिना निघत मुखांतूनिः कीं असे
योगिवराचा आत्मा, क्रूर हो, तया
आधींची गत तेथें कीं " विचाल्यते
गुरुणापि स दुःखेन न यत्र आगतः ! "
सैतानचि ! सैतानचि यांत घुसुनिया
वेडावी आम्हांसीः नर न भूत हें !
किंकाळुनि भुंकुनि थुंकोनि नीच ते
नंतर आसन्नमृत्यु वीरवरा त्या
सभ्य मृत्युचेंही सुख मिळुं न द्यावया
उंटावरि उफराटें बांधिती बळें
आणी त्या लक्षलक्ष जनततींतुनी
दिल्लीच्या गल्ली गल्लींत राक्षसी
मिरवणूक ती माते ! लोक पहाते ! !

गाईनीं मारियलें ठार कसाया !
चिमण्यांनीं मारियलें ठार ससाणे !
पायदळींची रेती तापली अशी
कीं भाजुनि भस्म करी पायदळांसी ! !
आणी ना कुतरेंही भीक दे अशी
होय बादशाहाची बा दशा अहा—
बंद्याचा सिंहनाद घेतसे जई
रूपांतर हिंदू—डिंडिमामधें महान्
आणि ईश दे अंतीं यश बलाधिका
मूर्तिभंजकावरती मूर्तिपूजकां.

परि होइल हें असेंचि हें न जाणतां,
होईलही हें असें न हेंहि जाणुनी,
अतिभयाण अतिमहान उच्च त्या स्थलीं
अंधकारांत घोर, दक्षिणायनीं
चिरवित निज देहा जो वध्य पशु तसा,
धर्मास्तव नरकीं जो होउनी पचे;
तो वीर श्रीबंदा हिंदुहुतात्मा
आज असे इतिहासी अमर जाहला० ! !
क्रूर छलक, त्याची ती हिंस्र क्रूरता,
बंद्याचें अचल धैर्य ध्येय लुब्धता,
या दृश्या पाहुनियां भाव दाटले
वंदन बंद्यासि असो नम्र आमुचे